
# वेगळे कुटुंब

मधुकर केचे



४९६५
स. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध.
सं. क्र. १९८२.
REFBK-0014383

४२

सूचना

तसे न ?

वर्गणी

8

प्रियला
७३८५७
म३।६९

वेगळे कुटुंब

लेखकाची इतर पुस्तके

दिंडी गेली पुढे ( कविता )
पुनवेचा थेंब ( कविता )
आसवांचा ठेवा ( कविता )
मायमंजुळा ( चरित्र )
मराठी अस्मिता ( संपादित निबंध )
पालखीच्या संगे ( ललित लेख )
विष्णु कृष्ण चिपळूणकर ( टीका )

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ८३८५८ वि: निबंध
ग्रं. १९४२ नों. दि. ८।३।६७

# वेगळे कुटुंब

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ९८३६३
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

REFBK-0014383

मधुकर केचे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्धी योजना
१९७०

पॉप्युलर प्रकाशन मुंबई

© मधुकर केचे

पहिली आवृत्ती ऑगस्ट १९६५
प्रकाशक
ग. रा. भटकळ
पॉप्युलर प्रकाशन
३५ सी ताडदेव रोड
मुंबई ३४ WB
मुद्रक
वि. ग. माटे
विश्वकर्मा मुद्रणालय ( प्रा. ) लि.
४०५ नारायण पेठ पुणे २

माझी वहीण
सौ. उमा निर्मळ
हिला अर्पण

अनुक्रम

वेगळे कुटुंब १ श्री गाडगेबाबा १३ श्री आडकोजी महाराज २२
श्री वंडोजी ३४ श्री कोसंबी ४८ दादाजी ५५
ओघावेगळा सुरेश भट ६७ डोमाकाका ७५
डॉ. पंजाबराव — एक जमाखर्च ८८ पी. के. देशमुख ९८
सौ. कुसुमावती देशपांडे ११० माझी माय १२०

# वेगळे कुटुंब

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९४३६३

एखादे ठिकाण लक्षात राहून जाते, काळ ओसरला तरी त्याची सावली पुन्हा पुन्हा उमटते आणि ते तसे का होते याचा विचार करताना त्या ठिकाणची वास्तू, झाडेझुडपे डोळ्यांसमोर येतात. सेवाग्रामचा आश्रम असाच पुन्हा पुन्हा डोळ्यांसमोर रेंगाळतो. एक व्रतस्थ भाव तिथल्या रस्त्यारस्त्यावर, फांदीफांदीवर आणि घराझोपड्यांवर एक आगळे व्यक्तिमत्त्व चढवीत आहे. जीवन घडण्याच्या वयात ती वास्तू दिसली. ओल्या मातीवर एकेक दृश्य ठसावले. त्याचे छाप आता काही केल्या पुसत नाहीत. पुन्हा वाटते, त्या दगडधोंड्यांच्या अन् मातीच्या घराघुरांना, दुसरीकडेही अगदी त्याच चेहऱ्याने हालणाऱ्या वृक्षांना आपण कल्पनेने तर पावित्र्य देत नाही ना ? आपल्या मनात जपलेली ती कळा हा आपल्याच मनाचा खेळ नाही ना ? आणि ते बरेचसे खरेही वाटू लागते. आरशात बिंब दिसावे त्याप्रमाणे त्या वातावरणाच्या तुकड्यातुकड्यावर एक आश्रमीय छाया उमटली. छाया त्या वस्तूची नव्हती, वस्तूत होती एवढेच ! आरशाला दिसणारा चेहरा आरशाचा नसतो—केवळ तो आरशात असतो–तसेच !

तिथे फिरणाऱ्या, जगणाऱ्या काही जिवंत माणसांचे भाव त्या ठिकाणावर उमटले हाच भरवसा आज खरा वाटतो. तिथला एकेक माणूस वेगळा वाटला होता. म्हणूनच त्या माणसाच्या अवतीभवतीही तो वेगळेपणा प्रतिबिंबित झाला होता. सदैव पैशांमध्ये नांदणारे हात एक दिवस काहींनी झटकून टाकले. ती सतत धन देणारी आफ्रिका सोडली आणि मोहनदास गांधी नावाच्या एका

फकीर नातलगाबरोबर ती मंडळी भारतात आली. त्यातले बरेचजण या आश्रमात होते. गांधीजींपासून स्फूर्ती घेऊन आलेले इतरही होते. व्यवहारी जगाला खरेही वाटू न शकणारे एक निरिच्छ व मर्यादित गरजांचे जीवन ते जगत होते. त्यातले काही म्हणत, “ आफ्रिकेमध्ये व्यापार ऐन भरात चालला होता. सगळं कसं ठीक, छान जमलं होतं, आणि बापूंसोबत इथ आलो—पैसापैसा म्हणतात तो तेव्हापासून हाताला शिवलाही नाही. डोळ्याला साधं तांब्याचं नाणंही दिसलं नाही. ” ते असा उसासा टाकीत; पण त्यातही त्यांच्या लाडक्या बापूंचे कौतुक त्या शब्दातून तरळून जाई. मग त्या तक्रारीतला जोरच नाहीसा होई. त्यांचे त्यांनाच पटे–टिकावू राहणार आहे हे जीवन. ते आफ्रिकेमधले नव्हे.

काहींच्याजवळ तर असे आठवणींचेही भांडवल नव्हते. असेल नसेल त्याचा आपणहून त्याग करून ती मंडळी आश्रमात दाखल झाली होती. त्यांच्या माळेतली काही फुले आपल्या टवटवीने आणि वैशिष्ट्याने पुन्हा वेगळी दिसत होती. नुसता पंचा, असलेनसले एखादे उपरणे आणि सततश्रमी हात. यांच्या सर्वत्र दिसणाऱ्या गर्दीत कुठेकुठे त्याहूनही ठळकपणे एखादा आगळेपणा चमकून जाई. मग कुठून तरी पत्ता लागे—हे चिमणलाल आश्रमाचे व्यवस्थापक. एकदम पाहणारास सर्वचजण एका चेहऱ्याचे, एका प्रतीचे वाटत. पण रानात हिरव्या रंगाच्याही हजार छटा, हजार उपरंग असतात ना ! हे चिमणलालदेखील असेच वेगळे ! त्याच गांधीमयतेमधले; पण वेगळे. पाच महिने नुसती उकडलेली भाजी खाऊन राहिले होते. भर उन्हात कुठे जायचे तर ओले फडके डोक्यावर ठेवून जात. तो निसर्गोपचार असा निष्ठेने आचरला जाई. त्यांचा स्वभाव अति प्रेमळ, शांत, मिळते घेणारा. आणि त्यांच्याच जोडीने कुणीतरी एक सिंग गृहस्थ त्या आश्रमात आला; पण तिथल्या शांततेचा कण त्याच्या वाट्याला आलेला नव्हता. शेती खाते, बगीचा हे काम त्याच्याकडे होते म्हणे ! त्याचा स्वभाव लहान मुलासारखा क्षणात तोळा तर क्षणात मासा. सर्वांबरोबर शेतीचे काम करी. लोकांकडून करवून घेई. सगळे व्यवस्थित निभेस्तोवर हे गृहस्थही ठीक असत. पण जरासे काही कोणाचे काम बिघडले की, यांचेही मग सारेच बिनसे. त्या वेळी त्यांचा अवतार पाहावा. गांधीवादी शांतता वगैरे स्वतःच त्यांना भिऊन जाऊन इतरांमध्ये अधिक प्रमाणात वाटली जाई. यांचेजवळ उरे केवळ पंजाबी जोम. एक पहाडी आवेश. हे लोखंड इतके तापले तरी थंडे व्हायलाही फार

मिनिटे लागत नसत. काही लोकांनी त्यांच्याबद्दल गांधीजींच्याकडे पुनःपुन्हा तक्रार करावी. गांधीजींनी मामला निभावून न्यावा. असे काही दिवस चालले. कुटुंबप्रमुख सर्वांना सांभाळून नेतो, तसे गांधीजी वागले. त्या गृहस्थांनाही समज दिली, पण एकदा अगदी शिगेवरच काम भडकले तेव्हा त्यांनी त्या गृहस्थास आश्रम सोडायला सांगितले. शीघ्रकोपी स्वभाव असूनही गांधीजींवरची अलोट निष्ठा होती, त्याच कारणाने ते तेथे आले होते. आता जेव्हा स्वतः बापूंचीच इच्छा आहे तर तेही आज्ञेबरहुकूम सामानाची बांधाबांध करू लागले. सामान तरी काय असणार? विंचवाचे बिऱ्हाड पाठीवर. हा तर तेथे सर्वच असंग्रहीव्रतीयांचा बाणा! ही मूर्ती आश्रम सोडणार अशी वार्ता आश्रमात सर्वांमध्ये पसरली. रागीट असो, प्रेमळ असो, ज्ञानी असो, अडाणी असो—शेवटी तोही त्या जगविख्यात कुटुंबातलाच होता ना? कुटुंबात नसतात का भेद? गांधीजींकडे हमेशा तक्रार घेऊन जाणारेच शेवटी मध्ये पडले. त्यांनी बापूंना सांगितले, "त्यांना रोखा. ते आमच्यांत हवेत."

गांधीजी क्षणभर विचार करून स्वतःशीच हसले. आपल्या प्रेमाच्या तत्त्वज्ञानाला असे रक्ताच्या नात्याहून सरस सामर्थ्य आल्याचा प्रत्यय त्यांना आला. या आश्रमात जमलेले हे पाच-पंधरा लोक, कुठले कोण? एक या प्रांताचा, दुसरा त्या प्रांताचा. पण एका विशिष्ट व्रतामुळे त्यांचे परस्पराशी नाते जडले होते. बापू खूष होऊन म्हणाले, "तुमची इच्छा होती, म्हणून मी त्याला जायला सांगितलं. तुमचीच इच्छा म्हणून त्याला राहायला सांगतो. माझा स्वतःचा रागलोभ त्याच्यावर नव्हताच."

ते सिंगही जायचे थांबले. बापूंची आज्ञा म्हणून! आले होते, त्यांचेच सांगणे म्हणून! जायला लागले होते, आणि आता राहात होते तीही त्यांची आज्ञा म्हणून! पुन्हा मग त्यांचे सहकाऱ्यांवर चिडणे, लोभ करणे, मन आवरणे, न आवरले म्हणून खंत करणे असे जीवन सुरू झाले. आश्रमालाही त्याचा सराव झाला.

विरुद्ध मनाशी निगडीत होऊन अनोळखी परक्या लोकांनी हे आश्रमकुटुंब जगण्याचा हा प्रयोग हे त्या आश्रमाचे दर्शनीय अंग होते. गांधीजी अनुपस्थित असतानाही ही मंडळी त्यांना हवे असलेले जीवन जगत होती. त्याच सहचारी भावांची वसती त्या अवतीभवतीवर झालेली होती. स्वातंत्र्य मिळू घातलेल्या त्या

काळात अशा प्रयोगाला महत्त्व होते. राजकीय स्वातंत्र्यापेक्षाही गांधीजींच्या लेखी अशा नवजीवनाच्या पद्धतीस प्राधान्य होते.

अशा त्या काळामध्ये आम्ही आश्रमाची वास्तू पाहिली. ती ज्यांचा आरसा त्या व्यक्तीही बऱ्याचशा जवळून पाहिल्या. ऐतिहासिक स्थळांचा भूगोल व इतिहास वाचण्यापेक्षा त्यांच्या दंतकथात मजा वाटावी तसे त्या व्यक्तीबद्दलच्या ऐकीव गोष्टीत रंगून गेलो. ही त्या सिंगाची गोष्टही अशीच कुणाकडून ऐकलेली.

त्या वयाला साजेसे चौकस व संशयी मन जागे ठेवूनच त्या वास्तूत आम्ही विहरलो. एकूणएक व्यक्ती, तिची सारी हालचाल, त्या वातावरणाचे एकेक रूप चाळणीतून गाळून घेतल्यासारखे केले. मला जास्तीत जास्त उत्सुकता होती तिथल्या भन्साळी यांच्याबद्दल त्यांच्याबद्दल व कोसंबीबद्दल खूप ऐकले होते. दंतकथांतल्या नायकासारखे एक अद्‌भुततेचे वलय त्यांच्या भोवती घुमत होते. पैकी कोसंबींना कधीच पाहू शकलो नाही. भन्साळींना पाहण्याची ही एक अनायासे चालून आलेली संधी होती. त्यांच्याबद्दल कोणालाच पुरतेपणी माहिती नसल्यामुळे जास्तीत जास्त ऐकीवता त्यांच्या वर्णनाच्या रंगात मिसळली गेली होती. ते असेच साधुवेषात भटकत असताना कोणाला तरी दिसले होते म्हणे! ते आपल्या पूर्वायुष्याबद्दल कधीच काही बोलत नसत. कटाक्षाने घर सोडलेल्या व इहपाश विसरलेल्या संन्याशाच्या आग्रहाने ते पूर्वीचे काहीही बोलायचे टाळीत. हा साधू कोण असावा याचा अंदाज घेणाऱ्या कोणा एकाला त्यांच्या काठीवर प्रा. भन्साळी असे नाव दिसल्याची वार्ता होती. त्यावरून मग कळले की, ते कोठेतरी प्रोफेसर असावेत. लोकांचे कुतूहल कायम राखण्यासारखेच त्यांचे सारे जीवन होते. असे सांगतात की, इंद्रिये कोंडून त्या शक्ती देव शोधण्यास्तव वापरल्या तर त्या योगसामर्थ्यात रूपांतरित होतात व वाढतात. त्यामुळे भन्साळींनी मौन व्रत आचरले. ते चुकून सुटले किंवा तसेच काही घडले म्हणून त्यांनी लोखंडाच्या तारेने आपले तोंड शिवून टाकले. पेय पिता येईल अशी नळी बसण्याइतपत भाग त्यांनी मोकळा ठेवला. त्यांचा विचार हिमालयावर जाण्याचा होता. कसे कोण जाणे, पण बापूंना ते कळले व आपल्या सर्व आध्यात्मिक साधना आश्रमात करण्याची विनंती त्यांनी भन्साळींना केली. त्यानुसार हे त्या कुटुंबात दिसत होते.

हे सारे किती खरे व किती खोटे याचा अंदाज येत नव्हता. पण ते

पूर्वायुष्यात प्रोफेसर असावेत हे मात्र सत्य वाटले. त्याचे असे झाले की, आश्रमाची नित्य चर्या न्याहाळीत असताना कुणीतरी माझ्या कानात सांगितले, " ते कावड घेऊन पाणी भरताहेत ना—तेच भन्साळी ! " मी चमकून तिकडे पाहिले. एक दाढी वाढलेला व नुसता पंचा नेसलेला माणूस दोन पिपांची कावड घेऊन पाणी रिचवीत होता. त्याचा पोशाख व राहणी तशी म्हटली तर इतर आश्रमवासी मंडळींसारखीच होती. पण थोडे निरखून व जवळ जाऊन पाहिले तेव्हा वेगळेपणा जाणवून गेला. त्यांची पंचा नेसण्याची तऱ्हा अलग होती. इतरांप्रमाणे त्यांनी तो कमरेवर अडसला नव्हता. खूप वर बरगड्या झाकून त्यांनी तो नेसू बांधला होता. अर्थातच लांब असूनहि तो गुडघ्यापर्यंतच पुरला होता. गुढे पाडून पंचा नेसणारे, धोतराच्या चालीवर दोन-तीन निऱ्या पाडून पंचा नेसणारे, कमरेला गाठ मारून, कधी मानेला गाठ मारून गोसावी तऱ्हेने नेसणारे असे अनेक प्रकार मला माहीत होते. आमच्या गावात येणाऱ्या बैराग्यांमुळे, सुशिक्षित साधू, बंगाली, मद्रासी, प्रापंचिक यांच्यामुळे त्या तऱ्हा ध्यानात राहिल्या होत्या. पण भन्साळींची ही तऱ्हा वेगळीच होती. नेहमीच्या मापाचे कापड असूनही त्या विशिष्ट गुंडाळण्यामुळे ते उपरणे व लुंगी या दोहोंचे काम करीत होते.

हा इतकाच फरक नव्हता. सर्वसाधारणपणे गांधीतत्त्वज्ञान जगणाऱ्या शरीरावर जो तजेला व ज्या आरोग्याच्या खुणा दिसून येत नाहीत त्या त्या माणसाच्या देहावर होत्या. अगदी ओसंडून वाहात होत्या. लालबुंद आरोग्य त्या सांडलेल्या पाण्यामुळे व घामामुळे अगदी जास्वंदीच्या फुलाप्रमाणे न्हाऊन निघाले होते. इतके शोभिवंत देहवैभव मी तरी दुसऱ्या कोण्या गांधीवाद्यास लाभलेले पाहिले नाही. खाऊन टाकावासा वाटेल इतका तो अरुण रंग त्या देहावर मोहरला होता. ते रसरसून सर्वांगी पिकलेले आरोग्य पाहून प्रत्यक्ष सूर्यदेवच त्या उन्हात भेटो आल्यासारखे वाटले. नुसत्या देहामुळे खूष होण्याचा असा मोका मला आयुष्यात कधीच आला नाही. बारा वाजताना उन्हात सौभाग्य चमकवणारी पंढरपूरकडची तांबडी माती त्या वेळी नजरेसमोर तरळून गेली. साक्षात गांधीजींनाही बहुतेक न गवसलेले हे उताला जाणारे आरोग्य ! रामकृष्ण मिशनचे काही योगी, खाण्यापिण्याकडे भोलेनाथाच्या आराधनेइतकेच इमानाने लक्ष पुरविणारे नागे, रंगलेप लावलेले नाटकातले किंवा रंगीत चित्रपटातले राजपुत्र—सारे फिक्के वाटले त्या तेजोगर्भी माणकाच्या देहासमोर ! विवेकानंदांच्या फोटोतला बदामी काळसर

रंग आतावर कुंचल्यातला वाटत होता; पण आता तो खरा वाटला. ध्यान केल्यासारखा मी त्या देहावर डोळ्यांनिशी तुटून पडलो. त्या अंगावर लाललाल जणू धापोडे उमटले होते. वेड्यासारखा मी बघत होतो. अगदी चव चाखणाऱ्या जिभेने बघत होतो !

त्या लालबुंद देहाला एक विलक्षण कोरीवपण होता. नाजुकतेतही एक तऱ्हेचे पोलाद जाणवत होते. कोण्या पौष्टिक पदार्थ चापलेल्या शेळीचे दूध हा माणूस प्यायला ? पण खरे नवल पुढेच होते. महिनोंशी नुसते ताक, नुसता लसूण, केवळ कोबी खाऊन ते रक्तशिल्प पोसले होते. आम्ही तेथे होतो त्या काळात तर त्यांचा सर्व आहार म्हणजे फक्त कडुनिंबाचा पाला हाच होता. नुसता कडू पाला ! निव्वळ पाने. ढोरासारखे बकाबका चावीत होते. पूर्वीच्या पुराणात वर्णन केलेले, कंदमुळावर-झाडपाल्यावर वाढलेले सारे तेजःपुंज योगी माझ्यासमोर उभे राहिले. सांगणारा एकेक गंमत सांगून भन्साळींबद्दलच्या माझ्या आश्चर्यात भर घालीत होता. एकदा ते चिमूरच्या रानातून पायी भटकत होते म्हणे. एका झाडाखाली भर दुपारी निद्रेसाठी म्हणून पहुडले. कुठला तरी पिसाळलेला कोल्हा त्यांच्या पायाला चावून गेला. भन्साळींची झोप म्हणजे कर्मयोग्याची समाधीच ! ते काही त्या दंशामुळे जागे झाले नाहीत. कुत्रा चावला तर मृत्यू येईल अशी आपण माणसे, पण भन्साळी निद्रा पूर्ण झाल्यानंतर सुखाने जागे झाले. समोर एक कोल्हा मरून पडला होता, त्यांचे विष भिनून ! मग त्यांचे रक्त वाहणाऱ्या पायाकडे लक्ष गेले, आणि सारा प्रकार ध्यानात आला.

भन्साळींच्या देहाचे हे सामर्थ्य त्यांच्या यौगिक सामर्थ्याचाच परिणाम असावा. बेचाळीस साली आमच्या अष्टी सर्कलमध्ये जो भीषण दंगा झाला त्या वेळी ब्रिटिश राजवटीने अनन्वित अत्याचार केले होते. स्त्रियांची अब्रू लुटली गेली होती आणि प्रत्येक घर त्यांनी धुऊन नेले होते. त्या अन्यायाची दाद मागण्यासाठी भन्साळी अष्टी सर्कलचे गावन् गाव फिरले. तिकडे चांदा जिल्ह्यात चिमूरलाही हाच प्रकार झाला होता. त्या बाजूनेदेखील ते पायी फिरून व परिस्थितीची पाहणी करून आले. त्या सर्व काळात त्यांनी कडकडीत उपोषण केले. एकंदरीत चौसष्ट दिवसांचे ते अनशन ! त्या उपोषणात इतके श्रम, ती भ्रमंती त्यांना साधणार नाही असे डॉक्टरमंडळींचे ठाम मत होते, पण या इहलोकीचे विज्ञानही त्या योग्याने चुकीचे ठरविले.

हे सर्व ऐकलेले वृत्त भन्साळींना प्रथमच पाहताना आठवत होते. भन्साळी आमच्याकडे न पाहता पाणी भरत होते. आश्रमाला लागणाऱ्या पाण्याचा बराचसा भाग ते स्वतः आणीत. त्यांचे पाणी भरणे चालू असतानाच काही इटुकली पिटुकली मंडळी त्यांच्यासमोर येऊन उभी राहिली. ही मंडळी त्यांची खास दोस्त असावीत. त्या सर्वांनी त्यांना म्हटले, " नमस्कार काका. "

" नमस्कार, नमस्कार. " भन्साळीकाकांनी मग पाण्याची कावड ठेवून दिली. एका ओसरीच्या सावलीत ते बसू गेले, पण त्या बालमंडळीस अंगणातल्या झाडाखालची सावलीच अधिक पसंत होती. काकांचा शिंदीचा चापऱ्या त्या झाडाखाली पडला होता. तो म्हणजे काकांचा संपूर्ण बिछाना. भर उन्हात, पावसाच्या झडीत, रात्री केव्हाही काकांना झोप आली म्हणजे त्या चापऱ्यावर काका झोपत. ऊन, पाऊस असतानाही ते अंगणात चापऱ्या टाकून झोपत. इमानाने श्रम केल्यानंतर जी झोप येते ती उन्हापावसांनी मोडत नाही हा काकांचा अनुभव ! त्याच चापऱ्यावर मग काका व त्यांची ' बाटुक ' मंडळी विराजमान झाली. ' अमकी गोष्ट सांगा तमकी सांगा ' असा थोडा वेळ गिल्ला झाल्यावर काका गोष्ट सांगू लागले. मुले म्हणजे श्रोतृमंडळी. तल्लीन होऊन जागा सापडेल तेथे–काहींना काकांच्या खांद्यावरच जागा सापडली होती–बसलेली होती. काका गोष्ट सांगताना चरखा चालवीत होते. काकांच्या हातचे सूत अगदी एकसारखे, घोटीव आणि बारीक होते. गोष्ट सांगताना रंगून गेलेले असतानाही त्यांचे धागे सरळ निघत होते. एकाच वेळी ही नुसती दोनच कामे नव्हती. मधूनच कडुलिंबाचा एखादा डळका ते तोंडात घालीत. जेवणासाठी त्यांनी निश्चित असा वेळ ठरवला नव्हता. इतर कामे करतानाच ते अधूनमधून आपला आहार घेत. मुलांसाठी गोष्ट सांगून झाली. कुठल्यातरी परीची ती कथा होती. नंतर खंडूजी नावाच्या माणसाला थोडेसे साक्षर करून झाले. इतक्यातच वर्ध्याचे कोणी साहेब आले. आतापर्यंत मराठी, गुजराथी, हिंदी वगैरे भाषांमधून बोलणारे काका त्या ऑफिसरशी फक्कड इंग्रजीतून बोलू लागले. त्यांना भाषा तरी किती ठाव्या होत्या ?

भक्त पुंडलीक आईबापांची सेवा करीत होता तेव्हा त्याला ईश्वरदर्शनही त्या मानाने तुच्छ वाटले. महाराष्ट्राला हा कर्मयोगाचा आदर्श लाभलेला आहे. आश्रमची रोज सकाळी व रात्रीची प्रार्थना होई, त्यात भन्साळीकाका येत नसत.

कर्मयोगासमोर त्यांच्या लेखी प्रार्थनेलाही मोल नव्हते. आम्ही असेच तेथे बसलो असतांना काका म्हणाले, “ गांधीजी स्थितःप्रज्ञ आहेत. ”

बापूंविषयीची या अशा मोठ्या योग्याची निष्ठाच त्या आश्रमकुटुंबाला टिकवीत होती. काका गांधीजींशी फारसे बोलत नसत. बापू तेथे असले म्हणजे दिवसातून फक्त एकदा त्यांच्यासमोर जाऊन उभे राहात. काही न बोलता थोडा वेळ थांबत आणि परत आपल्या कामाला निघून जात. ते श्रम करणारे सारेच होते. श्रमाला फार महत्त्व देणारे होते. एकजण पाणी प्यायला गेला तर त्याला आपल्यासाठी पाणी आणायला लावून दुसरी उगीचच होणारी येरझार वाचविणेदेखील कोणाला तेथे खपत नव्हते. त्यामुळे कामचुकारपणा प्रत्येकाच्या अंगी शिरेल असे त्यांना वाटे. अशा त्या साऱ्या श्रमप्रिय लोकांमध्ये काका तर साक्षात् कर्मयोगीच होते. गांधीजींनाही न भेटणारा, भेटले तर शिळोप्याच्या चार गोष्टी न बोलणारा आणि विशेष म्हणजे आश्रमाच्या प्रार्थनेलाही उपस्थित न राहता केवळ श्रमच करणारा हा माणूस !

त्या दिवशी रात्री आम्ही प्रार्थनेला हजर होतो. तऱ्हतऱ्हेच्या भाषांमधून ती लांबलचक प्रार्थना तिथल्या काळोखावर आणि शांततेवर फारच परिणाम करीत होती. दिवसभर राबलेले लोक आता विश्रांती घेण्यापूर्वी ही चित्तशुद्धी करीत होते. नंतर एक लुंगीवाला, अर्धा उघडा माणूस कंदील लावून वृत्तपत्र वाचू लागला. गांधीजींबद्दलच्या त्या दिवशी वृत्तपत्रात आलेल्या बातम्या त्याने हिंदी-तून वाचून दाखविल्या. त्याचे हिंदी मोठे लोभस होते, त्याच्या एकंदर अवतारावरून हा इतके सुंदर हिंदी उच्चार करू शकेल असे वाटत नव्हते. बाकी मजकुराचे श्रेय त्याला नव्हतेच म्हणा ! कारण जे छापले तेच तो वाचत होता. हाच माणूस सकाळी अंगणातल्या झाडाजवळ रवी घुसळताना आम्ही पाहिला होता. शेगावहून आलेल्या मजुरांच्या मुलांना त्याने गाडगी भरभरून गाईच्या दह्याचे ताक वाटले होते. मलाही त्याने दोन गाडगी भरून ते रुचकर पेय दिले होते. आश्रमात जसे आश्रमवासी कामे करतात, तसेच जादा कामासाठी विशेषतः शेतीवर मजूरही आणतात. त्यातलाच हा कोणी असावा ही कल्पना झाली होती. परंतु प्रार्थनेच्या वेळी त्याने वृत्तपत्र-वाचन केल्यामुळे तो इथल्याच मंडळीतला असल्याची साक्ष पटली. आमच्यापैकी एकाने त्याला प्रार्थनेनंतर विचारले, “ इतका सुंदर हिंदी मजकूर व उत्तम भाषा असलेले वृत्तपत्र कोणते ? ”

त्याने त्या प्रश्नाला उत्तर देण्याचे टाळले. तो विनयाने लाजला. एखाद्या वृत्तपत्राच्या ललित भाषेबद्दल या तिऱ्हाईत माणसाने लाजावे याची आम्हांला मोठी गंमत वाटली. सर्कशीत खास काम करणारी हीरो मंडळी प्रेक्षकांच्या टाळ्या व प्रशंसा घेते आणि ते कसबी लोक विनयाने त्या आश्रयदात्यांना अभिवादन करतात, ते उचित वाटते; पण तशाच विनयाने व काहीही करामत न दाखविता तिथला जोकरही अगदी तसेच विनयी अभिवादन करतो तेव्हा मात्र तंबूतले प्रेक्षक हास्याचा कडेलोट करतात. आम्हांला या वृत्तपत्र-वाचकाला व त्याच्या त्या लाजण्याला पाहून सर्कशीतल्या विदूषकाची आठवण झाली. ती उत्तम हिंदी जशी काही त्यानेच लिहिली होती! तोच जणू त्या पत्राचा संपादक होता. दुपारीच तर आम्ही त्याला आश्रमाच्या आव्यावर कुंभार-काम करताना बघितले होते. त्या माणसाने आमच्या मनातली ती गंमत फार वेळ टिकू दिली नाही.

आपल्याच घाईत पुढे जाता जाता त्याने नुकतेच वाचून दाखविलेले वृत्तपत्र आमच्या हाती दिले. त्या काळोखात तो दिसेनासा झाला. आम्ही त्या वृत्तपत्राकडे पाहिले आणि चाटच पडलो! ते उत्तम हिंदीत, घाईने वाचून दाखविलेले वृत्तपत्र होते– ‘ Times of India ’

इतक्या शीघ्र वेगाने व साहित्यिक सामर्थ्याने अनुवाद करणाऱ्या त्या माणसाच्या— चंद्रप्रकाशजी त्याचे नाव—हातीच आश्रमाचे वाचनालय होते. कुंभारकाम, दुभते व वाचनालय अशी कशाशी काही संबंध नसलेली तीन कामे हा एकच माणूस सांभाळीत होता. दुसऱ्या दिवशी आम्ही तिथल्या ग्रंथागारास भेट दिली. विक्रीविभागही तेथेच होता. एखादे पुस्तक विकले गेले तर त्याची चव्वल जणू काही आपल्याच खिशात ( हो पण लुंगीला खिसा नसतो ) पडणार आहे अशा हिरिरीने चंद्रप्रकाशजींनी आम्हांला पुस्तके विकत घेण्याचा आग्रह चालवला. फार वाचण्यावर मात्र त्यांचा भर दिसला नाही. आपल्या गोड वाणीने त्यांनी आम्हांला सांगितले, “ निदान एक ओळ यातून वाचा. ती अनुभवा. जीवनाला फार ओळी नकोत. याच ओळींच्या अनुभवातून बाकीच्या ओळी आपोआप तुमच्या समोर येतील. ” लहान्या भावाने आपल्या लेखक भावाचे कौतुक करावे तसा तो विनोबांच्या, बाळूभाई मेहतांच्या लेखनाची तारीफ करीत होता. त्या ग्रंथागारात रोज पोती भरून वृत्तपत्रे सप्रेम भेटीदाखल येत होती. मामुली झोपड्या झाल्या म्हणून काय झाले? जग हालवणाऱ्या माणसाचा तो निवास

ठाव होताना ! चंद्रप्रकाशजींनी त्या सप्रेम भेट नियतकलिकांच्या जुन्या साठ्यातून मला काही मासिके दिली. पैसे नको म्हणाले.

प्रार्थनेनंतर आम्ही त्या दिवशी आश्रमाच्या प्रांगणातच झोपलो. प्रत्येकाला आंथरायला एकेक कांबळे मिळाले होते. आमच्या सोबत लीलाताई होत्या. बायामंडळींची झोपण्याची काय व्यवस्था होणार ही विवंचना आम्हांला होती. रामकृष्ण आश्रमात तर रात्रौ आठनंतर बाईची सावलीही त्या वास्तूवर पडू देत नाहीत. जगन्माता शारदेच्या पूजागृहातील छायाचित्रापलीकडे तेथे मग स्त्रीजातीस वाव नसतो. गांधी आश्रमही त्याच ब्रह्मचर्य, इंद्रिय-दमन इत्यादि व्रतांना प्राधान्य देणारा आहे ही गोष्ट माहीत असल्यामुळे लीलाताईची व्यवस्था कुठे करायची ही आमच्यापुढे अडचण होती. पण तिच्या स्त्रीत्वाचे अस्तित्वही तेथे कोणाला जाणवलेले दिसत नव्हते. आम्ही ओळीने कांबळी पसरून लवंडलो. तेथेच एका आश्रमवासीयाने पुन्हा एक कांबळे आंथरून म्हटले, " यहा बाईको सोने देव. " आम्ही आणि भन्साळीकाका यांच्या मधोमध लीलाताईची शय्या होती. रामकृष्ण आश्रमाची रीत सांगून आम्ही काकांना लीलाताईबद्दल विचारले तेव्हा ते आकाशाकडे पाहात बोलले, " स्त्री तर माता आहे. तिला आश्रमात येऊ नको म्हटल्यानं काय साधणार ? भ्याल, दूर जाऊ पाहाल तितके विकार बोकांडी बसतील. " आणि हे बोलतात न बोलतात तोच स्वारी घोरायलाही लागली.

काकांची झोप आता त्यांच्या स्वतःच्या इच्छेशिवाय उघडणारी नव्हतीच. आम्हीही पांघरुणे घेतली. का कोणास ठाऊक, पण स्त्रीला इतक्या निर्धास्तपणे माता समजणाऱ्या त्या आश्रमवासीयांबद्दल मला खात्री येत नव्हती. विशेष म्हणजे लीलाताईंना माता समजणे ही तर विपर्यासाची बाब होती. नुकताच विवाह झालेली व देवाने सौंदर्याचे भरपूर लेणे दिलेली ती षोडशी म्हणजे कोणाच्याही संयमास आव्हानभूतच होती. आणि ख्रिश्चनांपासून बौद्धांपर्यंतचा स्त्रीबद्दलचा इतिहास काही भला नव्हता. एक येशू आणि एक गौतम सोडा; सारेच प्रिस्ट आणि भिक्कू काही इतके उच्च नव्हते; आणि हे सारे ध्यानी आणूनच तर विवेकानंदांनी आपल्या आश्रमाचे स्त्री वगळणारे वातावरण ठरविले होते. मग हेच आश्रमवासी स्त्रीबद्दल इतके निर्धास्त कसे ? रात्रीतून दोनतीनदा मी शंकेखोरपणे उठून पाहिले. सर्वत्र शांत होते. काका एखाद्या लहान मुलासारखे मस्त झोपले होते, आणि त्याहून बेफिकीर झोपली होती लीलाताई. एक परकी

सुंदर तरुणी जवळ झोपलेली असताना हा अंगी रग न सामावणारा माणूस इतका निर्विकार झोपू कसा शकला ! पण त्याचे ते झोपणे खरे होते आणि त्याहून खरे होते लीलाताईचे झोपणे. माणसाबद्दलची खात्री फक्त बाईच देऊ शकते. विकाराची केवढीही सूक्ष्म छटा ती माणसाच्या डोळयात शोधू शकते. ती ज्या अर्थी इतकी निर्धास्त आपल्या पित्याजवळ पहुडावी तशी झोपली होती त्या अर्थी काकांची निर्विकारता खरी होती.

तांबडे फुटले तसे त्याच अंगणात सकाळची प्रार्थना सुरू झाली. आम्ही लगबगीने उठून तीत सामील झालो. प्रार्थना संपल्यावर काही नव्यानेच ओळख झालेल्या आश्रमवासीयांनी आस्थेने चौकशी केली, " नींद शांत आयी ना ? " आणि मग ते सारे संडाससफाई, सूतकताई व इतर अनेक कार्यांना लागून गेले.

अशा या कुटुंबात ल्हान्या मुलांसाठी एक शाळाही होती. मुलामुलींना नृत्य गायन शिकविणारे श्री. आर्यनायकम् व शांताबेन होते. कलेची, श्रमाची व विद्येची जोपासना तेथे होत होती. पुढे जयपूर कॉंग्रेसच्या वेळी आर्यनायकम्च्या विद्यार्थ्यांची नृत्ये बघायला मिळाली व डोळे सुखावले. आश्रमातले कमी पैशांचे व शिंदीच्या चापांनी मढवलेले शौचकूप शांताबेननी शोधून काढल्याचे कळले. ते फिरते कूप होते. त्यमुळे शेती आपोआप खतावली जात होती. लालबुंद टमाटो, काकड्या त्याच्या जोमाने डुलत होत्या. या मंडळींची शाळाही बघावी म्हणून आम्ही तिकडे वळलो. एका खोलीत मुलांचा गोंगाट ऐन भराला आला होता. एक पंचेवाले गुरुजी तेथे कसोशीने मुलांना शांत करीत होते, पण शांततेचे नाव नव्हते. न रागावता बालगोपालांना शांत करणे ही कसोटीच. गोंगाट वाढत चालला तसे मग सातवीच्या वर्गावरचे एक गुरुजी तेथे आले. कुणीतरी नवा माणूस पाहिल्याबरोबर पोरे शांत झाली. त्या गुरुजींनी त्या गोंगाटाची चूक हळुवार भाषेत पोरांच्या लक्षात आणून दिली. त्यांच्यामुळे इतर वर्गांना अध्ययनात त्रास झाला होता. पोरांनी आपली चूक मान्य केली व मास्तरांनी शिक्षा ठोठावण्याच्या आधीच त्यांनी स्वतःच निर्णय घेऊन सांगितले की, झाल्या चुकीबद्दल ते दुसऱ्या दिवशी सर्वांमिळून वीस गुंड्या सूत कातून आणणार—

शिक्षण म्हणजे अमकेतमके वगैरे खूप लागते. येथे आर्यनायकम्जींसारखे सुविख्यात शिक्षणतज्ज्ञ होते. त्यांच्या लेखी इमारत, फर्निचर यांना शिक्षणात

फारच तिय्यम महत्त्व होते. चटईवर बसून आणि फूटभर उंचीचा एक टेबल ठेवूनही शिकता येते हा प्रत्यय तेथे येत होता.

असे ते आगळे कुटुंब आणि आपापल्या वैशिष्ट्याने तळपूनही एकाच गांधीवाही प्रवाहाशी सुसंगती राखणारे ते घटक—एक नवा भारत घडवण्याची ती धडपड ! स्वराज्य जवळ येत होते. या प्रयोग-जीवनाला आशा होती की, स्वतंत्र भारतात सर्वत्र याच जीवनाची छाया दिसेल. एक साधे, प्रेमळ, कष्टाळू जीवन सर्वत्र आढळेल. पाश्चात्य जीवनाचे आकर्षण न ओसरलेला आजचा भारत पाहिला म्हणजे त्या गांधीमय कुटुंबाची आठवण होते. एखाद्या दुर्लक्षित ठिपक्यासारखी !

नवे जग : दिवाळी १९६३

# श्री गाडगेबाबा

उणेपुरे तप झाले असेल. इथल्या खडकारी पुऱ्यात दाही दिशांनी लोक भरत होते. या आडमोहोल्ल्याच्या भागात आज पहिल्या प्रथमच इतके लोक का दाटत आहेत याचा अचंबा करीत मीही अजाणता तेथे लोटला गेलो. तिथल्या एका वेवारस मोकळ्या जागेत इंचभरही जागा रिकामी नव्हती. त्या मैदानाच्या आसपास काही पडझड झालेली घरे होती; काही चक्क खंडारे होते. ठळकपणाने उमटणारी काही कौलारू घरे आणि नाही म्हणायला पाचदोन माड्याही. त्या सर्वच वास्तू तेथे कशाबशा उभ्या होत्या. एका अपंगाने दुसऱ्या म्हाताऱ्याला आधार द्यावा तसा त्या जुन्या बांधणी स्वतः सावरून दुसरीला नेट देत होत्या. खूपच मोडकळीस आलेली आणि दरिद्री फाटकी जनता त्या मोहोल्ल्यात वर्षानुवर्षे राहात आहे. तशा त्या वसतीत आजच हे काय अघटित घडत आहे म्हणून मी त्या उफाळणाऱ्या सागरातल्या एकदोन थेंबांना विचारून पाह्यले. तसे एकदोघे जण साऱ्या सागराच्या खेकसा आपल्यात आणून म्हणाले,

"बापा, तुमी काय जपानात राह्यता काय ? सर्व्या गावाले मालूम अहे न् तुमालेच नाइ ?"

आणखी एकाने दूरवर बोट दाखवून मला विचारले, "थ्या तिकडे इतकाल्या बंड्या न् छकडे आले गावोगावचे. तेइले काय पिसं लागलं काय म्हनावं ?"

तिसऱ्या 'एखाद्या'नेही मला काही सुनावले नसतेच अशी काही खात्री नव्हती, पण इतक्यात लाऊडस्पीकरच्या भोंग्यातून पखवाजीचे बोल आणि टाळांचा

मधुर आंबट आवाज सुरू झाला. एकदम सारा सागर शांत झाला. तिथे उरले केवळ मृदंगटाळाचे नादब्रह्म. मराठी संस्कृतीचे शब्दातील बोल घुमवणारा हा टाळपखवाजांचा आवाज मला नेहमीच चवदार वाटलेला आहे. तसे काही ऐकले की लहानपणी पालखीच्या संगे पंढरीस गेलो होतो त्या वातावरणाची आठवण होते. साधा टाळ जरी आपल्या मृदुमंद किणकिणाटाने वहरू लागला तरी स्तब्ध जख्ख वातावरणाच्या डहाळीला एकदम गाथेची पालवी फुटत चालल्याचा भास होतो. पंचपंच उषःकाळी ऐकलेल्या सर्व अभंगांचे तुरे त्या पखवाजाच्या बोलांनी आपल्यात खोवले आहेत असे वाटते. सूर्य नारायणाची उगवण सांगणाऱ्या झिरपत्या अरुणाची नारिंगी चव प्यायल्या सारखे मन मग मस्त सुखावते. याही वेळी तेच झाले. तेवढ्यात एका कोपऱ्यातला जल्लोस एकदम प्रगटला, "गाडगेबाबा की जय!" हे सर्व पुन्हा पुन्हा निनादले. निनादत राह्मले. तिथली उरे, तिथली माती व्यापून. आकाश व्यापून!

भाविकतेने, श्रद्धेने गाडगेबाबांच्या जयजयकारात स्वतःला हारवून बसण्याचे प्रसंग मी सहसा येऊ देत नसे. बुद्धी गहाण टाकून धर्माच्या सोहोळयात डुंबणे मला जागेपणी तरी जुळले नाही. अडचण हीच की गाडगेबाबांना पाहिल्याक्षणीच माझे ते 'जागेपण' खलास होत असे. तो फाटका माणूस माझ्यावर चेटूक करून जाई. पण माझ्यावरच कसे? मी तर आपला एक साधा सुशिक्षित. आठव्या नवव्या वर्गात शिकणारा! म्हणजे फार फार तर साक्षर! शिक्षणाचा संस्कार माझ्यावर काय तो पायजम्यापुरता झालेला; पण चांगली मी मी म्हणणारी सुटा-बुटातली, यसफ्येसच्याही पुढचे इंग्रजी बोलणारी आणि खऱ्या साहेबांच्यापेक्षाही तोतरेपणात नाणावलेली मंडळीही अशीच कीर्तनप्रसंगी खलास झाली होती. गाडगे महाराजांच्या व्यक्तिमत्त्वाचे ते माहात्म्य असेल, हजारांच्या देहातून एकवटलेल्या भक्तिभावाचाही तो जोर असेल किंवा कीर्तनप्रसंगी वाजणाऱ्या मर्द वाद्यांचा तो परिणाम असेल; पण एकदा त्यांच्या कीर्तनात सहज म्हणून गेलेला कोणताही सुशिक्षित तेथून पुरा रंगूनच बाहेर पडे.

गाडगेबाबांच्या कीर्तनपद्धतीवर टीका करणारी मंडळी नव्हतीच असे नव्हे. त्यांच्या पूर्वीचा वऱ्हाड हा जरासा कीर्तनाच्या गोंडस थाटाला सरावलेला होता. मंदिरांच्या भव्य सभामंडपात भरजरी रेशमी वेषात आणि संस्कृत प्रचुर भाषेत कीर्तने व कथा ऐकण्याची त्या आधीची आमची सवय. तो थाट जरा श्रीमंती

असे. बसायला जाजम, निवडकांसाठी गाद्यालोड आणि टेकल्या भिंतीस पुराणातली शृंगारचित्रे असा देखावा. तशा मुलायम वातावरणाला साजेसाच बुवांचा नरमगोड आवाज आणि त्याला शोभणारी वादकांची साथ. बायांनाच नव्हे तर माणसांनाही तशा वेळी नटून-थटून यायला वाव असे. श्रीमंत श्रोत्यांपैकी एखाद्याचे नाव बुवांच्या आख्यानसंदर्भात मानवाईक रीतीने उच्चारले जाण्याची संधीही सुलभ असे. सारांश काय तर सर्वच बाबतीत श्रोत्यांच्या उपस्थितीचे तेथे चीज होई. बुवांचे नर्म विनोद, कथेत सफाईनं आणलेला देवादिकांचा शृंगार वगैरेमुळे कीर्तनाला रंग चढे. तशा कीर्तनाची वाट आम्ही पाहात असू. त्यात शेवटी मिळणारी खिरापतही महत्त्वाची असे.

तशा त्या देखण्या सुरेल कीर्तनांच्या पार्श्वभूमीवर ही गाडगेबाबांची कीर्तने म्हणजे सुवर्णकलशाशेजारी फुटके मडकेच ! सारा रांगडा खाक्या. म्हणूनच शिकलेली मंडळी तिकडे जायला नाखूष असत. पण ती बोटांवर मोजण्याइतपत मंडळी न गेल्याने गाडगेबाबांचा जमाव थिटा वाटत नसे—घामेजल्या अंगाचे कामकरी, शेतकरी, भिकारी आपल्या देहासोबतच कपड्यांचेही फाटकेपण, दारिद्र्य व घाण वास तिथल्या वातावरणाला सांगत तेथे गोळा होत. आणि स्वतः कीर्तनकारही त्याच जमावाचा प्रतिनिधी. सर्व जनतेच्या कापडाच्या मिळून साऱ्या चिंध्या अंगावर पांघरून, सारे उन्हाळे सामावलेली आपली म्हातारी पांढरी दाढी खाजवीत आपल्या पहाडी आवाजात तो ललकारी देई. ''

" बोलाऽऽ—ठ्ठल विठ्ठल विठ्ठल. . ."एकदम लाखो हात आभाळाकडे होत. मुखातून विठ्ठलाची सदाफुली उताला आली आहे आणि हाताच्या टाळ्या ठेक्यावर पडत आहेत — " ठ्ठल ! विठ्ठल विठ्ठल. "

वास्तविक अवघे वातावरण याच वेळी पुरतेपणाने जागे होई. पण गाडगेबाबांच्या म्हाताऱ्या कानांना आणि अंधुक डोळयांना कुठून तरी संशय येई — कुणीतरी या चैतन्याच्या सोहळयातून, या महानादातून, आपले हात चोरतो आहे. कुणाची तरी जीभ लुळी पडली आहे. झाले, हा 'वास' येण्याचाच अवकाश ! ते एकदम आपला हात उंचावून व तोंडाने 'होऽऽ' करून ती टाळयांची व नामगजराची प्रचंड लाट थोपवीत. क्षणार्धात मुक्या झालेल्या त्या लोकनारायणाला मग ते दरडावीत.

" जिभा झडल्या काय गा तुमच्या. हे तर मरेल मानसासारखं झालं ! अन

काय थे टाया वाजवनं ! तुम्ही टाया वाजवून राह्यले का भाकरी थापून राह्यले. आँ ?"

मग दुसऱ्या क्षणी जरा क्षमेच्या आवाजात चेतावणी देत, "गडे हो जरा जोर धरा. नाही थ्या वाक्ती तर तुमाले मोठा जोर येते. आरे हे देवाचं नाव होये. म्हना जरा मोठ्यानं. ह्या मावल्या ( बाया ) तरी तुमच्यापेक्षा जोऱ्यानं म्हनतेत. हं, बोला ऽऽ.. "

आणि मग तो प्रचंड गजर. पूर्वीपेक्षा दुप्पट. एका तालात. गडगडाटासारखा.

हे असे. केव्हाही असेच. गाडगेबाबांच्या तरुणपणापासून चालू झाले. आता अणूरेणू पिकायला आला— पिकून गळायला आला तरीही तसेच. कुठल्याही कीर्तनात हे ठरलेले असे. पहिल्यांदा कितीही इमानाने टाळया वाजवल्या अन् विठ्ठलनामाचा गजर केला तरी बुढ्याची चिडचीड कायमच. हा सर्व गावच्या सर्व मंडळींचा अनुभव. म्हणून नाठाळ पोराने बापाशी करावा तसा गमतीपणा लोकही त्यांच्याशी करू पाहात. मुद्दामच जरा थंडया हाताने पहिला गजर होई. मग दुसऱ्या अन् तिसऱ्या वेळी मात्र सगळे हात लबाडी उघडी पडल्यासारखे खुदकन् हासत.

बसायला बेवारस मैदानाची धूळ, टेकायला मागच्याचे गुडघे अशा विचित्र थाटातले हे कीर्तन रात्रभर चाले. आणि परंपरेच्या मनोरंजनाला चटावलेल्या कानांना या कीर्तनात मात्र कथानक, त्यानुसार देवादिकांच्या बुरख्याआडून चाखता येणारे शृंगारादी रस—यांचा तर पुरताच अभाव. तरीही लोक येत. हजारो ! रात्रभर तेथे बसत. आणि सुखवस्तु कीर्तनातल्यासारखी जाजम—लोडांवर 'ब्रह्मानंदी टाळी लागण्याची' सोय नसल्याने सर्वजण रात्रभर जागत. ते जागायचे ते तेवढ्याच कारणाने नव्हे. झोपल्या माणसांची अधूनमधून दखल घेणारी जी टाळया वाजवण्याची किंवा नामगजराची पद्धती तिच्यामुळे कुणाला तेथे झोपण्याची संधी मिळतच नसे. शिवाय स्वयंस्फूर्तीने जागे राहण्यासारखी काही तेजस्वी कारणेही तेथे असत—

पहिले प्रमुख कारण हे होते की तेथे आलेला माणूस हा तमाशादंढारीपेक्षा थोड्या सुसंस्कृत रंजन प्रकाराला म्हणजे कथाकीर्तनाला तेथे आलेला नसे. तो आपल्याजवळच्या नातलगाला—गाडगेबाबाला भेटण्यासाठी तेथे येई. त्या सेवाव्रती तेजःपुंज महापुरुषात भाषणाचा कृत्रिम आवेश किंवा कलात्मक ललित शब्दांचा फवारा नसे. रोजच्याच व्यवहारातले साधे पण टिकाऊ शब्द तो बोले. बोलण्यात

उमाळा असे. सहजपणा असे. ज्ञानेश्वर–तुकारामाच्या वाणीशी नाते सांगणारी एक धुंदी असे. गायेच्या रक्ताचा जिव्हाळा त्यात असे. इंद्रायणीचे, चंद्रभागेचे तीर्थ शिंपडल्यासारखा थंडावा मनाच्या जखमेवर पडे. नेहमीच्या कीर्तनकारासारखे त्यांचे श्रोत्याशी परकेपण नसे. मोरोपंतांचे किंवा कुण्या पंडित कवीचे छापील पुस्तक गाडगेबाबांच्या जिभेवर नसे. स्वयं भगवद्गीता आपले रूपडे पालटून त्या म्हाताऱ्याच्या चेहऱ्यातून प्रगट होई आणि जनतेच्या रोजच्या दुःखाशी ती अनेकदा गोड बोलतच नसे. खडसावून बोले, कळवळून सांगे, मेल्या जीवनाची थट्टा करून ती अमृत देई. बापाने चिडावे, मायने सावरावे हा प्रकार त्यांच्या ओघवत्या शब्दांतून साधे. असा कीर्तनकार झाला नाही. त्याचे तोंड बोले. त्याचा टाळ पखवाज बोले. त्याच्या चिंध्या, त्याचा खराटा, त्याचे गाडगे सारे एकदम बोलत. म्हणून लोक ऐकत.

लोकांना या काळी काल्पनिक कथा नको होत्या. 'जेहेत्ते कालाचे ठायी'' 'मग नारदमुनी ब्रह्मदेवादिकांसहवर्तमान' हे असले 'कधीतरी घडलेले' नको होते. काल्पनिक कथांचा सारा ठेका त्यांनी शहरी वाचकांना दिला होता. लोकांना हवी होती त्यांची स्वतःची सुखदुःखे. पुराणातले विदुषक त्यांना नको होते. स्वतःच्याच जीवनातील विसंगती कुण्या समर्थाने उलगडून दाखवावी, तिच्यावर आपण हसावे आणि हसत असतानाच ती नाहीशी करण्याचा चंग बांधावा या संधीची वाट ते पाहात होते. ती हाक या गाडगेबाबांनी ऐकली होती.

गाडगेबाबांचे पूर्वजीवन मामाघरी गेले. ढोरे चारण्यात आणि नांगर हाकण्यात. तेथे त्यांना दरिद्री वऱ्हाड भेटला. तो कर्जबाजारी होता. कर्जाने खंगलेला पण तितकाच निढावलेला. अपमानाची लाजच वाटू नये असा. सावकाराच्या पाशात सारी काळी गेलेली. राबणारे हात व्याज चुकविण्यात गुंतलेले. तरुण डेबूजी हे पाहात होता. वेडे होऊन काहीच न सुचून पाहात होता. मनाच्या कोपऱ्यात एक कथानक, एक वादळ वाट पाहात होते. एके दिवशी स्फोट झाला. व्यवहार न साधलेला हा वऱ्हाड भलतेच काही तरी साधून बसला. खोटे हिशेब लिहून कर्ज फुगवणाऱ्या सावकारी हातावर डेबुजीचा हात आदळला. डेबुजीने (गाडगेबाबा) दाखवून दिले, ''या वऱ्हाडच्या हातात लेखणी येणार नसली तर लाठी येईल.'' जुलमी सावकाराला डेबूजीने काठी दाखवली, पण विदर्भाच्या हातात विद्यावती लेखणीच शोभू शकेल असे त्याला वाटू लागले. त्याने घर सोडले.

साक्षरतेच्या माध्यमाशिवाय जनता सुविद्य, जागृत होऊ शकते या निर्धाराने त्यांनी हा अलौकिक कीर्तनप्रकार चालू केला. विदर्भाच्या हाती लेखणी देणाऱ्या डॉक्टर पंजाबरावांना आशीर्वाद दिले. उरलेल्या निरक्षरांचे जंगम विद्यापीठ चालवायला हे वऱ्हाडी तुफान मग वेग घेऊ लागले. कीर्तनाचे विषय त्यांना मग अवलोकातूनच मिळू लागले. शिळे तुकडे हाच त्याचा पगार! आणि हे शिळे तुकडे ज्याच्याकडून घ्यायचे त्याला जंगलचे इंधन आणून द्यायचे. तत्त्वज्ञानाच्या ग्रंथातच जाम अडून बसलेले असंग्रह, अपरिग्रह, निर्लोभता, वैराग्य, ब्रह्मचर्य इत्यादि इत्यादि त्याला 'अक्षराविनाच' झोंबू लागले. 'शब्दाविना संवादू' लागले. घाण दिसेल तेथे झाडावे. व्यसने दिसतील तेथे कानउघडणी करावी. वाईट हौशी दिसल्या तर त्याची थट्टा करावी. इतकी थट्टा की स्वतः हौशाच तिऱ्हाईत होऊन हसावा. आणि त्या सर्व व्यसनांना व हौशींना तो मगच सदाचाच तिऱ्हाईत व्हावा.

गांधीजींच्यासाठी ही विदर्भभूमी स्वतः संत गाडगेबाबांनी झाडूनपुसून लख्ख केली. प्रत्यक्ष जीवनातून सुचलेल्या लकबीचे आणि वक्तृत्वाचे नमुने कसे असतात बघा—

खडकारी पुऱ्यातलेच ते कीर्तन थोडे आठवते. बाबा कुण्या उकंड्याची कहाणी सांगत होते.

"तर मंग काय होते का थो उकंड्या जाते शेजाऱ्याकडे. कुठे जाते?"

"शेजाऱ्याकडे" हे उत्तर साथी मंडळींनी पखवाजीच्या नादासोबत दिलेले.

"जाते तर काय होते म्हणता पुढे? का गा शिवराम, तुझ्या जवय दोन पैसे चिल्लर आहेत काय? शिवराम उत्तर देते— "

"ना ऽ ऽ ऽ ही." पुन्हा मृदंगाच्या तालावर साथी मंडळी.

"देनं गा असन तर— "

"ना ऽ ऽ ही!"

"त्याचं काय झालं की म्या मघाचं मडकं साता पैशांचं घेतलं— तुले असते तर नाही म्हटलं नसतं."

"मंग शिवराम धोतरात खाल्यासारखा चार घरी धुंडते. उत्तर काय?"

"ना ऽ ऽ ऽ ही"

" आता शेठजींची गोष्ट ऐका. भुरुमल जाते रसिकभाईकडे. शेटजी दस की चिल्लर हैं क्या ? "

" ना ऽ ऽ ऽ ही ! "

" अजी देता था. लेकीन सब पाच पाच सोकी नोटे है "

" आता सांगा हे झालं कसं ? बोला ? टुठल विठ्ठल विठ्ठल—— "

अवघ्या दीड मिनिटात दोन भयाण विषम चित्रे लोकांसमोर उभी करून मग या अवदशेला कारण होणाऱ्या व्यसनावर ते बोट ठेवीत. चिडून म्हणत,

" काऊन झालं असं ? "

आता एखाद्याला वाटावे की बाबा त्या मार्क्स-लेनिन, कॅपिटालिस्ट वगैरेवर बोलणार. पण नाही—

" अरे आपलाच पैसा खोटा. दुसऱ्याले बोल लावून तुमाले लक्ष्मी परसन्न होणार— "

" ना ऽ ऽ ही ! "

" मंग हे काऊन झालं ? आठवा तुमचे शंकरपट. अरे बैलाले कोंभे देता. रगत काढता. तुम्ही कसे तरान ? शंकराचा सराप घेता ! दोन पैसे इकून तिकून जेमले तर बिड्या ओढता. बिडीचा झुरका मारल्याशिवाय तुमाले परसाकडे होत— "

" ना ऽ ऽ ऽ ही ! "

" मायाऽहो ! मानसाले दारू सोडाले लावा. लावानना ? असं अरामानं हो नोका म्हनू. मोठ्यानं म्हना. घ्या सर्वे शपथ. दारू पेनार— "

" नाऽऽही ! "

" बिडी ओढणार— "

" नाऽऽही ! "

" शकरपट खेयनार— "

" नाऽऽही ! "

" बोला टुठल विठ्ठल विठ्ठल— "

व्यसनापासून, अज्ञानापासून लोकांना मुक्त केले. भागवतधर्माला बडव्यांनी व पुजाऱ्यांनी दिलेले हिडीस स्वरूप पार बदलून टाकले. पंढरपूरच्या मराठा धर्मशाळेत मी पाटी पाहिली,

" येथे बडव्यांना यायला मनाई. " पुन्हा तेथेच वाचले, " गैरवाजवी पैसा

कोणी कोणाला देऊ नये.

देणाऱ्याने देऊ नये.

घेणाऱ्याने घेऊ नये. ”

हजारो यात्रिकांची सर्व तीर्थांच्या ठायी सोय केली. धर्मशाळा बांधून. नदीवर घाट बांधून. वरून पुन्हा निरिच्छ. स्वतः धर्मशाळेची, त्या प्रासादतुल्य वास्तूची पायरीही चढले नाहीत. महाराष्ट्रातल्या शहाण्या लोकांच्या हाती सारा कारभार दिला.

हा माणूस परवापरवापर्यंत आमच्यात होता. इतर ठिकाणांप्रमाणे येथेही यायचा. कीर्तन करायचा. रस्ते झाडायचा.

हा माणूस असाच आमच्या अमरावतीला ५७ साली आला. खंगलेला दिसला. म्हातारपण लपू शकत नव्हते. जन्मभर कदान्नावर जगलेला देह कोलमडू पाहात होता. रावापासून रंकापर्यंत सारे त्याच्या पायाजवळ जमले. आजवर नाकारलेला थकवा या वेळी म्हाताऱ्याने कबूल केला. जरासा भुईवर लेटायला तयार झाला.

वाटले—गाडगेबाबा आता या आजारातून दुरुस्त होईस्तो तरी येथेच राहतील. बुढा खरा म्हणजे जन्माने वऱ्हाडचा, पण कोठेहि फिरे. साऱ्या महाराष्ट्रात, गुजरेत आणिकही कुठे. आमचा असूनही आमचा म्हणून मिरवण्याची आम्हाला सोय नव्हती. कुठलेकुठले तरी लोक त्यावर आपला अधिकार सांगत. आपलाच बुढा आपल्या हाती नाही मग आम्ही आमची बाजू तरी कशी सावरणार ? पण चला, या वेळी तरी त्याचा भल्ला मुक्काम येथे होणार होता.

पण आशेच्या नाड्या सुटत चालल्या. सरकारी दवाखान्यात बुढा रमेना. शहराचे दैनिक त्याच्या तब्येतीबद्दल लोकांना सांगे. पण लोकही त्याचे भाऊबंदच. त्यांचे सांगीवांगीने समाधान होईना. वऱ्हाडचा उमाळा, वऱ्हाडची काळजी खेड्यापाड्यातून हजारोंच्या संख्येने दवाखान्यावर गर्दी करू लागली. आपल्या बापाची चौकशी करणाऱ्या त्या मंडळींना कसे आवरावे हेच अधिकारी वर्गास कळेना. फाटकाजवळच सारे अपंग भिकारी बसून त्या गर्दीत भर घालू लागले. आपण पोरके होऊ की काय ही दुःशंका त्यांना आली होती.

गाडगेबाबा कोणाचेही न मानता दवाखान्याच्या बाहेर आले. लोकांना त्यांनी सांगितले, “ अरे मले काय धाड झाली ? उगे राहा. कल्ला नोका फाडू. म्हणा—

“ गोपाला गोपाला

देवकीनंदन गोपाला."

आणि हे चैतन्य तशा अवस्थेतही खाटल्यावर पडायला तयार नव्हते. त्यांना मोटारीत ठेवले. भरधाव वेगाने मोटार चालू द्या म्हणत. शेवटीही त्याने वेगावरचे प्रेम सोडू नये.

दिवसामागून दिवस चालले. एक सकाळ उगवलीच नाही. कान आणि मनं भेदीत लाऊडस्पीकर साऱ्या गावभर फिरला, " गाडगे बाबा गेले."

त्यांच्या चितेच्या आभाळभिड्या धुराकडे पाहात असताना चंदनकापराचा गंध मनाला विचारीत होता,

" गाडगेबाबा कुठं गेले ? "

लोक उत्तर देत होते, टाहो फोडीत–

" गोपाला, गोपाला
देवकीनंदन गोपाला."

महाराष्ट्र टाईम्स : ९ डिसेंबर १९६२

क्र. ........

# श्री आडकुजी महाराज

अमरावती जिल्ह्यात वरखेड हे गाव पुष्कळांना परिचित आहे. दिवाळीच्या सुमारास विदर्भाची गहन रात्रीसारखी काळीभोर जमीन ऐन पिकावर आलेली असते. धांड्यांच्या पोटऱ्यातून कोवळी कणसे सुटू लागतात. तांबडीपिवळी फुले व अर्ध्या कच्च्या बोंड्या लेवून पऱ्हाटीची शेते डौलात डुलत असतात. तशीच तपाड जमीन असली तर तिच्यात कुठे कुठे कापूस शिंतडलेला दिसतो, रानात खरीखुरी लक्ष्मी वसतीला आली असते. नुकतीच दिवाळी साजरी झालेली असते. खाण्यापिण्याची, गाई खेळण्याची आणि वाजवण्यागाण्याची हौसही मनमुराद फिटलेली असते. गावातला तरुण गवळण होऊन किंवा दंढारीतली बहुविध सोंगे घेऊन नादलाकुदला असतो. आता खरे म्हणजे त्या आनंदी थकव्यात जराभर लेटावे, झालीच तर शेतकामाकडे थोडीशी नजर वळवावी. वानरांनीही याच महिन्यात भरपूर काम शेतात वाढून ठेवलेले असतेच. तिकडेही लक्ष देणे प्राप्तच असते. थंडी वाढायला लागते. रात्री सोकाऱ्यांना सुद्धा बाहेर पडवत नाही, वाढत्या कडाक्याला भीक जर घालायची नसेल तर मात्र मजा असते. भाऊबीजेचा चंद्र रोज रोज वाढत असतो. त्याच्या टवटवीत प्रकाशाने वावरातली श्रीमंती उजळून निघते. बहिणीला भाऊबीजेच्या दिवशी काही कमीजास्त देणे घडले तरी तशा वेळी त्याचे काही वाटत नाही. सारे वातावरण तृप्तीची नशा प्यायले असते. टायकळच्या रानफुलाचा, भरत चाललेल्या तुरीचा, जोंधळ्याचा उग्र मधुर वास साऱ्या आभाळाला गुदगुदल्या करीत असतो. असे हे सुगीचे

दिवस वैभवाचे आणि जबाबदारीचेही. पण का कुणास ठाऊक, तेथल्या कास्तकार मंडळीचे लक्ष अजूनही आपल्या वावराकडे लागलेले नसते. पोरासोरावर चिडण्यात अर्थ नाही आणि तरणेही अगदी वाया गेल्याचे मनापासून बोलण्याची सोय नाही. कारण म्हातारी पिकली माणसही अजून खरे म्हटले म्हणजे सुस्तच असतात. दिवाळी बऱ्यापैकी गाजवल्याचे समाधान त्यांच्या मनात असते पण ते एकतर्फी असते. अपुरे असते. दिवाळीपेक्षा जरतारी अशा एका भव्य आनंदात दोन पावले टाकून धन्य होण्याची मनीषा ल्हानापासून थोरापर्यंत सर्वांना लागून राहिलेली असते. त्या भव्य आनंदाचे निधान असते आरंभी सांगितलेले वरखेड.

वरखेडला बाराही महिने येरव्ही तसे काही नसते. कधीकाळापासून नांदलेल्या चार दोन हवेल्या आणि सोबतची तीन अडीचशे कोलारू घरे. यात आपले शेतकरू जीवन जगणारी सातआठ हजार मंडळी. याहून जास्त काही नाही. मग हे इतके काय विदर्भात येवढ्या एकाच ठिकाणी आहे ? इतर दहा गावासारखे हे गाव. खुद्द तिथलीही माणसे तेथे रोज रोज राहून कंटाळावीत. अमरावतीला पळावीत. पण हेच गाव वर्षांतून चार दिवस साऱ्या वऱ्हाडाचे 'लक्ष्य' होत असते. अचानक एक नवा दिवस उगवतो. गाव खडबडून जागे होते. दूरदूरचे दुकानदार आपले सामान लादून गाड्या-गाड्यांनी त्या गावात शिरतात. एक एक दोन दोन, तीन तीन आणि मग दहा दहा व वीस वीसच्या तुंग्यांनी साऱ्या दिशामधून जनसमूह ओतला जातो. गावावर अल्पावधीत रंगीबेरंगी जत्रेची कळा येते. ठेवणीतले कपडे चढविलेली रंगीत माणसे रंगीत बोलणी बोलत त्या गावाच्या रस्त्यारस्त्यावर दिसायला लागतात. मग गाव एकदम सावरतो. दिवाळसणातही दुर्लक्ष झालेल्या भिंती सारवल्या जातात. रस्ते स्वयंस्फूर्तीने साफ होतात. स्नात निटिलावर गंधरेखा उमटावी तशा स्वच्छ भिंतीवर धार्मिक वाक्यांची रेखा उमटते. 'जयगुरु, जयगुरु, जयगुरु !' म्हणजे हे तिथले नमस्कार. थोडेसे जयहिंद सारखे वाटतात. आहेतही. एकभारतीयतेची व्यापक कल्पनाच त्यात असते. त्या राष्ट्रीय भावनेवर शिवाय पावित्र्याचा भगवा रंग चढत असतो. म्हणून देशभक्ती व देवभक्ती या दोहोंची आठवण त्या 'जयगुरु' तून होते. या 'जयगुरु' मधला गुरु येथेच थांबत नाही. तिथल्या घोषात, एकत्र येण्यात, गाण्यात सर्वच कार्यक्रमात त्या शब्दाची लाखो वेळा पुनरावृत्ती होत असते. लाऊड स्पीकरच्या कर्ण्याजवळ तुम्ही थांबा. तेथे एखादी भजनाची प्लेट वाजत

असलेली ऐकाल, 'गुरुदेव हमारा प्यारा। है जीवन का उजियारा ॥' कोठे तीनचार हजार माणसे शिस्तीत जमून शांतपणे ध्यान करताना आढळतील. मधूनच त्यांच्यासमोरचा एखादा सेवक आपल्या गोड आवाजात गायला सुरुवात करील 'श्रीगुरुदेवकी महिमा न्यारी जड बुद्धि चेतन कर डारी ॥' आणि अशी त्याची प्रार्थना संपली की ती आतापर्यंत शांत बसलेली जनशक्ती एकदम गर्जना करील, 'श्रीगुरुदेव की—जय, श्रीगुरुदेव की जय.' बरे, ऐन जेवणाच्या वेळेला फिरा. भव्य मंडपात हजारोंच्या संख्येने पंगत बसलेली असेल. स्वतः राष्ट्रसंत तुकडोजी महाराज दोन्ही हात भरभरून यात्री मंडळींना आग्रह करताहेत असे दृश्य दिसेल. आणि तेथेही एकदम 'गुरुदेव' प्रगट होतील–मधूनच कोणी जेवणारा अथवा त्यांना जेवू घालणारा आपले काम थांबवून श्लोक खडा करील, "गुरुदेव सेवा मंडळाचे कार्य ना माझे तुझे। परि वतनाला ठेविजे सत्कार्यकर्मी जागिजे।..."

वऱ्हाडचा कास्तकार खेडुत ज्या यात्रेची वाट पहातो ती वरखेडची कार्तिक पौर्णिमेची यात्रा अशा धडाक्याने सुरू होते. शेकडो गावावरून येथे माणसे येतात. धान्य येते. वर्गणी येते आणि आनंदाच्या जल्लोषात 'गुरुदेव' हे नाव पुन्हा पुन्हा दुमदुमत रहाते. चार दिवस हा गुरुदेवाचा सोहळा चालतो आणि उरलेल्या संपूर्ण वर्षासाठी चैतन्य भरभरून यात्रेकरू आपापल्या गावी परततात. हे चार दिवस तसे म्हटले तर विदर्भाच्या एकंदर यात्री वृत्तीस फार नव्हे. येथे ऋणमोचन, बहिरम इत्यादि स्थळांच्या यात्रा चांगल्या महिना महिना चालतात. त्या मानाने चार दिवस म्हणजे फारच आखूड काळ. पण येथे नुसता कालाचाच नव्हे सर्व कार्यक्रमातला आटोपशीरपणा पाहायला मिळेल. थोड्यात गोडी बरी. या आटोपशीरपणाचे आणि गोडव्याचे सारे श्रेय अर्थातच श्री. तुकडोजी महाराज यांना. त्यांच्याच प्रेरणेने हा गुरुदेवाचा सोहळा गाजतो. चार दिवस वरखेडला सुसंस्कृत पंढरीचे रूप येते. तिऱ्हाइताला या गाजणाऱ्या गुरुदेवाचे कोडे असणार. तुकडोजीना आवडणारी भगवी टोपी घालून यात्रेत मिरवणारी भक्त मंडळी तुम्हाला भेटली तर त्यांच्या परीने ती उत्तर देईल, "आम्ही गुरुदेव या शब्दाचा अर्थ राष्ट्रसंत तुकडोजी असाच घेतो." त्यांच्यापुरते हे त्यांचे उत्तर खरेही आहे. श्री. तुकडोजींना जर विचारले तर तेही कदाचित असे म्हणतील, "आमच्या समुदाय प्रार्थनेत जे ध्यान करायचं असतं ती देवता एक नाही. ज्यानं ज्यानं आपल्या इष्टमूर्तीचं ध्यान करायचं असतं.

म्हणूनच गुरुदेव हा ज्याचा त्याचा स्वतंत्र आहे. " तुकडोजीना साकार भक्ती पटत असली तरी नाना पंथ, धर्म, जाती याचा विचार करून त्यांनी ध्यानाबाबत इष्टदेवतांची विविधता मान्य केल्यामुळे अमक्या एका मूर्तीकडे बोट दाखविण्याची अर्थातच सोय नाही. म्हणून त्यांच्या सर्व भक्तांचे व तुकडोजींचे उत्तर त्या त्या मानाने खरे आहे. पण ते खरेपण आजचे आहे. श्री. तुकडोजींच्या कार्याचा व्याप जसा वाढत गेला, जीवनाची अनेक अंगे त्यांनी आपल्या सेवेने स्पर्शिली तसतशी त्यांच्या एकंदर कार्यप्रणालीची स्वरूपेही बदलत गेली. या सर्व सेवा-सुमनांच्या ढिगाऱ्याआड तुकडोजींचे आणखी एक रूप दडले आहे. तशीच वेळ आल्याविना ते रूप त्यांना फार आठवतही नसेल. त्या रूपाला जर ' गुरु-देव ' या शब्दाचा अर्थ विचारला तर त्याचे उत्तर निश्चित वेगळे मिळेल. आणि ते कोणते मिळेल याचा अंदाज घेत असतानाच मनासमोर वीसपंचवीस वर्षा-पूर्वीच्या काही मंगल सकाळी उभ्या होतात. महाराष्ट्रातल्या वारकरी पंथांशी जुळणारे एक मधुर वातावरण प्रगट होते. तुकडोजी यांचे आजचे कार्य महात्मा गांधींच्या रचनात्मक कार्याशी जुळणारे आहे. त्यावरची आजची पुटे उकलून पंच-वीस वर्षांपूर्वीच्या त्यांच्या कार्याकडे पाहिले तर आजच्या कर्मयोगापेक्षा जन-जागृतसि त्या वेळी अत्यंत आवश्यक असणारा भक्तियोग आढळतो.

भक्तियोग आला की त्यात गुरु, गुरुमहात्म्य इत्यादी गोष्टी येणारच. सुमारे पंचवीस वर्षांपूर्वी श्री. तुकडोजींच्या प्रेरणेने गावोगाव सकाळी रामधून व्हायची, आरती असायची. त्या सर्व धार्मिक कार्याचे स्वरूप आजच्यासारखे मूर्तिनिरपेक्ष नव्हते. सर्व लोक एका निश्चित मूर्तिचे ध्यान व पूजन करीत. शेवटी असणाऱ्या आरतीत त्या सद्गुरु देवतेचा उल्लेख असे—

" श्रीमत् आडकुजी पदा भज मना, मग जन्म नाही कदा."

असे ते अष्टक अथवा आरती असायची. आज तुकडोजींच्या कार्याचे प्रमुख केंद्र गुरुकुंज मोझरी येथे आहे. आडकुजीसंबंधित वातावरण तेथे क्वचितच पाहायला मिळेल. आपले इष्टदैवत इतरांवर न लादण्याच्या सहिष्णू धोरणामुळे ते तसे असेल. पण वरखेडला कार्तिकी पौर्णिमेस होणारा उत्सव मात्र आडकुजी महाराजांची स्मृती दरसाल जपतो. अनेकविध कार्यात मग्न असलेले महाराज वेळात वेळ काढून तेथे येतात. मग गुरुकुंज मोझरीचा चार दिवसांसाठी सर्वांनाच विसर पडतो. या पंचवीस वर्षांतली आपल्या कार्यातली उत्क्रांतीही



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वामित्व
क्रमांक ७३८५८ वि: मिवधि
तारीख १९८२ ... ४/३/८२

तेथे थबकते व या आध्यात्मिक देशसेवेस तुकडार्जीनी जेथून आरंभ केला होता त्याच केवलाचे भान तेथे उरते. विश्वाचा राजा झालेला माणूस आपली राजधानी सोडून आपल्या खेड्यात आईच्या समाधीजवळ यावा तसा प्रकार घडतो. या पिढीला दिसलेल्या गुरुदेव मंडळाच्या सेवाकार्याची गंगोत्री ही अशी वरखेडला आहे.

गुरूचे अथवा व्यक्तिपूजेचे प्रस्थ माजविण्याचे हे दिवस नव्हेत. त्यामुळेच तुकडोजींनी आपली गुरुभक्ती समाजसेवेत विलीन करून टाकल्यासारखी केली. आपल्या मातृतुल्य गुरूचा आदर त्यांनी वैयक्तिक स्वरूपातच कायम ठेवला. वास्तविक पाहाता कोणताही पट्टशिष्य जन्मभर आपल्या गुरूची प्रशस्ती मिरवीत जन्म कंठीत असतो. त्या गुरूच्या नावावर चेले मिळवून त्या सर्वांना व्यक्तिपुजेच्या भजनी लावतो. येथे प्रकार फारच वेगळा आहे. आडकुजी महाराज यांचा चेला तुकडोजी आपल्या गुरूची मूर्ती ध्यान करणारावर लादत नाही. गुरूभक्तीचे पारंपारिक स्वरूप येथे आढळत नाही. देवदर्शन घडविल्यावर मध्यस्थाच्या भूमिकेत असलेला गुरु दर्शनाच्या वेळी विलीन होतो अशी धारणा आहे. ती येथे अशी खरी झाली आहे. लोकांना राष्ट्रदर्शनाचा व्यापक कार्यक्रम देऊन आडकुजी यांची गुरुमूर्ति येथे जणु स्वतःच विलीन झाली आहे.

तरीही कुतूहल म्हणून काही बाब असतेच. गुरुदेव सेवामंडळाचे प्रणेते तुकडोजी हे अखिल भारतीय साधु समाजाचे अध्यक्ष, एक धार्मिक देशभक्त व समाजाग्रणी इत्यादी अनेक नात्याने पं. नेहरू, माजी राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद वगैरे थोर थोर मंडळीच्या मनातून मान्यता पावलेले परंपुरुष आहेत. येवढ्या मोठ्या व्यक्तीच्या तर साध्या कुत्र्याविषयीही लोकांना ऐकण्याची उत्सुकता राहणार. मग आडकुजी महाराज हे तर त्यांचे साक्षात गुरु! संत गाडगेमहाराजांनी आपल्या वैयक्तिक नातेसंबंधीयांचे स्तोम माजणार नाही ही खबरदारी घेतली तरी हिंदी जनतेची आदरभावाची रीत गेली नाही. गांधीजींचा चष्माही त्यांच्या संपर्काने पावन झाला असे मानणारे आम्ही. त्यामुळे गाडगेबाबा किंवा तुकडोजी यांचा दूरचाही एखादा नातलग आमच्या उत्सुकतेचा विषय असतो. त्यातून आडकुजी तर तुकडोजीचे आध्यात्मिक नातलग, त्यामुळेच आडकुजीचे नाव नुसते ऐकून माहीत असलेले लोक त्यांच्याविषयी अधिकाधिक जाणण्याची इच्छा करतात. पण दुर्दैवाने त्या विभूतीबद्दल फारशी माहिती मिळत नाही. विदर्भाला

संत जपण्याचा छंद आहे; पण त्यांची सांगोपांग माहिती जपण्याची वृत्ती त्यात नाही. म्हणूनच बरीचशी ऐकीव व थोडीफार छापील उपलब्ध माहितीच काय ती सध्या हाती आहे.

पुरते एक शतक जगलेली ही विभूती; पण सर्व आयुष्य त्यांनी अवलियेपणात लावल्यामुळे विधायक अर्थ काढण्याइतपत त्यांच्या जीवनात बुद्धिवाद्यास शिरता येत नाही. त्यांचा जन्म १८२० साली कार्तिक पौर्णिमेस झाला आणि १९२१ साली ठीक कार्तिक पौर्णिमेसच त्यांनी देह ठेवला. त्यांचा जन्म वर्धा जिल्ह्यातील आर्वी या तालुक्याच्या ठिकाणी झाला. वडिलांचा धंदा कासारीचा होता. आपल्या मुलाने धंद्यापाण्यास लागावे ही स्वाभाविकपणेच पित्याची इच्छा होती. पण जन्मापासूनच वैराग्याकडे कल असलेले हे बालक ऐहिक बाबींत रमूच शकले नाही. पांचव्या वर्षाचे असतानाच त्यांची आई मरण पावली. वैराग्याला हेही एक कारण मिळाले. मग घरच्या कोणातही ते रमू शकले नाहीत. मुक्त मनाने भटकणे, छंदिष्टपणे जीवन घालवणे त्यांना आवडू लागले. पित्याला मुलाचे हे वागणे अर्थातच परवडणारे नव्हते. त्याने त्यासाठी कितीतरी उपाय केले. मुलाचे मन मात्र घरात काही केल्या लागेना. त्याच्या एकांतप्रियतेस व निर्हेतुक भटकण्यास लोक वेडेपणा म्हणू लागले. आईवेगळे हे बालक म्हणून त्याच्या मातृवियोगास त्याच्या वेडेपणाचे कारण ठरवले जाई. पण या पोरक्या पोराच्या चेहऱ्यावर आई मेल्याचे दुःख कोठेही दिसत नव्हते. तो आपल्याच नादात राही. शहाण्यांनी लाख समजावल; पण पालथ्या घागरीवर पाणी !

अशा ' अभंड ' पोरांना वठणीवर आणण्याचा एक लौकिक उपाय आहे. मी मी म्हणणारी नाठाळ पोरे एकदा लग्न झाले की ताळयावर येतात. संसाराच्या गाड्याला जुंपले गेले की त्यांचे उंडारलेपण जाते. जनरुढीप्रमाणे आडकुजीच्या बापानेही या वेडसर व ' मनमाने ' पोराचे लग्न उरकून टाकले. त्या वेळी त्यांचे वय अठरा वर्षांचे होते. एकदाचे लग्न झाले आणि पोरगा वळणी लागण्याची वाट पाहात बाप बसला.

झाले ते उलटेच. मुलाचा पिसेपणा पूर्वी होता त्यापेक्षा रतिभरही कमी झाला नाही. लग्न झाले हे त्याच्या गावीच नव्हते. एका उन्मुक्त व चेतन अवस्थेला खाली ओढण्याचा तो एक लंगडा प्रयत्न ठरला. पोराच्या त्या परमहंस स्थितीत लग्न या घटनेला स्थानच नव्हते. चेंडू दाबला की जास्त उसळावा तशी त्या

पोराची उन्मनअवस्था जास्त नावरती झाली. आतापर्यंत तो आपल्याच नादात पण मुकाटपणे भटकत असे. लग्न झाल्यानंतर मात्र त्या पवित्र पिसेपणाचे स्वरूप पालटले. एक वेगळा आणि गडद रंग त्याच्या अवलियेपणाला चढला. तो आपल्याच तंद्रीत धावत असताना त्याला नेसत्या वस्त्राचेही भान राहिनासे झाले. लग्न होऊन नग्न झालेली ही विभूती स्वतःशीच मोठमोठ्याने हासे, असंबद्ध बडबड करी आणि भटके. हे सर्व पाहिल्यावर लग्नाचा तोडगा उपयोजणारी मंडळी हतबल झाली. आडकुजींचा वाढता पिसेपणा एकप्रकारचे स्वसंरक्षणही असण्याची शक्यता आहे. कारण त्यांचा पिसेपणा जसा वाढत गेला तसा त्यांना पुन्हा संसाराच्या वेठीस लावण्याचा प्रयत्न ढिला होत गेला. लग्नानंतर अख्खे तप त्यांनी अशा वेडसरपणात राहून काढल्यामुळे घरच्या व गावातल्या मंडळींनी त्यांचा नाद सोडला. आपल्या पिसेपणाचा उद्देश सफल झाला असेच जणु काय वाटल्यामुळे मग श्री आडकुजी यांनी त्या पिसेपणाचे तीव्र स्वरूपही मागे घेतले. आताचा अडथळा बाजूला सरला. पुरेशी शांतता त्यांच्या जीवनात आली. मग वयाच्या तिशीच्या सुमारास त्यांनी बडबडणे वगैरे सोडून दिले. जणु काही लाभलेला शांतपणा मनमुराद भोगण्यासाठी ते आता मोकळे झाले होते. त्यांनी एकदम मौनवृत्ती अंगिकारली. कोणाशीही बोलण्याचालण्याचे अगर कसलेही संबंध न ठेवता ते मूकपणाने स्वतःमध्ये तल्लीन राहात. फार फार तर एखादे वेळी आपल्या वेडेपणाचे अस्त्र ते प्रगट करीत. अर्थातच त्यांच्या तल्लीनतेला जड जगाचा बाध आला तरच ते तसे करीत असावेत.

मनोमन साधना करण्यात व आपली ‘ अवस्था ’ टिकविण्यात आयुष्याची तिजाई खर्ची घातल्यावरही त्यांनी एकदम आध्यात्मिक स्वरूप प्रगट करण्याची घाई केली नाही. आपल्याला खूप आयुष्य आहे याची त्या माहात्म्याला जाणीव असणे असंभवनीय नाही. शिवाय प्रत्यक्ष लोककल्याण करणे हे त्यांचे अवतार-कार्यही नव्हते असे दिसते. स्वतःपुरती साधना करून स्वतःच मोक्ष मिळवणे व त्या साधनेचा जनकल्याणासाठी उपयोग करणे असे योग्यांचे दोन भाग आहेत. लोकांच्या उपयोगी पडणारा योगी अर्थातच लोकांना आवडतो. आपल्या शक्ती जो योगी लोककल्याण साधण्यासाठी उपयोगात आणील त्याची शक्ती अर्थातच वाढते. त्या लोकसेवेचा त्याच्या मोक्षासाठी त्यामुळे उपयोग होतो. पण तशा कर्मयोगाची रीत सर्वच साधूंनी अवलंबिली पाहिजे असे बंधन नाही.

लोकसंग सोडून आत्मकल्याण साधणारे योगीही पूज्यच होत. कर्मयोग आचरताना बरेचदा त्यात गुंगून पडण्याचा मोह साधकाला होतो. म्हणूनच तुकारामादी संतांनी कर्मयोगाच्या तुलनेत भक्तियोग बरा मानला आहे. विशेषत: आपली साधना पूर्ण होण्यासाठी जर जगाचे कल्याण करू गेलो तर साधनाही अपुरी व लोककार्यही अपुरे असे घडण्याची शक्यता असते. श्री संत आडकुजी यांनी आपल्या शंभर वर्षांच्या प्रदीर्घ जीवनात लोककार्य का केले नाही याचे नक्की उत्तर मिळणे अर्थातच कठीण आहे. पण साधना अपुरी असणे किंवा असलेली पूर्ण न वाटणे असे कारण संभवू शकते. त्यांनी जनसंपर्क टाळला हे खरे असले तरी जनकल्याण केलेच नाही असे मात्र म्हणता येणार नाही. कारण जन्मभर खूप साधना करून आपली सर्व शक्ती एका प्रिय शिष्याच्या हाती त्यांनी प्रदान केली. म्हणजे प्रत्यक्ष लोक कल्याण केले नसले तरी अप्रत्यक्षपणे मात्र आपल्या सर्व सत्कर्मांचा ठेवा त्यांनी सर्व लोकांच्या हितासाठी ठेवून दिला.

आध्यात्मिक शक्तीचे आदानप्रधान घडत असते यावर पुष्कळ धार्मिकांची श्रद्धा आहे. पेन्सिलदौत हे जसे दिले-घेतले जाऊ शकते अथवा शिक्षका-पासून विद्यार्थ्यांपर्यंत ज्ञान जसे येऊ शकते तसेच गुरूच्या दिव्य बलाचेही असते. भगवान श्री रामकृष्णांनी विवेकानंदांना सर्व शक्ती प्रदान केल्या होत्या व शेवटी म्हटले होते, "तुला सर्व दिले, आता मी भिकारी झालो." मग पुढे रामकृष्ण विवेकानंदांच्या रूपाने जगले असे म्हणावे लागेल. श्री आडकुजी महाराजांनीही पिसेपणाच्या परकोटाआड खूप जंगी साधना केली व ती शेवटी आपला शिष्य तुकडोजी याला दिली असे म्हणावे लागेल.

आयुष्याची तीस वर्षे वेडसरपणात घालवल्यानंतर त्यांनी गुरुदीक्षा घेतली. त्याची हकीगत मोठी मजेदार आहे. आडकुजी जन्मले त्या आर्वी या गावात 'मायबाई' म्हणून एक महान संत स्त्री राहात होती. आपला वेडसरपणा दाखविण्याच्या काळात आडकुजी तिची टिंगल करीत असत. तिला 'टवळी' म्हणून तिची हेटाळणी करण्यात त्यांना करमणूक वाटे. एक दिवस ते गावात बुटीच्या वाड्याजवळ गोट्या खेळत बसले असताना त्याच बाजूने मायबाई आल्या. आपल्या शिष्यमंडळीसोबत संकीर्तन प्रसंगासाठी त्या गावोगाव फिरत असत. अशाच कोठून तरी कीर्तन करून त्या परत येत होत्या. नित्याच्या संवयीने श्री आडकुजींनी टिंगलीच्या मिषाने मायबाईला तेथे थांबवले. 'ब्रह्म रे

ब्रह्म!' असे काहीतरी बडबडत त्यानी तिला थांबवले व हसत हसत विचारले, 'का ओ टवळे, मले दाखवते काय ब्रह्म?'

मायबाई एकदम म्हणाल्या, "वेड्या आडक्या, वेडा होशील बरं!" पण ब्रह्मदर्शनाचा वेडेपणा आडकुजीस हवाच होता असे दिसते. त्यांनी तिच्या धमकावणीस भीक न घालता 'अरे धुत्' असा बेदरकारीचा उद्गार काढला व म्हटले, "टवळे तुझी काय बिशाद् गे मला वेडा करायची?"

झाले. या प्रसंगानंतर आडकुजी पुन्हा वेडे झाले. पण चेहऱ्यावर दिव्यता मात्र वाढत चालली. हे मुद्दाम पांघरलेले ऐहिक वेड नव्हतेच. ते आत्मप्रत्ययाचे वेडेपण होते. एका ब्रह्मज्ञानी विभूतीचा या जगाशी असलेला परकेपणा होता. आडकुजींचे हे 'वेड' अखेरपर्यंत टिकले. संपूर्ण बाह्य संज्ञाशून्य होऊन ते 'हांडी रे हांडी। दवडी रे दवडी॥' असा घोष करीत धावू लागले. डाळभात मिळविणाऱ्या विद्येची जशी श्री रामकृष्ण परमहंस हेटाळणी करीत तसाच हा प्रकार होता. हांडी म्हणजे मडके. अशा हांड्या व दवड्या ( भाकरी ठेवण्याचे पात्र ) जपणाऱ्या जगाचीच जणू त्यांनी त्या घोषाने निंदा व कीव चालवली. त्या हांडी–दवडीच्या जीवनावर त्यांची मुळीही प्रीती नव्हती हे त्यांच्या आचरणातून बालपणापासूनच दिसत होते. आणि आता तर या जगातली सगळी रुची त्यांनी सोडली. उष्टी शिते दिसतील ती ते खाऊ लागले. गटारनालांचे घाण पाणी ते पिऊ लागले. अंगी संपूर्ण वैराग्य जागल्याची खूण ही अशी. त्यात जशी मोहक वस्तूंची ओढ नाही तशी गढूळ वस्तूंची घृणाही नाही. ही त्यांची अवस्था घालविण्याचा प्रयत्न मायबाईंनी केला नाही. ती अवस्था आपोआप निवळून त्यांना आत्मसाक्षात्कार होईल ही त्यांची खात्री असल्यामुळे त्यांनी घाबरलेल्या लोकांना भिऊ नका म्हणून सांगितले. अशा त्या मायबाई संत आडकुजींच्या गुरु ठरल्या. मायबाई या नाथपरंपरेतल्या आहेत. त्या दत्तपंथातल्या असल्याचेही काही आधार आहेत. श्री आडकुजी यांना त्या परंपरेत अवलिया म्हणून स्थान आहे.

मायबाईकडून ही अवस्था प्राप्त झाल्यावर आडकुजी यांनी गाव सोडला. ते रानोरान भटकले. पैसा व स्त्री यांना त्यांनी स्पर्शही केला नाही. कनक-कामिनी सोबतच कीर्तीचाही त्यांनी त्याग केला. कोणालाही पाया पडू देईनात. अशा पुरुषाच्या मागे त्या काळचा भाविक विदर्भ न लागला तरच नवल. भक्तांनी त्यांना

पोशाख द्यावेत, उत्तम खाऊ घालण्याचा प्रयत्न करावा आणि या मूर्तीने सारी फाडतोड करून पुन्हा रानाकडे पळावे असा क्रम सुरू झाला. त्यांच्या या एकटे फिरण्यात त्यांना त्रासही खूप सोसावा लागला. व्रात्य मुले त्यांची फजिती करीत. त्यांना धोंडे मारीत. खूप खूप भटकल्यानंतर आडकुजी वरखेडला आले. तेथून मात्र ते कोठेच गेले नाहीत. ते वरखेडला आले त्या वेळी त्यांचे वय ६४ वर्षांचे होते.

वरखेडला ते कोणाशी बोलत नसत. लहर लागली तर उर्दू, मराठी व हिंदी भाषेत ते वेदाचे संकेत मात्र बोलायचे. वरखेडच्या लोकांना त्यांची फारशी माहिती नव्हती, पण त्यांचे निरिच्छ वागणे पाहून लोक त्यांची सेवा करू लागले. त्यातच त्यांच्यामुळे अनेक इच्छा पूर्ण होतात असा संधिसाधूंना शोध लागल्यामुळे सकाम भक्त त्यांच्याभोवती गर्दी करू लागले. चिलीम, गादी, सुग्रास अन्न, स्नान इत्यादींनी लोक त्यांची सेवा करू लागले. आडकुजी महाराजांचे मात्र त्यापैकी कशातही लक्ष नसे.

त्यांचे विदेहीपण पाहिलेले लोक सांगतात की पंचपक्वान्नाच्या ताटात आडकुजींचे लक्ष नसे. ते त्यातून जेवीत. सोबतच दोन तीन कुत्रीमांजरी हेही जेवीत. दत्तात्रयासोबत कुत्री असत तसा या दत्तपंथी अवलियाचा खाक्या. ती कुत्री त्यांच्याच सोबत झोपतही. जेवणाकडे त्यांचे लक्ष नसेच. एखादेवेळी भुकेची जाणीव होऊन कोणत्याही जमातीच्या बाईजवळ ते रस्त्यावरच खायला मागत.

त्यांना झालेली आत्मस्वरूपाची जाणीव पटविणारी एक कथा उपलब्ध आहे. गावात कुणाला देवी आल्या म्हणून स्त्रिया मातामायची गाणी म्हणत देवळाकडे चालल्या होत्या. आडकुजींनी त्यांना थांबवले. स्वतःच्याच डोक्यावर अभिषेक करायला लावला. तिकडे त्या देवीच्या रोग्याला आराम वाटायला लागला. त्यांच्यातले देवपण असे पटू लागल्यामुळे त्यांच्या नागव्या देहाचे, शिव्यांनी भरलेल्या वाणीचे कोणालाही काही वाटत नसे. थोर घराण्यातल्या स्त्रियाही निःसंकोचपणे त्यांची सेवा करीत. त्या वेळी देवाच्या दगडी मूर्तीजवळ जाऊन पूजा अर्चा करताना जातिभेद पाळला जाई; पण श्री आडकुजी यांची सेवा करताना भक्त लोक जातिभेद ठेवीत नसत. एकदा एका बारी जमातीच्या इसमास त्यांनी जबरदस्तीने धरून ठेवले. त्याने फारच गयावया केल्या तेव्हा एक शिवी हासडून त्यांनी त्याला

मोकळा केला. तो लगबगीने पाने घेऊन बाजार गाठायला निघाला. रस्त्यात त्याला साप दिसला. महाराजांनी आपल्याला अडवून ठेवले नसते तर आपण प्राणास मुकलो असतो या कल्पनेने तो कृतज्ञ झाला. तसाच एक आणखी चमत्कार सांगतात. वरखेडच्या नदीला पूर आला. पाणी वाढत जाऊन आडकोजींच्या पायांना लागले. त्या पवित्र स्पर्शाने शांत होऊनच जणु ते चिडलेले पाणी परत फिरले. पूर ओसरला. आपल्यामुळे असे काही महान घडले हे त्या अवलियाच्या मात्र गावीही नव्हते. आपल्या कोणी पायाच पडत आहे अशा जाणिवेने ते चिडून पाय हासडू लागले. ' कौन हाये वे ?' म्हणून दरडावू लागले. पाया पडू न देणाऱ्या हट्टी संताच्या पाया आपण पडलो याच समाधानाने ते पाणी परत फिरले असेल. समजणारे हा चमत्कार समजून नाके मुरडतील. पण प्रसिद्ध साधु नागमहाशय यांच्यासाठी गंगा त्यांच्या घरासमोरून वाहिली होती यावर सुशिक्षित धार्मिकांचा विश्वास आहेच.

त्यांच्या बाह्य संज्ञाशून्यतेत कसलेही ढोंग नसावे याचा एक प्रत्यय. ते एकदा पाण्यांत वाहत गेले व गाळात फसले. बुवांना मात्र कसलेही भान नव्हते.

वरखेडचे तुकारामपंत ब्रह्मभट्ट यांची मुलगी मंजुळा एकदा माहेरी आली. आडकुजींनी तिला पाहून आपल्याच लहरीत उष्टा आंबा तिच्या तोंडात पिळला. " आंबा घे, आंबा घे " असे म्हणून तो आंबा तिला दिला. या प्रसंगानंतर ती सासरी गेली. तिला गर्भ राहिला. आडकुजी यांच्या कृपाप्रसादानेच तिच्या पोटी महापुरुषाचा गर्भ राहिला अशी अनेक भक्तांची श्रद्धा आहे. आध्यात्मिक बलाचे प्रदान हे असे झाले. ऋषीच्या प्रसादाने गर्भ राहण्याबद्दल केवळ पुराणात आपण ऐकतो. सश्रद्धांनी जपलेल्या या कल्पनेचा पडताळा पुढे लौकरच आला. तुकारामपंतांची मुलगी प्रसूत झाली. तिला मुलगा झाला. २९ एप्रिल १९०९ सालची ती घटना. ज्या वेळी यावली ( मंजुळेचे सासर ) येथे मुलाचा जन्म होत होता त्याच वेळी अंतर्ज्ञानी आडकुजी तुकारामपंतांना भेटायला गेले. आंबा परत मागू लागले. तुकारामपंतांनी त्यांच्यापुढे पुष्कळ आंबे ठेवले. पण ते घेईनात. तुकारामपंतांना मग कसली तरी उमज पडली. ते लेकीच्या घरी यावलीला गेले. नातू झाल्याचे त्यांना तेथेच कळले. पुढे मुलाला आडकुजींनी पाहिले तेव्हा ते हर्षभराने " माझा आंबा " असे त्या पोरास लाडावू लागले म्हणतात. तो आंबा ऊर्फ मुलगा म्हणजेच आजचे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज. तुकडोजींचे बालपण

आडकुजींच्या सोबत गेले. अमोल वक्तृत्व, संघटनकुशलता, शीघ्र कवित्व इत्यादींनी परिपूर्ण असलेले तुकडोजींचे संत व्यक्तिमत्त्व त्या आडकुजींचाच प्रसाद मानावा लागेल.

त्यांच्या प्रयाणाचा दिवस आला. ज्या दिवशी या जगात आले त्याच दिवशी बरोबर शंभर वर्षांनी ते गेले. जाण्यापूर्वी 'मी जाणार' असे लोकांना सांगून गेले. वाळवंटात खेळत बसलेल्या बाल तुकडोजीला त्यांनी मरणवेळी बोलावून घेतले. 'राम भजो धूप तेजो' हा मंत्र दिला व महाप्रयाण केले.

हा दिव्य पुरुष पुन्हा दिसणार नाही. पण तुकडोजींच्या रूपाने तो जगत नाही काय? त्यांना पाहिलेले लोक सांगत की, ते बघायला चांगले धिप्पाड होते. कुरळे सोनेरी केस, अजानबाहू व सदा उर्ध्वदृष्टी अशी ती मूर्ती! ती पुन्हा दिसणार का?

दैनिक मराठा : २९ डिसेंबर १९६३

# श्री बंडोजी

वरखेडच्या कार्तिकी जत्रेतली गोष्ट. कुणीतरी बोट दाखवले, " हे बंडोजी बाबा. " मी त्या बोटाच्या दिशेने पाहू लागलो. एका ओटीवर पाचदहा माणसे बसली होती. त्यातले बंडोजी कोण ? सारी माणसे सारखीच दिसत होती. ही मंडळी गांजा वगैरे पिण्यातली असावी. इकडे असा गांजाचा षौक करणारी एक पिढीची पिढीच होऊन गेली. गांजा पिऊनपिऊनच ती बरीचशी संपूनही गेली. अगदी घरादारासहित ते रसातळाला गेले. काही त्या अवस्थेत टिकले. रस्त्यावर जगले. कालपर्यंतचे वावरवाले, वाडेवाले आज देवळात, नाहीतर धर्मशाळेत राहू लागले. आणि असे बेवारस जीवन जगता जगताच एक दिवस गांजाची देवता महादेव, तिच्या स्वाधीन झाले. असे बहुतेकच संपले; पण काही जिवंत अवशेष अजूनही कुठेकुठे दिसतात. थोडेसेच उरलेले म्हणून एकदम डोळ्यात भरतात. ती समोरची मंडळी त्याच तोंडवळ्याची होती. सारेच जण कुणीतरी अंथरून दिलेल्या सतरंजीवर बसले होते.

बंडोजी हे त्यात नेमके कोणते हा प्रश्न इतक्यातच सुटला. एक म्हातारासा माणूस तिकडून जाता जाता थांबला. त्या सतरंजीवरच्या मंडळीकडे गेला आणि त्यातल्या एका माणसाच्या पायावर त्याने एकदम डोके ठेवले. मग मी बंडोजीकडे निरखून पाहायला लागलो. गांजा पिणारी मंडळी व बंडूजी यांच्यांत निश्चित असा भेद आहे, वेगळे काढता येण्यासारखे व्यक्तिमत्त्व त्यांच्यांत आहे असे मला पटून गेले. पाहिले तर खरोखरच सगळ्या अंमलबाजांचा स्वभाव, पेहराव

आणि अनेकदा तर तोंडवळादेखील एक वाटतो. ल्हानपणापासून ही कल्पना जपल्यामुळे असेल कदाचित ! पण ते सारखेपण मला नेहमीच अशा समव्यसनी मंडळीत दिसत आले आहे. बंडूजी मात्र यातून कसे वेगळे वाटले, माझ्या मनाने त्यांचे वेगळेपण कसे कबूल केले ते मात्र मलाच कोडे आहे.

ते वेगळे वाटले, त्यांच्या चेहऱ्यावरचे तेज गांजेकसाचे, अफीमबाजाचे वाटले नाही हे खरे; पण त्यांच्याबद्दल तोवर जे ऐकले होते त्याची छाया मात्र माझ्या नजरेत तेव्हाही होतीच. म्हणूनच त्यांच्या अलग चेहऱ्याने एकीकडे भारावून जात असतानाही माझे मन चुकचुकत होते, " अरेरे, एवढ्या मोठ्या राष्ट्रप्रसिद्ध संताचा बाप; पण दिसतो कसा सामान्यातूनही ढळलेला ! "

श्रीतुकडोजी महाराजांचे वडील बंडोजीबाबा यांचा माझ्या मनावर पडलेला हा पहिला ठसा. नंतर एकदोनदा पुन्हा मी त्यांना पाहिले. त्या पाहण्यापेक्षा त्यांच्याबद्दल ऐकायलाच मला जास्त मिळाले. सामान्यपणे त्यांच्याबद्दल लोक बरे बोलत नसत. त्यांचे गांजा पिणे व तशाच मंडळीच्या संगती राहणे हे तर त्याचे प्रमुख कारण होतेच; शिवाय तुकडोजी महाराज व त्यांची आई यांची बंडोजींनी फार आबाळ केली म्हणूनही लोकांचा त्यांच्यावर बराच रोष होता. एक मात्र होते की, लोक त्याबद्दल त्यांच्या तोंडावर बोलत नसत. " येवढ्या मोठ्या संतपुत्राची तुम्ही काळजी वाहिली नाही ! " असा उघड दोष कोणी त्यांच्या माथी मारीत नसे. घरात पुष्कळदा आपले वडील माणसांशी पटत नसावे; पण त्यांच्या वडिलकीची जाणीव वेळी आपल्या रागाच्या आड यावी, आपल्याही नकळत आपण त्यांचा आदर ठेवीत असावे अशी इकडच्या जनतेची बंडोजीबद्दल वागणूक होती. त्यांच्यावर मनातून कितीही राग असला तरी आपल्या वंदनीय तुकडोजींचे ते पिता आहेत ही बाब काही ल्हानसहान नव्हती. ते काहीही असले तरी वाया गेलेल्या मागच्या पिढीचा हा म्हातारा अजूनही आपल्या पिढीच्या सर्व चिन्हांसह जगत आहे हेच चित्र माझ्या मनात बरेच दिवस तरळून राहिले.

त्यांच्या एकदोन भेटींचे स्मरण मात्र काही विशेष कारणांनी राहून गेले. त्यांच्याकडे त्या दिवशी आलेल्या भक्तमंडळीत काही जुन्या पिढीचे भाविक होते. अवलियांची भक्ती करणे ज्यांच्या अंगवळणी पडलेले आहे त्यांचे ते जणु अवशेष होते. तशा मंडळींच्या संत ठरविण्याच्या कसोट्या कोणत्या हे एक महान कोडे आहे. आज जर एखादा संत म्हणून ओळखला जाणारा माणूस गांजा पीत असेल

किंवा आगखी एखादे व्यसन जर त्याला असेल तर त्याच्या संतपणाबद्दल शंका घेतल्या जाऊ शकतात. निदान त्याबद्दल चर्चा तरी होऊ शकते. पण जुन्या पिढींनी जे अवलिया जपले त्यातले अनेक अवलिया असे गांजाभक्त होते; त्यांचा गांजा संतपणाच्या आड आला नाही. हिमाल्याकडचे योगी इकडे येऊन जात. त्यांच्या पहाडी वातावरणातील सवयी इकडचे लोक पाहात. त्या थंड प्रदेशात धूम्रपान व गांजा इत्यादी बाबी जीवनास आवश्यक असतात. त्यांचे गांजा पिणारे चित्र इकडच्या जनतेच्या मनात पक्के बिंबलेले असल्यामुळेच कीं काय इकडच्या हिमालय न पाहिलेल्या अवलियाच्या तशा षोकांनाहि जनता आक्षेप घेत नसावी.

त्याच पिढीतल्या काही भाविक म्हाताऱ्यांनी बंडोजीचे चरणसंवाहन केले व जाता जाता चारपाच कलदार रुपयांची चळत बंडोजींच्या हातावर ठेवली. त्या प्रसंगीचे मला विशेष आठवते ते बंडोजींचे या रुपयांबद्दलचे वागणे. त्यांनी त्या वाटोळया नाण्यांकडे पाहिले न पाहिले आणि ताडकन ते रुपये त्यांनी आपल्या पायाच्या दिशेने भिरकावून दिले. हे सगळे केल्यानंतर एखाद्या अवलियाला साजेशी शून्यात नजर लावून ते कुठेतरी हरवले.

त्यांना तसेच तिथे सोडून देऊन मी निघून आलो. येताना बंडोजींच्या त्या निस्संग वागण्याबद्दल विचार करताना एकदोन गोष्टी मला निश्चित ठरवता आल्या. एक म्हणजे हे की बंडोजींनी रुपये निर्लोभपणे फेकून दिले हे खरे असले तरी ते रुपये त्यांनी फार दूर फेकले नव्हते. आपल्या पायाजवळ ते पडतील व सुरक्षित राहतील याची त्यांनी पूर्ण काळजी घेतली होती. दुसरे म्हणजे आम्ही तेथून उठल्यानंतर ते पैसे गांज्याच्या पुडीसाठी कारणी लागणार होते. मग त्यांचे ते पैशाकडे निर्लोभी डोळयांनी पाहणे खोटे होते का ? होय; खोटे होते, पण ढोंग नव्हते.

खोटेपणा आणि ढोंग हे दोन शब्द एकमेकापेक्षा येथे वेगळे समजावयाचे ते अशाच काही महत्त्वाच्या कारणासाठी. खोटेपणामधे त्या वस्तुस्थितीचा निषेध आहे. ढोंगामध्ये घटनेच्या खऱ्याखोट्यापेक्षा मनाच्या वृत्तीशी संबंध येतो. त्या अर्थाने ते खोटे समजायचे, ढोंग मात्र नव्हे. बंडोजींबद्दल नंतर नंतर जे इत्थंभूत कळले त्यामुळेच त्यांच्या वरवर ढोंगी, रागीट व लोचट स्वभावाकडे व व्यसनाकडे पहाण्याची दृष्टी बदलली.

समाज आपल्याकडे डोळे वटारून बघत आहे याची बंडोजींना जाणीव होती.

आपला सुप्रसिद्ध झालेला पुत्र व त्याची आई यांची आपण आबाळ केली. त्यांना मारहाण केली यांची शरम त्यांच्या मनात कुठेतरी होती. ती त्यांना सलत होती. आपण केले ते फार वाईट केले याचे दुःख त्यांना डाचत होते. कुणी त्याबद्दल त्यांना उघड शिव्या दिल्या असत्या, अगदी प्रल्हादाला त्रास देणाऱ्या हिरण्यकश्यपूची उपमा देऊन कोणी त्यांना गरम बोलले असते तर चांगले झाले असते. त्यायोगे मनात कुढणारा फोड एकदाचा फुटला असता, सारे मोकळे झाले असते. आपण वाईट केले त्याचे प्रायश्चित आपणाला मिळत आहे असे समजून त्यांनी ते ऐकून घेतले असते. ते प्रायश्चित्त ज्या क्षणी त्यांना पुरेसे वाटले असते त्या क्षणापासून मग त्यांनी आपली बाजू मांडली असती. एका विशिष्ट मर्यादेनंतर माणूस स्वतःला दोष देणे चालू ठेवू शकत नसतो. पण आपल्यावर एखाद्या दोषांचे खापर फोडून घेणे किंवा दुसऱ्याकडून फोडले जाऊ देणे व पुढे आपलेच म्हणणे समर्थनीय कसे ते सांगू जाणे या दोन्ही मानसिक क्रिया-प्रतिक्रियांच्या खेळात घटनांचा घट्टपणा बराचसा वितळून जातो.

पण बंडोजींना त्यातले काहीच मिळाले नाही. लोकांकडून शुद्ध आदर लाभला नाही आणि उघड असा निर्भेळ अनादरही मिळू शकला नाही. लोक राष्ट्रसंताचे वडील म्हणून त्यांच्या पाया पडत असताना त्यांच्या डोळ्यात दडलेली अनादराची गुदमरलेली छाया बंडोजी ओळखू शकत असत. त्याने ते मनोमन दुःखी होत आणि लोक आपल्याबद्दल जहाल बोलत नाहीत त्याला कारण आपला थोर पुत्र हेही त्यांना कळत असे. आदर व अनादर यांचा एकमेकातला हा गुंता खुद्द बंडोजींनाही गोंधळून सोडी. इतरांचे राहू द्या; पण प्रत्यक्ष मुलगादेखील आपल्या झालेल्या हेळसांडीबद्दल बापाला ' ब्र ' बोलला नाही. बरे, त्याबद्दल बंडोजींनी खुषी मानावी तर त्याच वेळी तो थोरपदास पावलेला पुत्र आपल्या कीर्तीचे श्रेय व सुखाचा वाटा पित्यास देईना. पुत्राने जे व जितके द्यायचे असते ते तितके बंडोजींना मिळेना. पुत्राचा जिकडे तिकडे मान होत आहे हे पाहावे पण त्याच्या कौतुकात आपल्याला भाग घेण्याची सोय नसावी. त्याला पित्याच्या लोभाने कुरवाळता येऊ नये व पित्याच्या हक्काने त्याच्या मानपानावर हक्क सांगता येऊ नये, याचा विषाद फार मोठा होता. अशा वेळी बंडोजींना काहीतरी तीव्रपणे उसळून यावे, पुत्राचे कौतुक करण्याची इच्छा, त्याच्यासारखा आपणासही मान मिळावा ही मनुष्यसुलभ ओढ, आपण तुझी आबाळ का केली हे पोराला

समजावून देण्याची तळमळ, माझे चुकले नव्हते हे सांगणारी ईर्षा व झाले गेले विसरून जा असे म्हणणारी शरणागती हे सर्व बादळून यावे, पण पोराच्या सर्वस्वी उदासीन व प्रेमक्रोधरहित वागणुकीने पुन्हा ते अनैसर्गिकपणे शमून जावे, त्याने मनाची अस्वस्थता अधिक वाढावी व त्याच अवस्थेची प्रतिक्रिया मग एकंदर वागणुकीतून दिसावी असा काहीसा प्रकार बंडोजींबद्दल झाला.

त्यातूनच ते निर्लोभी वृत्ती दाखवणारे रुपये फेकणे वगैरे संभवते. झाले काय की, तुकडोजी महाराजांच्या व्यक्तित्वाची थोरवी हळुहळू वाढत गेली आणि वाढता वाढताच ती रूपांनीही बदलत गेली. त्यांचे आरंभीचे थोरपण लोकांनी वेगळयाच मापांनी मोजले होते. त्यांच्या लहानपणाचा काल हा अवलियांचा पूजक होता. तुकडोजींच्या बालपणीच प्रस्फुट झालेली त्यांची वक्तृत्वकला व अमोघ, शीघ्र काव्यशक्ती यांची मोहिनी लोकांवर पडली हे खरे; पण त्यांना त्या काळी त्या कारणाने आदर देण्यापेक्षा आडकुजी नांवाच्या विदेही अवलियाचा शिष्य या नात्यानेच लोक त्यांच्या अधिकाधिक भजनी लागले. त्यांनी मग या बालसंताचे जे लाड केले त्याचेही स्वरूप अवलियाभक्तीला साजेसेच होते. त्या दिवसात तुकडोजींबद्दल बोलले जाई त्याचा गोषवारा असा :

"अहो, काय या बालकसंताचे तेज! रुपयापैशांना हा शिवत देखील नाही!!!" आणि मग अनेक भावडे लोक त्यांच्यापुढे धनांच्या राशी ठेवीत. त्या वेळी कागदी चलनांचा काळ नव्हता. रुपये तेव्हा वऱ्हाडात इतके होते की ते संख्येने मोजले जाऊ शकत ना. म्हणून मोठ्या पारड्यात दोन मणाची वजने घालून त्यांचा तोल होई. अशा काळात वर सांगितल्याप्रमाणे तुकडोजींसमोर खरोखरच धनांची रास पडे. अनेक श्रीमंत विधवा आपले जडित दागिने त्यांच्यासमोर ठेवीत. तुकडोजी त्यापैकी कशासही न शिवता आपल्याच धुंदीत तेथून उठून जात. मग त्यांचे ते तसे वागणे पुन्हा कौतुक व आदर यांचा विषय होई. वाऱ्यासारख्या त्या वार्ता गावोगाव पसरत.

बंडोजींनी आपल्या मुलाचे ते वागणे पाहून थोरपणाचे ते गमक मानले. त्या भावड्या बापाला अनेकदा अशी इच्छा होणे साहजिकच आहे की आपणही तसेच करून एका थोर संताचा बाप असल्याचा पुरावा द्यावा. कौतुकात सामील होण्याची त्यांची ही भावडी इच्छाच त्यांनाही तसे करायला लावी, आणि त्याच काळी स्वतःवर आलेले दारिद्र्य व व्यसने यांची तोंडमिळवणी करण्यासाठी

आधीच्या क्षणी नाकारलेले द्रव्य ते पुन्हा हाती घेत. अशी हास्यास्पद व त्या वेळी कणवेला पात्र अशी त्यांची वागणूक झाली तरी का ? त्यांनी पोराला व बायकोला अपेष्टांमध्ये तरी का ठेवले ? तो त्रास आपल्या बायकापोरांस देण्याइतका हा माणूस निर्दय आणि त्याचा मनातल्या मनात पश्चात्ताप करण्याइतका सरळ असा दोन्ही रीतींचा अवलंब एकाच वेळी कसा ? एक नव्हे दोन नव्हे शेकडो प्रश्न माझ्या मनात बंडोजींबद्दल उभे राहात. त्यांचे जीवन कळले तर कदाचित त्या प्रश्नांची उत्तरे तेथे कुठेतरी दडलेली आढळतील या आशेने त्यांचे चरित्र हुडकू गेलो.

बंडोजी हा एक भाटाचा मुलगा. कवने करून ती जनतेत गावी आणि बक्षिसीवर किंवा भिक्षेवर जगावे, हा भाटांचा व्यवसाय. बंडोजींच्या बापाचा भिक्षेचाच पेशा होता. त्यांचे आई व वडील ( श्री. गणेशपंत व सौ. तान्हाबाई ) हे आपल्या ब्रह्मकुळाला साजेसेच ईश्वरभक्त होते. त्या ईश्वरप्रेमामुळे त्यांनी आपल्या मुलाचे नाव पांडुरंग असे ठेवले होते. वास्तविक ब्रह्मभट्ट हे घराणे उत्तर भारतातले. तिकडून ते वऱ्हाडात येऊन स्थायिक झाल्यावर त्यांनी वऱ्हाडच्या रीतिरिवाजांचा अवलंब केला. इकडची संस्कृती आत्मसात केली आणि वैदर्भियांचे पावन दैवत पंढरीचा विठोबा ह्यालाच आपले दैवत मानले. दर वर्षी आषाढी एकादशीनिमित्त ते पंढरीची वारी पायी मोठ्या नेमाने करीत. ताप आला आहे, जुलाब होताहेत, जवळ खायला अन्नाचा कण नाही अशा अवस्थेतही त्यांनी आपली वारी कधी चुकवली नाही. अशा भाविकांच्या पोटी जन्मलेला हा पांडुरंग नावाचा मुलगा लहानपणी वृत्तीने फारच हूड होता. त्याच्या अशा हूड स्वभावामुळेच त्याचे नाव 'बंड्या' पडले. ते पुढे तसेच कायम झाले. मोठेपणीही त्यांना कुणी पांडुरंग अशी हाक न मारता फार तर 'बंड्या' चे 'बंडूजी' अशी हाक मारीत.

बंडूजी स्वभावाने हूड होते, याचाच अर्थ ते स्वतंत्र स्वभावाचे होते. त्या स्वतंत्र स्वभावाला साजेल असा स्वाभिमान व मानीपणा त्यांच्यामध्ये होता. त्या काळी वऱ्हाडी जमिनीच्या सुपिकतेच्या जोडीला जणू तिचा परिणाम-स्वरूपच सुस्तपणा आलेला होता. त्या सुस्त वातावरणात ऐदीपणा, ऐतखाऊ वृत्ती व व्यसने मोठ्या इमानाने जगत होती. तशा ढिल्या हाडाच्या व जलशातमाशाला चटावलेल्या मंडळींना स्वतंत्र उद्योग, बाणेदारपणा इत्यादींचे वावडे होते. अख्खा

विदर्भ अशा दुर्गुणामुळेच मारवाड्यांच्या व सावकारांच्या तावडीत सापडला. सोन्यासारखी जमीन सावकारांच्या घशात गेली. उरलेल्या मातीचेही सत्त्व गेले. खंडोशी पिकणारे धान्य रोडावले. उसासारखा पिकणारा व ताठपणाने डोलणारा ज्वारीचा धांडा सहा महिन्यांच्या बिमारासारखा बारका दिसायला लागला. कापूसबाजाराच्या दिशेने जाणाऱ्या कापूसगाड्यांच्या त्या उद्योगदिंड्या आपल्या समृद्धीचे दर्शन देईनाशा झाल्या. मोठमोठे वाडे पडले. शेणामातीने सारवायलाही पैसा उरला नाही. गावामध्ये घरापेक्षा खिंडारे वाढली. जवान माणसे शेवटी रोजगारासाठी शहराकडे धावू लागली. अशी ही हलाखी झाली तरी त्या वेळी विदर्भाने कूस पालटली नाही. तेच--जलसे, तमाशे आणि तोच ऐदीपणा जसाचा तसा चालू राहिला. पुढे मग समाजाच्या व्यसनी वृत्तींना बापाच्या अधिकाराने शिव्या मोजणारे व हळहळणारे गाडगेबाबा आले, शेतकऱ्यांची कर्जमुक्ती करणारा कायदा घडवून आणणारे डॉ. पंजाबराव देशमुख आले; पण हे नंतर झाले. बंडोजीबाबा जेव्हा तरुण होते तेव्हाची गोष्ट न्यारी होती. शेतीभाती असेल त्यांनी तिच्या उरावर भार होऊन झोपा काढाव्या आणि ज्यांच्याजवळ काही नसेल त्यांनीही हरेक उपाय करून ऐदीपणाने जगून पाहावे असा त्या काळचा रिवाज होता. बंडोजींचे वडील भिक्षुक होते. त्यामुळेच काहीही कष्ट न करता वडिलांचा पेशा चालू ठेवून सुव्यवस्थित जगण्याची सोय बंडोजींना होती. काही म्हटल्या काही या भाटाला कमी पडले नसते.

पण बंडोजींच्या बाबतीत नेमके उलट घडले. उत्तरायुष्यात अत्यंत बदनाम झालेला हा माणूस विश्वासातीत रीतीने त्या काळाच्या उलट वागला. पुढे अत्यंत व्यसनी म्हणून दुर्लौकिक झालेला, लोकांच्या देणग्यांवरच जगू पाहणारा, सोन्यासारखा मुलगा व साध्वी पत्नी यांना छळणारा हा बंडोजी आपल्या ऐन उमेदीत नवलाच्या तडफेने वागला. नदी महापुराने धुंद झालेली असावी, तिच्या धारेला राक्षसाचे बळ यावे, सारे पाणी पिसाटलेले असावे, भुताने झपाटल्यासारखी ती फेसीफेस गदगदून हसावी आणि नेमका अशा भयानक वेळी एखादा तरुण धारेच्या उलट्या अंगाने पोहण्याचा प्रयत्न करीत असावा. बंडोजींना निश्चितपणे हीच उपमा देता येईल. वातावरणात उद्योगाचे, स्वाभिमानाचे, मूठभरही कण दिसत नसताना या तरुणाने आपली वाडवडिलांची चौपदरी दूर भिरकावली, आजेपणजे ज्या 'भिक्षांदेही' वर जगले ती या तरुण माणसाने स्वाभिमानपूर्वक

नाकारली. भिक्षापात्र अवलंबिणे जळो जिणे लाजिरवाणे या वृत्तीने त्याने घराण्याची भिकारी परांपरा मोडली.

अर्थातच भिक्षा मागणे सोडून दिल्यानंतर त्याला काही कोणी आयत्या इस्टेटीवर दत्तक घेणार नव्हते. मामलतदाराची नोकरी मिळण्याइतपत त्याचे शिक्षणही नव्हते. म्हणजे नियती, शिक्षण अथवा गर्भश्रीमंती यापैकी कशाचीही त्याला मदत नव्हती. साधा एखादा छोटासा धंदा सुरू करतो म्हटले तरी दुकान लावायला लागणारा पैसा त्याच्याजवळ नव्हता. शिवाय धंदापाणी करू जाणाऱ्या माणसाला भांडवल व धीर देण्याची प्रवृत्त ही तेव्हा विदर्भात नव्हती. धंद्याकडे विदर्भाचेच नुसते नव्हे तर अख्ख्या महाराष्ट्राचेच दुर्लक्ष होते व आहे. त्यामुळे उदास प्रतिकूल वातावरणात आपल्या स्वाभिमानाचे रोपटे जगवणे बंडोजीला कठीणच गेले. परिस्थिती व समाज यांच्याशी झगडता झगडताच हा तरुण एक दिवस पराभूत झाला. पण त्या पराभवापूर्वी त्याने त्या उलट्या काळाशी जो लढा दिला होता तो विरोचित होता हे मात्र आज सर्वजण विसरले आहेत.

बंडोजीने तशाही तंग परिस्थितीत एक छोटासा धंदा शोधून काढला. जवळ-च्याच अमरावतीला जाऊन त्याने एका शिंप्याजवळ उमेदवारी केली. नंतर एकेक पैसा वाचवला आणि एक शिवणयंत्र विकत आणले. पुन्हा यावलीलाच येऊन मोठ्या सन्मानाने आपला शिंपीकामाचा व्यवसाय सुरू केला. कोणालाही हेवा वाटावा असे त्याचे प्रसन्न जीवन सुरू झाले. गावातली चार उनाड पोरे काहीच काम नसल्याने त्याच्या दुकानात येऊन रमू लागली. त्याचे ते छोटेखानी दुकान म्हणजे कोणालाही मन रमवण्याचे ठिकाण होऊन बसले. एकीकडे कैचीने कचाकच कपडा कापीत आणि दिमाखाने बेतपट्टी पुन्हा पुन्हा त्या कापडावर लावीत तो आपल्या मित्रमंडळीशी आनंदाच्या गोष्टी बोलू लागला. दुर्रऽऽ दुर्रऽऽ मशीनचा आवाज दुकानात घुमायचा व तो ऐकत पेंगत पडल्यासारखे त्याचे तरुण मित्र तक्क्याशी लवंडायचे; मधूनच गावातल्या कोणाची तरी नक्कल व्हायची आणि त्या गंमतीने त्या मशीनच्या आवाजापेक्षाही मोठा हशा तिथे पिकायचा. बंडोजी त्या सर्व गड्यांमध्ये श्रेष्ठ गणला जाऊ लागला. कमावता गडी म्हणून सारे मित्र त्याला मान देऊ लागले. गावातल्या बायाबापड्या व अडलेनडले त्याच्याकडे आशेने पाहू लागले. कोणाला उधार, कोणाला नगदी, कोणाला तगादा, कोणाला सूट असा देण्याघेण्याचा व्यवहार सुरू केला. एरव्ही भिकाऱ्याचे जीवन दैवात असलेला हा

उमदा गडी हातात चार पैसे खुळखुळवू लागला. मायबापाचे डोळे निवू लागले. कापडातून उरलेल्या चिंध्याची उशी करावी अथवा पोराला संक्रांतीच्याआधी आंगडते टोपी शिवून व्हावी म्हणून गावातले भलेभले बंडोजीच्या आईबापाजवळ वशिले लावू लागले. ख्यालीखुशालीत जगणाऱ्या श्रीमंत यावली गावाला शिलाईचे दुकान हा एक नवा दागिनाच ठरला. आसपास सालोरा बुजरुख, सालोरा ओंगळ अन् ती जहागिरीची माहोली देखील आपल्या नव्या कापडाचे शिवलेले रूप पाहायला पायापायांनी यावलीकडे येऊ लागली. बंडूजी आधीच हरहुन्नरी. त्यात या धंद्यात तर त्याचा बराच बोलबाला झालेला! त्यामुळे वाडवडिलांनी न अनुभवलेली श्रीमंती व सोबतच स्वाभिमानही त्या भिक्षुक घरात नांदू लागले.

पोरगा असा अपेक्षेबाहेर गाजू लागला हे पाहून आईबापांनी त्याच्यासाठी एक वधू निश्चित केली. पोरगी होती गावातलीच. नाकीडोळी नीटस होती. शिवाय जातीतली होती. त्या वेळी समाज यापलीकडे रिवाज पाहायला तयार नसे. वाजत-गाजत लग्न झाले. कमावलेल्या ज्वारीची भाकरी करायला एक हक्काचे माणूस घरात आले. स्वकष्टार्जित पैसा, आईबाप, पत्नी—आणि तिच्यावरून थट्टा करकरून मित्रांनी भंडावून सोडल्याचा आनंद यापार बंडोजीला स्वर्गही तुच्छ वाटावा. हे असे आनंदाचे जीवन चालले होते. अत्यंत टापटिपीचा, व्यवहारकुशल, बाणेदार उद्योगी असा बंडोजी म्हणजे नंतरच्या बंडोजीचे अगदी उलटे चित्र. पण ते सुरंगी चित्र यावलीकरांनी पाहिले आहे. त्या काळात दुर्मिळ असे ते चित्र आपले स्वतःचे आहे हे खुद्द बंडोजीलाही खरे वाटले नसते. पण ते मनोहर चित्र होते बंडोजीचेच.

शिवाय त्या गोड जीवनाला भक्तीचे पावित्र्य होते. बंडोजी हे शिवभक्त होते. विदर्भात वैष्णव जसे हजारोंनी पंढरीला जातात. तसेच शिवभक्तही हजारोनी सालबर्डीस महादेवाच्या जत्रेला जातात. तो ल्हाना देव आणि तिकडे अमरकंटकाकडे जातात तो आहे मोठा महादेव. बंडोजी महादेवाचा सेवक. ' महादेवा जातो गा । शंकरराया ' अशा ललकारीने तो धुंद व्हायचा. महादेवाच्या रस्त्यानें सोडली सुपारी ! पोहा ( यांत्रिकांचा मेळा ) चालला दुपारी ।। अशी गाणी तो भक्ताबरोबर गाऊ लागायचा. महादेवावर त्याची निष्ठा जबर होती. सांगणारे सांगतात आणि ऐकणारे ऐकतात की, महादेव बंडोजीवर खूष होता त्याने बंडोजींना काही सिद्धी दिल्या होत्या. घाणीने भरलेली बोटे बंडोजीने

कुणाच्या नाकासमोर धरावी आणि हुंगणाऱ्याला अत्तराचा धम्म दर्वळ यावा अशाही कथा आहेत. त्या काळी लोकांमध्ये प्रतिष्ठा पावण्यास गाठी असलेल्या पैशाअडक्याबरोबरच अशा कथाही फार उपयोगी पडत. त्या दृष्टीने बंडोजीचे जीवन नक्कीच मोठे समृद्ध होते. असा सारा सुव्यवस्थित संसार चाललेला होता.

दैवाला हे पाहावले नाही. त्या जादुगाराची कांडी फिरली. तीर्थक्षेत्रासारखा पवित्र वाटणारा पिता देवाघरी गेला. बंडोजीचे छत्र हरवले. मायच्या पांढऱ्या कपाळाकडे पाहात तो आपले अश्रू मनातच गिळू लागला. उदासपणाने सारी कामे करू लागला. आईने ऐहिकातून आपली ओढ देवाकडे फिरविली. असा फिकेपणाने बंडोजी संसाराचा गाडा ओढीत राहिला. बापाच्या मरणाचे आसू हळूहळू वाळत चालले; आणि एक दिवस जन्माची सोबतीणही त्याला सोडून गेली. तिच्या धडधडत्या चितेकडे शून्य मनाने बघत बंडोजी भकासपणाने बसला. हेच का जीवन ? आपल्या सुरळीत चालण्याला हाच का अर्थ ? हजारो प्रश्नांच्या सुया टोचत होत्या.

बंडोजीला आता पूर्वीच्या नीटनेटकेपणाने काम करणे जमत नव्हते. आणि आता कमवायचे कोणासाठी ? म्हातारी विधवा आई एका रिकाम्या घरात उदास चेहऱ्याने बसली असायची, आवडत्या पत्नीने घरामध्ये जागोजाग सोडून दिलेल्या आपल्या खुणा बंडोजीला अस्वस्थ करायच्या. असलीनसली कोरतुकडा भाकर खाऊन लोटाभर पाणी घशात लोटायचे, काम करण्याचा प्रयत्न करायचा, मशीनवर पाय दाबायचे; पण लक्ष मात्र काही केल्या लागू नये. ऐन तारुण्यात ज्याने जीवनाची अत्यंत मधुर व अत्यंत कटू अशी परस्परविरोधी रूपे पाहिली त्याचा आपल्या कष्टप्रद जीवनावर विश्वास तरी कसा उरायचा ?

कोणी सुचवी, "बंडोजी असा हातपाय गाळू नकोस. पुन्हा दुसरं लग्न कर. पुन्हा जोम धर. संसार कर." खरंच ! लोकांचे म्हणणे बरोबर होते. बंडोजी तरुण होता. अजूनही काही बिनसले नव्हते. वडील वारले म्हणजे काय झाले ? एक पिकले पान गळून पडले. बायको ! ती होती हे एक स्वप्न होते. होते एक गोड स्वप्न. ती मेली हे दुसरे स्वप्न. पडतात माणसाला स्वप्ने. हे जग म्हणजे स्वप्नच नाही का ? हो मग करायची काय ही स्वप्ने ? एक स्वप्न काय आणि हजार स्वप्ने काय—जीवनात शेवटी सारी स्वप्नेच ना ? मग सत्य तेवढा तो एक महादेवच !

जीवनाबद्दलची अशी सारी रुची हरवून बंडोजी शिवभक्तीत अधिकाधिक रमू लागला. त्या वेळचे शिवभक्तीचे स्वरूप वेगळे होते. भयानक दारू, गांज्या ह्यापर्यंत पोहोचलेले. भक्तीपेक्षाही त्या व्यसनांमध्ये बंडोजींची दुःखे बुडू शकली. त्या काळात तसे करणे कोणालाही गैर वाटले नसते.

बंडोजीची शोकांतिका येथून सुरू झाली. ती तशीच सुरू राहिली असती तरी ते एकेपरीने बरेच झाले असते. कारण त्यात एकेकाळचा उमेदीचा तरुण बंडोजी जरी हरपला होता आणि व्यसने जोर करीत होती तरी निदान दुःखे विसरलेला व जीवनाच्या अरुचीमुळे विरक्त बनत चाललेला एक शिवभक्त घडत होता. पण नियतीने ही शोकांतिका पुन्हा एकदा खुंटा हलवून बळकट केली. जे झाले ते असे झाले :

पोरगा बापाच्या व बायकोच्या मृत्यूपासून असा बदलत व बिघडत चाललेला पाहून तानाबाई भानावर आली. तिच्या मधली माय व रूढी एकदम जाग्या झाल्या. त्याचा बिनसलेला संसार पुन्हा मांडावा व वाया चाललेल्या तारुण्याचा ओघ पुन्हा नीट वळवावा म्हणून त्या मातेने प्रयत्न चालविले. आपल्यासारखेच एक श्रद्धावान असे ब्रह्मभाटाचे घराणे चांदूर तालुक्यात वरखेड या गावी नांदत आहे, असा तिला पत्ता लागला. ती तेथे गेली. भगवद्भक्ती व विद्वत्ता या दोन गुणांनी गाजलेले श्री. तुकारामपंत ब्रह्मभाट यांना एक मुलगी असल्याचे पाहून ती माऊली फारच आनंदली. तुकारामपंत यांची मंजुळा अंगापिंडाने सकस व सावळी पण नीटस आहे हे पाहून तिने आपल्या बंडोजीसाठी मागणी घातली. बापाने होकार भरला. झाले ! बंडोजीला पुन्हा एकदा बोहल्यावर उभे राहावे लागले. यावलीचे शिंपी दुकान पुन्हा थाटामाटाने उघडणार असे सुचिन्ह दिसू लागले.

लहरी दैव इथपर्यंत ठीक वागले असा भास झाला. पण घडले ते नेमके वेगळेच ! मंजुळा ही नववधू खरी; पण संसाराला हवा असणारा कसलाही आटोप तिच्या ठायी नव्हता. अत्यंत भोळसट, चेहऱ्याने बावळट वाटणारी सून कालांतराने बरी होईल, घर आटोपेल हा अंदाज दिवसानुदिवस खोटा ठरत चालला. तिचा बावळटपणा पुढे पुढे तर वेडसरपणाचे रूप घेऊ लागला. बंडोजी नव्या जोमाने संसाराकडे फिरला होता. त्याला ही नवी पत्नी काहीच प्रतिसाद देईना. येथे बंडोजीला वेड लागण्याची पाळी आली. मंजुळेला खरे म्हणजे संसारापेक्षा एखादे मंदिरच खरे स्थान शोभले असते. ती त्या संसारात

रमण्यापेक्षा स्थितप्रज्ञाच्या विरक्तीतच अधिक रमत असे. श्री संत तुकडोजी या महान पुत्राला जन्म देणारी ती माता खरोखरीच महान्; पण बंडोजीच्या त्या अवस्थेला या स्थितप्रज्ञ व विरक्त बाईपेक्षा त्याचे मन संसारात गुंतविणारी, त्याचा हरवलेला ओलावा त्याला नव्याने देणारी गोड पत्नी हवी होती. बंडोजीच्या सर्व अपेक्षांनी हाय खाल्ली.

मंजुळेला बंडोजीपासून मुलगा झाला. त्याची व त्याच्या आईची संसारविरक्त वृत्ती पाहून बंडोजीची मनोवृत्ती बरीच चमत्कारिक होऊ लागली. आपले मन रमविण्यासाठी तो पुन्हा पूर्वीच्या व्यसनांकडे वळला. स्वयंस्फूर्तीने स्वीकारलेला स्वाभिमानी पेशा थंडावला. व्यसन व कामधंद्याची उणीव यामुळे घरात मूर्तिमंत दारिद्र्य सुरू झाले. बाळंतिणीला तिच्या ओलेपणातही चिंचेच्या सारापलीकडे काहीही मिळाले नाही. बायकोला वातप्रकोप झाला. पुढेही तिचा भोळेपणा तिला चिकटून राहिला. कोण्या शेजारणीच्या सांगण्यावरून तिने पोराला भिलाव उगाळून लावला. पोरगा चांगला सुजून निघाला तरी त्या मंजुळमातेस वाटले की, पोरगा रोडका होता तो आता चांगला ताजा लठ्ठ झाला!

संसाराच्या या वाताहातीकडे बंडोजी हताशपणाने पहात होता. फारच डोक्याबाहेर गोष्ट घडली तर व्यसनांना शरण जात होता. स्वाभिमानातून उगवलेला स्वतंत्र पेशा संपला. तेव्हापासून कोणी दिलेले दान व भिक्षा निमूटपणे स्वीकारीत होता. परंपरेला व भिक्षावृत्तीला ओलांडू पाहणारा हा उमदा गडी अगतिकतेने पुन्हा त्याच मळवाटेने जाऊन नियतीसमोर ' चिऽऽ ' बोलत होता.

मुलगा व आई यांचे जगावेगळे वागणे एकीकडे असे असह्य होत होते. व विरक्ती किंवा संसार यापैकी कशाकडेही फिरकणे शक्य नव्हते. बायकोच्या वेडपट वागणुकीने भाकरतुकडाही वेळेवर मिळण्याची मारामार होत होती. भाकरी तव्यावर शेकता शेकताच आपला हातही त्या गरम तव्यावर ठेवून मंजुळा कुठल्यातरी आध्यात्मिक तंद्रीत हरवत होती. स्वयंपाक झाला नाही म्हणून रागावलेल्या नवऱ्याचा भडाभड मार खात होती. दोष मंजुळेचा नव्हता. तिला न विचारता तिचे लग्न रूढीने घडवले होते. दोष बंडोजीचाही नव्हता. त्याला गोड संसार हवा होता. कोणाचाही दोष नव्हता; आणि शोकांतिका मात्र घडतच होती.

या वेडपट बायकोच्या संसारात अधून मधून काम करणारी एक बाई शेवटी

बंडोजीच्या मनात भरली. पुरत्या दोन लग्नाच्या अनुभवामुळे बंडोजीचा लग्नसंस्थेवरचा विश्वास उडून गेला होता. त्याने बंड केले. त्या बाईला बायको म्हणून लग्नाविनाच घरी ठेवले. बायको व मुलगा यांच्या न मानवणाऱ्या संतवृत्तीवर तोडगा काढून त्यांना वरखेडला पाठवून दिले व तो त्या नव्या बाईमध्ये ओलावा शोधू लागला.

नंतरचा इतिहास ताजा आहे. पुत्र श्री संत तुकडाजी व पत्नी मंजुळा यांची वाढती कीर्ती व आपली बदनामी हे पाहण्याचेच मग बंडोजीच्या नशिबी आले.

आपले खरोखरच काय चुकले याचा पत्ता बंडोजीला लागू शकला नाही. " पोरगा असा संत, बायको साध्वी, वडील धार्मिक आणि अशा रत्नपरंपरेत आपण मात्र एक गारगोटी " अशा उसाशांनी त्यांचे जीवन भरून गेले. पश्चात्तापातून जशी सुटका नव्हती तशीच केल्यागेल्यातूनही मोकळीक नव्हती. पुन्हा मांडलेला संसार टिकवावा लागत होता. लोकांच्या हेटाळणीच्या नजरा चुकवीत चार माणसात वावरायचे होते. ज्या दमदारपणाने जीवन सुरू केले होते त्याच्या फक्त आठवणी उरल्या होत्या. वठलेल्या झाडाने आपल्या पाचोळ्याकडे पहावे तसे ते जीवन होते.

आपला पोरगा—आपला वंशदीप आपल्या जवळ रहावा असे त्या बापाला कैकदा वाटून गेले असणार, पोरगा अर्थातच साऱ्या समाजाला सुधारण्यात मग्न. त्यामुळे त्याला बाप, आई ही बंधने नव्हती. पोराचेही खरे होते. आणि बापाचे? त्याचेही...

बंडोजी म्हातारे होत चालले. कणाकणाने खंगत चालले. वृद्धापकाळी नाही तरी मरणकाळी तरी पुत्र आपल्याजवळ असावा अशी तीव्र इच्छा त्यांना झाली. मंजुळाही त्यांच्या डोळ्यांदेखत कुंकवाभरली देवाघरी निघून गेली. उरता उरला एक पुत्र. तोही असा समाजाने त्यांच्यापासून ओढून नेला होता. श्रीरामकृष्ण परमहंसांचा भाचा हृदय हा नंतरच्या आयुष्यात पश्चात्तापाने ढळढळ रडत होता म्हणतात. बंडोजीचीहि तीच अवस्था झाली.

वृद्धापणाहि संपत चालला. जीवनाचा साराच वैताग संपविणारी पावले वाजायला लागली. पोखरलेल्या देहावर संध्याकाळ पिकायला लागली. इच्छेविरुद्ध घडलेल्या चुकांचा अंत बंडोजींनी ओळखला. यावली गावातल्या मंडळींना त्यांनी बोलावले, " मंडळी, झालं गेलं माफ करा." म्हाताऱ्याने पाणावलेल्या डोळ्यांनी

आयुष्याची उजळणी केली. गद्गदलेल्या उराला क्षमा मागण्याचे शब्द सुचेनात. हात जोडून शेवटी त्यांनी त्या गावकऱ्यांना विनवले,

" बापहो, माझा पोरगा आता समाजाचा झाला आहे. त्याला शेवटी तरी माझ्यापाशी ठेवा. एखादा सप्ताह साजरा करण्याचं निमित्त काढा. माझ्या पोराचं भजन ठेवा. भजनासाठी इथं तो नक्की येईल. "

गावकऱ्यांनी ते मानले. राष्ट्रसंत तुकडोजी येईपर्यंत म्हाताऱ्याने जीव तगवला. श्री तुकडोजी महाराज यावलीस आले. भजनाचा आनंदीआनंद झाला. त्याच आनंदात बंडोजीचा आत्मा पोराच्या मांडीवर डोके टेकून एका चिरंतन आनंदात विलीन झाला.

तरुण भारत : दिवाळी १९६२

# श्री कोसंबी

आश्रम आम्हांला खऱ्या अर्थाने समजला डॉक्टर कोसंबींच्या मृत्यूच्या वेळी. त्या आधी आश्रमात गेलो होतो, पण नुसत्या इमारती–त्यातही झोपड्याच फार–पाहता आल्या. मध्यंतरी दादाजी तेथे राहायला गेले. त्यांच्याकडून आश्रमाच्या अनेक गोष्टी कळल्याने आम्हाला त्याविषयी रस वाटू लागला होता. आजूबाजूच्या वातावरणात गांधीवादाचे कण होते आणि आमचे घर तर त्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास करण्यात पुरते मग्न झाले होते. गांधीवादावरची बहुतेक सर्व पुस्तके आम्ही वाचून काढली होती. त्याप्रमाणे वागणूक ठेवण्याचाही प्रयत्न होत होता. भारताला स्वराज्य देऊ पाहणाऱ्या त्या तत्त्वज्ञानाने आम्ही भारावून गेलो होतो. तो काळही तसाच होता; मुख्यतः आमचे वयच तसे होते. लाल बदल्या सकाळी उठून कंदील घेऊन गाव साफ करणे, श्रमदानाने अनेक कामे करणे, सूत कातणे इत्यादी गोष्टींमध्ये रंगलो होतो. त्या सर्व कार्यक्रमांची स्फूर्ती असा जो सेवाग्राम आश्रम तो आपण त्यापूर्वी पाहुण्या डोळयांनी नुसताच पाहून आलो त्याची आता खंत वाटत होती, पुन्हा पुन्हा तिकडे जावेसे वाटत होते. परराष्ट्रांमधील बुद्ध धर्मीयांना आपल्या धर्माची मायभूमी असा जो भारताबद्दल आदर वाटतो तसाच आम्हाला सेवाग्रामबद्दल जिव्हाळा होता. तिथल्या कुठल्याही वार्तेसाठी आम्ही आतूर होत असू. जरासे काही ऐकायला मिळाले तर कान टवकारले जात. अशातच एक दिवस कळले की कुणी कोसंबी नावाचे गृहस्थ सेवाग्रामला आले आहेत. व तेथे ते ‘ मरायला ’ आले आहेत.

सेवाग्रामला येऊन आश्रमात स्थायी होणारा माणूस असाच जगावेगळा असतो याची जाणीव आम्हाला तोपर्यंत पुरेपूर येऊन गेली होती. स्वतः गांधीजी हेच तर राजकीय अवलिया होते. आम्हाला त्यांचे राजकारण व वाटाघाटी यांच्यापेक्षा त्यांचे ब्रह्मचर्याचे प्रयोग, स्वप्नदोषांची कबुली यातच मोठेपणा वाटे. आम्ही भाबडे का होईना पण तरुण होतो. पोरीबाळींबद्दलच्या गोष्टी मनाला सतावत असत. पण त्याची उघड कबुली आम्ही आपसात देखील कधी दिली नाही. त्या कारणाने गांधीजींच्याबद्दल आम्हाला मोठेच कुतुहल वाटे. तरुण मनाला आठवणारा हिरो असतो तसे आम्हाला गांधीजी वाटत. आफ्रीकेतले ते त्यांचे मार खाणे, लाठीहल्ल्याला न जुमानता आपला हट्ट करणे, मामुली माणूस डोळे पांढरे करील इतके दिवस उपास वगैरे करणे या गोष्टी आम्हाला रोमांचकारी वाटत. आश्रम, झोपडी, शेळीचे दूध, जाडी भरडी खादी, भूतदया इत्यादी गोष्टी तशा म्हणजे तारुण्याला भुरळ पाडणाऱ्या नव्हेतच. शहर चाखलेल्या आमच्यासारख्या मंडळीस तर तो सोवळा अडाणी कार्यक्रम वेधक वाटण्याचे काही एक कारण नव्हते; पण त्यात हे असे चमत्कार, जगावेगळेपण होते. म्हणूनच आम्ही सेवाग्रामला अद्‌भुत भूमी या नात्याने पहात होतो.

हे कोसंबीदेखील तेथे 'मरायला आले' असे ऐकल्याने आमचे कुतूहल जागे झाले. त्यांच्याबद्दलच्या बातम्या मग अधिकाअधिक मिळवू लागले. काही खऱ्या, काही फुगलेल्या, आम्हाला तर अरेबियन नाइट्‌समध्ये असल्यासारखे वाटू लागले. केवळ नवलनगरीत घडू शकणाऱ्या घटना त्या माणसाच्या जीवनात घडल्या होत्या म्हणे. बराच बाप्या होईस्तो हा कोसंबी काही शिकलाबिकला नव्हता. मग एकाएकी स्फूर्ती येऊन काशीला गेला. बारा वर्षांना भारी ग्रंथ त्याने बारा महिन्यात वाचले. पंडित झाला. मग आणखीही भाषा शिकला. एक कुठली तरी 'पाली' भाषा शिकला. मग साहेबांची भाषा साहेबापार फक्कड बोलू लागला. मोठमोठ्या देशांनी त्याची कीर्ती ऐकली. त्याला प्रोफेसर म्हणून बोलावले. तेथे तेवढ्या थंडीतही त्याने मांसमच्छर वगैरे खाल्ले नाही. आठ की किती तरी वर्षे म्हणे तो नुसत्या झाडपाल्यावर राहिला. ढीगभर ग्रंथ लिहिले अन् आता संसार सोडून, देशकार्य, धर्मकार्य करीत होता तेही सोडून, सेवाग्रामला मरायला आला होता. काही खरे असेल, काही खोटे असेल. पण तसे काही ऐकले की सेवाग्राम-बद्दलचे आकर्षण वाढू लागे. कोसंबींच्या उपवासाची बातमी मोठी चित्तथरारक

होती. कुठल्याही मागण्या मागण्यासाठी किंवा गांधीवादातल्या चित्तशुद्धीसाठी वगैरे ते उपोषण नव्हते. सारा जन्म लोकसेवेत घालविला. आता म्हातारपण आले. या थकल्या काळात आपला भार लोकांवर नको. आणि या कारणासाठी त्यांनी उपास करून मरायचे ठरविले होते! ही बातमी गांधीजींना कोणी सांगितली तर त्यांनी त्यांना म्हटले की त्यांनी तसे मरायला सेवाग्रामला जावे. त्यांच्या पवित्र मरणामुळे आश्रमाची शुचिता वाढेल. काय वाढले अथवा वाढणार होते देव जाणे; पण आश्रमाबद्दल आमची ओढ मात्र अशाच काही कारणांनी दरवेळी वाढत होती. कोसंबींनी कोणाला तरी कबूल केले होते की ते एक महिनाभर अन्न घेतील. ते शब्दात अडकले. परंतु त्यांना मनापासून तर अनशनच करायचे होते; आता आली पंचाईत ! पण त्यातून त्यांनी मार्ग काढला. एका लहानशा चमचा-भर ते भाजीचे पाणी पीत. भाजी तरी कसली ? तर कारल्याची.

त्यांच्या सेवेला दादाजीच होते. म्हणून आमच्या कानांना भरपूर खाद्य मिळे. उपासात ओकारी वगैरे होत. त्यासाठी पंचामृताचे चाटण दिले तर ते चवीने सेवन करीत. दादाजी कधी आश्रमाबाहेर जेवले तर त्यात उत्तम मसाला, जिरे वगैरे होते की नाही याबद्दल रुचीने चौकशी करीत—इतकी की दादाजी त्यांच्या अनशननिर्धाराबद्दल साशंक होत. त्यांना पडताळून पाहात. पण इतका लिप्त होऊन बोलणारा तो माणूस शंभर टक्के कसोटीस उतरून महात्मा ठरे. पुनर्जन्म वगैरेवर भरवसा नसतानाही मृत्यूला न डरता त्याच्या पावलाचे वर्णन करी.

हे कोसंबी एक दिवस इहलोक सोडून गेल्याचे कळले. दादाजींना त्यांनी आमच्यासाठी चंदनाच्या गोळया व काही पुस्तके दिली. तेव्हा आम्हाला उमाळून आले. येवढ्या मोठ्या माणसाला आपण पाहिले नाही. त्याने मात्र मरणाच्याही काळात आपल्यासाठी वस्तू देण्याची आठवण ठेवली. ज्या काळात या इहलोका-विषयी त्याला काहीही करायचे नव्हते त्याही काळात त्यांनी इथले सगळे उपचार पाळले. जीवनाला न कंटाळता, इथल्या रीतीभाती, हास्यविनोद न सोडता ते मरणाला शांतपणे सामोरे गेले. त्यांनी दिलेली चंदनाची गोळी जेवतांना धुपात घालीत असू तेव्हा त्यांची आठवण होई. आपला न पाहिलेला नातेवाईक हारवल्याची कासाविशी होई. त्यांना आपण पाहायला हवे होते असे पुन्हा पुन्हा वाटे. ते आश्रमात असताना आम्ही तेथें गेलो होतो. पण ते तेथे असल्याची कल्पना नव्हती. जे कळले ते नंतर. अजूनपर्यंत रुखरुख कायम आहे. नशिबाने

दा. क्र. ९७५०९

आमच्याशी ही कठोर गंमत केली आहे. त्यांचा आमचा परिचयच होऊ द्यायचा नव्हता तर मग त्यांचे अद्‌भुत जीवन तरी आमच्या कानावर कशासाठी पडले ? आणि दादाजींनी त्यांची सेवा केली ती त्यांची त्यांच्यापुरतीच मर्यादित का ठेवली नाही ? जे काही रीतभात म्हणून द्यायचे घ्यायचे होते ते त्यांचे त्यांना ! मुद्दाम त्यांच्या मुलाबाळांची चौकशी काय म्हणून ? हे सारेच विचित्र होते. मन दुखवणारे आणि सुखवणारे होते.

असा हा उपचार म्हणून का होईना पण आपली चौकशी करणारा, मरणाच्या वेळी आपली आठवण माझ्यासाठी देणारा तो महात्मा मला बघायचा होता. पण माझ्याशी ही क्रूर थट्टा झाली होती. घटना उपचाराच्या गतीने घडली असेल, अगत्याने घडली असेल—काहीही असो पण मला त्या माणसाचा चेहरा पाहायचा होता. दादाजींनी सांगितले की ते आपले शेवटचे दिवस घालवायला तिथे आले होते. कोणालाही भेटत नसत. 'कोणालाही' या शब्दांनाच त्यांच्या लेखी अर्थ नव्हता म्हणे. असेल कोणी गव्हर्नर–असेल कोणी नबाब ? हे जग सोडणाराला काय त्या पदव्यांचे ? शेवटी तो 'कोणीतरीपणा', ती बिरुदे म्हणजे याच जगातली ना ? जर हे जगच नको तर त्याच्यातल्या वैभवाच्या तरी गमजा कशाला ? कोसंबींचे हे तत्त्वज्ञान मला पटून जाई. आपल्याला त्या कारणाने त्यांची भेट घडली नसेल हे खरे वाटून जाई. चूप राहावेसे वाटे. आणि त्याच वेळी कळून येई, किती विविध व्यक्तिमत्त्व त्या पुरुषाचे ! अनेक पुढाऱ्यांना, व्यापाऱ्यांना, अधिकाऱ्यांना परत पाठवणारा, भेटण्याची इच्छा नसलेली तो जगाविषयीचा उदासीन माणूस सप्रेम भेटीच्या वस्तू तरी का देतो ? त्याही माझ्यासारख्या अनोळखी माणसाला ! त्यांनी अशाच वस्तू वाटल्या म्हणे. कोणाला घड्याळ, कोणास स्टोव्ह तर कोणाला काही.

मरण प्रिय होते पण जीवनाविषयी हेळसांड नव्हती. दादाजी सांगत की ते गृहस्थ आपला उपवास करण्यासाठी तेथे आले तेव्हा त्यांच्याजवळ एक मोठी पेटी होती. त्यात ल्हानसा स्टोव्ह, निवडक पुस्तके—काही स्वतः लिहिलेली, काही दुसऱ्यांनी भेट दिलेली पुस्तके, काही स्वच्छ फडकी, औषधे इत्यादी अनेक चिजा होता. मृत्यू जवळत असताना त्यांनी त्या वस्तू जपल्या. त्यांची नोंद करविली ल्हान मुलगा खेळण्यात तद्रूप होतो. जीवापार बाहुल्यावर प्रेम करतो. तसे ते



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वामित्व
अनुक्रम.................. दि. ..................

वागले. आणि त्याच बालकभावाच्या बेफिकिरीने त्यांनी एक दिवस त्या वस्तू कोणत्या कोणाला द्यायच्या त्याची नोंद केली.

देह त्यांना सोडायचा होता. पण तोही त्यांनी शेवटपर्यंत जपला म्हणे. जरासे काही झाले तरी औषध पीत. देह स्वच्छ व स्वस्थ राहावा म्हणून स्पंजींग करून घेत. मरणाकडे शांततेने ते जात होते. जीवनाचा कुठलाही कंटाळा, आततताईपणा, अरुची यातले काहीच नव्हते. देह सोडायला आला म्हणून सोडावा. अगदी कपडा जुना व्हायला आला म्हणून टाकावा—या वृत्तीने. त्यातही ते बौद्ध होते. हिंदु माणसाने जर देह असा निर्धास्तपणे टाकला तर फारसे नव्हे. कारण जर्जर वस्त्रे सापडताना ' मनुष्य घेतो दुसरी नवीन ' या आशेवर तो असतो. न पडताळलेली का होईना पण एक श्रद्धा त्याच्याजवळ असते. नवा देह, पुनर्जन्म घेण्याच्या मोबदल्यात तो जुना देह सहज टाकू शकतो. तेथे या शून्यवादी बुद्धभक्ताला तर तोही सौदा मान्य नव्हता. आयुष्यभर देवबिव झूठ मानणारा नेमका मरणाच्या वेळी गडबडतो. देव नसेलच का ? तो असता तर बरे झाले असते. निदान आपण तो मानायला हवा होता. अशा विचारांनी त्याच्या बेफिकिरीच्या तत्त्वज्ञानावर तडे जातात. पुढे सारा अंधारच दिसल्याने या जीवनात तरी पुरेसे भोग भोगायला हवे होते याची चुटपुट व ते भोगले नाही याची छुपी खंत तशा माणसाला असू शकते. पण कोसंबींचा साराच प्रकार उलटा होता. प्रत्येक पाऊल त्यांनी पूर्ण विचाराने टाकले होते. समजूनउमजून ते जगले होते. समजूनउमजून शांतपणे मरत होते.

अशा त्या माणसाला मी पाहू शकलो नाही. त्याच्या मरणाचा जय हा वादातीत होता. गांधीजींपेक्षाही रोमांचकारी होता. उपोषणे गांधीजींनीही केली होती. ती प्राणांतिक होती. पण हा ' प्राणांतिकपणा ' जर—तर च्या भाषेत होता. आंबेडकरांनी जर अमके नाकारले तर—ब्रिटिशांनी तमके न दिले तर— या अटीं-वर तो प्राणांत होता. त्याच अटीमुळे ते पुन्हा जीवनात परत येत. ही तडजोड कोसंबींच्या जवळ नव्हती. त्यांच्या उपवासाची अटच मुळी मृत्यू ही होती. कायद्याच्या कचाट्यात येऊन हे उपोषण सुटू नये म्हणून त्याचे कारण गुप्त ठेवले गेले होते म्हणतात. म्हणजे गांधीजींच्या उपोषणांचा गाजावाजाही कोसंबींच्या वाट्याला आला नाही. तसे पाहिले तर माणसाला काही नको असले तरी कीर्ती हवीच. मोठमोठे पुढारी प्रसंगी, प्राणत्यागास तयार होणारे महान नेते देखील—

एखाद्या दरीत विश्रामास जाताना फोटोग्राफरला सोबत घेऊन जातात म्हणे. विवेकानंद म्हणतात की अत्यंत अचाट कार्ये करणाऱ्या त्यागी माणसाच्या मनातदेखील कीर्तीची इच्छा खोल दडून बसलेली असते. माणसाचे अस्तित्वच कीर्तीमध्ये भाषांतरित झालेले आहे. तीही कोसंबींना नको होती.

आज, उद्या, आता, या क्षणी मरत घातलेला तो माणूस महाविनोदी होता म्हणे. जीवन चाखण्याची इच्छा असलेला माणूसही ज्या दिलचष्पीने विनोदात रमणार नाही त्यापेक्षाही जास्त रस ते विनोदामध्ये घेत. आयुष्यातल्या अनेक गमतीदार घटना सांगण्यात रंगून जात. भारतातल्या काही लहरी संस्थानिकांशी त्यांचा मुकाबला झाला त्यांच्या मजेदार आठवणी सांगत. परदेशात घालवलेले जीवन शब्दांनी उजळीत. आणि त्याच जोमाने व रंगतदार तजेल्या वाणीने धर्म, तत्त्वज्ञान, भाषाशास्त्र, संशोधन याही विषयावर बोलत.

मरणारा माणूस इतका तिऱ्हाईत असू शकतो ? धन सोडून मरून जाताना रडणाऱ्या गझनवीची औलाद जगभर आहे. माणूस खराखुरा जर जीवनाच्या उपभोगाकडे ओढला जात असेल तर मरणाचे वेळी. पण हा माणूस लोकांना मुद्दाम विचारपूस करून, त्यांच्या खाण्यापिण्यात रस दाखवून स्वतः मात्र कारल्याचे चमचाभर पाणी पीई. बुद्ध असल्यामुळे त्यांची गंगोदकावर तीर्थ म्हणून श्रद्धा असण्याचे काहीच कारण नव्हते. पण दादाजींनी स्वतः हिंदु म्हणून त्यांच्या तोंडात मरणवेळी तीर्थ घालण्याची इच्छा प्रगट केली. बुद्धधर्माप्रमाणे त्या तीर्थाशी त्यांना काहीही कर्तव्य नव्हते. त्यांनी आरंभी विरोध केला. मग म्हटले, " ठीक आहे. ते पाणी मला तारणारे नाही तसेच वाईटही नाही. तुमचे समाधान जर त्यामुळे होणार आहे तर अवश्य पाजा. "

हे बोलणे मृत्यूच्या कितीतरी आधीचे. त्याच वादविवादात त्यांनी असेही मान्य करून घेतले की त्यांचा जीव जाताना ते तीर्थ टाकू नये. जीव गेल्यानंतर वाटल्यास थोडेसे तोंडामध्ये घालावे. दादाजींनी ती अट मानली. उपवासामुळे डोळे फार तीक्ष्ण होऊन नजर सुधारते म्हणतात. त्याचा प्रत्यय शेवटच्या दिवशी आला. मृत्यू कधी येणार हे त्यांना अंतर्ज्ञानाने म्हणा किंवा उपोषणाच्या गतीमुळे ठाऊक होते. त्या दिवशी त्यांनी आपल्या झोपडीत कोणालाच येऊ दिले नाही. पण सर्व आश्रमीयांना त्यांच्या अंतकाळाची तीथ माहीत होऊन गेली असावी. ते सर्व जण आसपास त्या घटनेची प्रतीक्षा करीत होते. उजेड व हवा पाहिजे म्हणून

सर्व दारे उघडी टाकण्यात आली. शरीरास शीतळता हवी म्हणून त्यांनी ते ओल्या कपड्याने पुसायला लावले. जे शरीर स्वच्छ व शीतल करण्यासाठी ते सांगत होते ते केवळ दहा मिनिटांनी ते सोडणार होते. पण त्यालाही ते सुखवून सुंदर करून जाणार होते. धर्मशाळा सोडताना आपण वागतो तसे त्यांनी देह सोडताना केले नाही.

मृत्यु समीप आला हे ओळखून दादाजींनी तीर्थाची कुपी बाहेर काढली. पण कोसंबींच्या तीक्ष्ण नजरेत ती पडली. त्या वेळी त्यांना खरे तर सर्व वेध 'तिकडचे' होते. आपण अजून देह सोडला नाही; तीर्थ येवढ्यात टाकू नका अशी खूण त्यांनी केली. मग ते मावळले.

आश्रम खऱ्या अर्थाने पाहिला म्हटले; पण खऱ्या म्हणजे किती खऱ्या? इमारतीच्या थोडेसे वेगळे, वरचे जीवन पाहिले. कोसंबी यांना पाहिले नाही ही केवढी अपूर्णता! तसे पुष्कळांनाच मी पाहिले नाही. पण त्याचे दु:ख नाही. पण ज्या माणसाने माझ्यासाठी आठवणीने पुस्तके, चंदन – – – –

आंदोलन : दिवाळी १९६३

# दादाजी

मी फारच छोटा होतो तेव्हाची गोष्ट. आमच्या घरात आई, दादा व मी इतकेच लोक रहात होतो. गुलाबमामा नावाचा एक दिवाणजी घरातलाच एक माणूस समजला जात होता. पण त्याचे घर वेगळे होते. तो तसा सर्वकाळच आमच्या घरी राही. दवलत व मुकाजी हे दोन गडीही नुसते झोपण्यापुरतेच त्यांच्या घरी जात असत. इतके लोक सोडले तर घरी गर्दी अशी फारशी नव्हतीच. शेतीचे सारे गुलाबमामा अन् दोघे गडी पाहात. दादा घरात फारसा रमत नसे. मी शाळेला जायचा. त्या वेळी आईला काम असे फारसे नसेच. ‘ घर खायला उठतं ’ अशी तक्रार आई शेजारणीजवळ करायची. बरेच वेळा ती एकटी असली म्हणजे वेणीफणीचा वाटोळा पितळी डबा पुढ्यात घेऊन खिन्न नजरेने तासतास आरशात बघत बसे. अनाबाई किंवा गंगूबाई जर अशा वेळी आल्या तर मात्र माय इच्छा नसल्यासारखी दिखाऊ वेणीफणी करी. आलेल्या बाईने मग विचारावे,

“ का ओ मोठी पाटलीन, झाला कामधंदा ? ”

“ कुठचा ओ माय कामधंदा. या एकट्या जीवासाठी अन् टिचभर पोरासाठी पिऊनजाऊन काम तरी किती करा लागते ? ”

आईच्या या बोलण्यावर शेजारणी माना डोलवीत. त्यातली एखादी सहानुभूतीने मायला म्हणे, “ खरं आहे तुमचं. आलं माणूस आला धंदा, गेलं माणूस गेला धंदा. ”

अशा त्या उदास भकास जीवनात अधूनमधून मात्र मोठीच घाईगर्दी उडून जाई. तसे काही होण्याच्या एक दोन दिवस आधीपासूनच रोजच्या व्यवहाराचे रंग पालटायला आरंभ होई. कधी नव्हे तो गुलाबमामा हिशेबाची खतावणी ठाकठीक करू लागे. कोतवाल पांडेवार मंडळी नेहमी तोंड चुकवीत असली तरी तशी त्या वेळी मात्र फारच नियमित असल्यासारखी वागत. इंधन फोडणे, मोठे अंगण कधी नव्हे ते झाडणे, चावडीमधल्या सर्व खोल्या व्यवस्थित लावणे या गोष्टी फार वेगाने होत. मायही विशेष उत्साहाने वेणीफणी करी. वाणदुकानचे सामान ढीगभर आणले जाई. नेहमी शुकशुकाट असलेल्या आमच्या घरात मोठी मोठी माणसे ये जा करायला लागत. बाजीराव बापू, भुरुलाला अन् रमजाणभाई पुन्हा पुन्हा येऊन चौकशी करीत,

"तेजी कधी येणार ?"

"बाबुराव कधी येणार ?"

"बडा पटेल कब आयेगा ?"

तेजी, बाबुराव, मोठे दादा, बडा पटेल हे सर्व एकाच माणसाच्या संदर्भात बोलले जाई. त्याच चौकशीवरून मग मलाही कळे की आपल्या घरी अधूनमधून येणारा एक माणूस आजउद्या येणार आहे. हा माणूस कोण हे मला माहीत नव्हते. पण माणूस महत्त्वाचा होता हे निश्चित. त्या माणसाला मी 'दादाजी' म्हणावे असे मोठ्या घरच्या ताईने सांगितले होते. गांवातील अगदीच मोठी व त्यांना बाळमैत्री-मुळे अरेतुरे म्हणणारी मंडळी सोडली तर बहुतेक लोक ह्या माणसाला 'दादाजी' म्हणत. हा माणूस असाच एकदा दोनदा ह्यापूर्वीही आमच्या घरी आला होता. माझी आणि त्या माणसाची फार ओळख नव्हती. तरीही इतर मंडळींच्या मानाने त्याला मी कमी भीत असे. हे 'दादाजी' आले म्हणजे आमच्या घराला वेगळी कळा येई. उत्सवाचे स्वरूपच ! सर्वांची गोड धांदल उडे. विशेषतः कधी न घडणाऱ्या गोष्टी तेव्हा घडत. चावडीतली मोठी तिजोरी कधी उघडली जात नसे. गुलाब दिवाणजी कामापुरते पैसे लाकडी पेटीत ठेवी. पण दादाजी आले म्हणजे मात्र ती मोठी तिजोरी उघडीत. त्यामुळे मला पटले होते की हा माणूस फार मोठा असला पाहिजे. माझी आणि त्या माणसाची भेट अशी फारशी होत नसे. पण चावडी-समोर दफ्तर घेऊन मी शाळेत जायला निघालो म्हणजे दादाजी कितीही गर्दीत असले तरी मला हाक मारीत. मला हा माणूस आवडण्याचे एक कारण हे होते

की तसे त्यांनी बोलावले म्हणजे एक अख्खा ढब्बू किंवा अनेकदा संपूर्ण एक आणा ते मला देत. एका आण्यात त्या वेळी बुंदीचे आठ नऊ लाडू मिळत असत. परक्या माणसांकडून पैसे घ्यायला एरव्ही आईचा फार विरोध असे. पण दादाजीने जर पैसा दिला तर तो ती घेऊ देई. दादाजी पैसे देत म्हणूनच मला आवडत असे नाही. ते मला मधूजी अशी मानवाईक हाक मारीत. मला गावातले लोकही दादाजीसमोर नेहमीसारखे मधू न म्हणता मधूजी म्हणत. इतकेच काय पण खुद्द देशमुख मास्तरही दादाजी गावात असण्याच्या काळात मला मधूजी म्हणून हाक मारीत.

हे दादाजी माझे कोण लागतात ते मला बरेच दिवस माहीत नव्हते. आमच्या घरी ते क्वचित् येत. दोन दिवसांच्यावर राहात नसत. आले तरी एकटे येत नसत. पूर्ण दोन छकडे भरून पाहुणे त्यांच्या सोबत राहात. त्या सर्वांची सरबराई करताना गडी माणसांच्या नाकी नऊ येत. गावातील प्रतिष्ठित मंडळीही दादाजी-बरोबर पंगतीला असे. आईला क्षणाची उसंत नसे. दादाजींना ऐकू जाणार नाही अशा मोठ्या आवाजात आई मग चिडून बोले, "असं पाव्हण्यासारखं यायचं होतं तर आले कायले. आलेही तरी एक पाय घोड्यावरच आहे. अन् गावोगावचे शंभरजणं सावडून आणले!"

आई असे संतापे खरी. पण त्या शंभर उबाऱ्यांची सरबराई व्यवस्थित करी. एखादे वेळी आई मला हळूच हाक मारी, "तेंईले चहा प्याले हाक मार. एकटेच असतील तर सांग." मी दहा पाच चकरा चावडीकडे मारी. दादाजी बहुधा एकटे नसत. कंटाळून कंटाळून मी त्यांना सांगे, "दादाजी चहा प्याले चाला."

"अरे वा, मधूजी है क्या? चहा इथंच पाठवायला सांगा. मोठी किटलीभर सांगा. अनायासे निजामभाईही घेतील."

"नाई नाई. तुमीच घरी चाला. मायनं तुम्हाले बलावलं."

माझ्या ह्या त्राग्याला दादाजी आभाळ गडगडल्यासारख हसत. तेथे बसलेली इतर मंडळी मात्र तशा वेळी अधिकच चूप होई. मग निजामभाई त्या शांततेचा भंग करीत दादाजीला सांगे,

"अरे बाबुराव, तू चाय लेके आ जा. हमारे लिये यहाँ भेज दे."

"नही जी निजामभाई, सब लोग यहाँही लेंगे. क्यों मधूजी, कैसा है खयाल?"

यावर मधूजी काय बोलणार! पण निजामभाई पक्का. तो जणू हातघाईवर आल्यासारखा दादाजीस घरी जायला भाग पाडायचा. तो दादाजीचा बाळमित्र. तो असे काही वागायचा म्हणूनच माय त्याच्याशी फार चांगली राही. दादाजी-बद्दल तक्रारी करी. ते घरी येत नाहीत, निजामभाईने आपल्या त्या लहान्या भावाला समज द्यावा म्हणून याचना करी. निजामभाईही शक्य तेवढे करी. पण अखेर पराभवून म्हणे, " मोठी पाटलीन, बाबुराव माझ्यापेक्षा वयानं ल्हान आहे. पण मानानं व ज्ञानानं तो आम्हांला वालिदांच्या ठिकाणी आहे. तो नातं पाळतो हे खरं, पण ज्या गोष्टी त्याच्या त्याला समजायला हव्यात त्या आम्ही कशा सांगाव्या. घरगुती मामल्यात आम्ही कितीही झालो तरी परके."

दादाजी येण्याचे दोन दिवस आल्या न आल्यासारखे संपून जात. दर सांजेला होणाऱ्या मिष्टान्नाच्या पंगती, चावडीतले मोठमोठ्याने हासणे, सारे मग संपून जाई. पुन्हा चावडीला कुलूप लागे. दोन बैलगाड्या माणसांनी खचोखच भरत. त्यातच दादाजी राहात. सारा गाव नदीपर्यंत मग त्या छकड्यांसोबत जाई. अनावर हासणे उतू घाडणारे सारे लोक या वेळी मात्र प्रेतयात्रेतल्यासारखे चूप राहात. आई रडून रडून डोळे सुजवून घेई. तिच्याशी त्या वेळी बोलण्याची सोय नसे. कारण असो नसो, मग माय सतत आठ दिवस चिडक्यासारखी वागे. जराशा निमित्ताने मला इंधनाच्या झिलपीने चोपून काढी.

दादाजी घरी येत नसत. पण त्यांचे अस्तित्व साऱ्या घरावर राही. दिवाणजी, गडी, गावकरी सारे त्यांची जाण घेऊन आमच्या घराशी सुतासारखे सरळ वागत. आई नुसती पायरीवर उभी राही. वाटेवरच्या कोणत्याही माणसाला थांबवे आणि सांगे, " संतूस दोन पोहरे पानी आन बरं बेटा. " संतूसला मग कितीही काम असो. तो मुकाट्याने पाणी आणून देई.

चावडीत बसण्याची मला लहर येई. अशा वेळी आई मोठ्या हरिखाने चावडी उघडून देई. मी तेथे पुस्तक वाचीत असलो की ती माझ्याकडे कौतुकाने पाही. "सुधमुध तेईच्यासारखा वाचते. ह्या तेइच्या वयनावर गेला." आई मग मला एकेक गोष्ट उल्हासाने दाखवी. "बाबू! हे खोली आहे की नाही, इथंच तुहे दादाजी कसरत करेत." मग मी मायला विचारी, " का ओ, दादाजी घरी काऊन नाही राहात!"

आई चूप राही. एखाद्या वेळी म्हणे, " माहा नशीब फुटकं. तूच इचार

तेइले." मीही ठरवी की दादाजी भेटले म्हणजे त्यांना विचारायचे. पण संधी येत नसे. त्यांच्या सहवासात इतर गोष्टींचे भानच राहात नसे. तरीही एकदोनदा मी त्यांना तशा स्वरूपाचे काहीतरी विचारल्याचे स्मरते. पण अशा वेळी त्यांचे डोळे असे काही भयानक शांत होत की आपण उगीचच या हासवत्या माणसाचा विचका केला असे मला होऊन जाई.

मी इंग्रजी शाळेत शिकायला गेलो त्याआधीचा एक प्रसंग. दादाजी घरी फारसे येत नसले तरी दिवाळीला मात्र हमखास येत. त्या वर्षी मात्र ते आले नाहीत. आईने तेवढ्या कारणाने खूप आदळआपट केली; 'माहेरी निघून जाते.' 'मुलं सांभाळा' इत्यादी निरोप कधी नव्हे त्या धिटाईने दादाजीस पाठविले. परंतु सर्वांना उत्तर एकच आले की ते येणार नाहीत. मग आईने रडणे थांबवले. आमच्यापुरता सण केला. आग्रहाने खायला घातले. खूप आनंदात ती दिसत होती. एके रात्री—बहुधा लक्ष्मीपूजनाच्या—मी झोपेतून उठून पाहिले, आई शिळ्या भाकरीचे तुकडे खात होती, रडत स्वतःशीच पुटपुटत होती, "नाही तुमची मर्जी लागत तर नका येऊ. माहा मागच्या जन्माचं जेवढं पुण्य होतं तितके मले तुमचे पाय दिसले. मी वांढाय आहे म्हणून तुम्ही घर सोडलं असे तरी वैऱ्याइले वाटू नका देऊ."

त्या प्रसंगामुळे दादाजीबद्दल माझ्या मनात जी अढी निमाण झाली ती अजून कायम आहे. दादाजी घरी का येत नसत या प्रश्नाची उकल मी तेव्हापासून करू पाहात आहे; आडूनतिडून अनेकांपासून मी दादाजींची माहिती घेतली; पण दादाजी हे सर्वांनाच गूढ आहे.

दादाजींचा पहिला विवाह त्यांच्या इच्छेविरुद्ध आमच्या आजोबांनी केला होता म्हणे. पहिले कुटुंब सहा महिन्यांतच वारले तेव्हा दादाजी पुन्हा लग्न करण्याच्या मुळीच मनःस्थितीत नव्हते. त्यांना निश्चित काय करायचे होते, कसे जगायचे होते हे एक ईश्वरच जाणे. कारण त्यांचे कर्तृत्व व आवडीनिवडी तऱ्हेतऱ्हेच्या गुंत्यांनी भरलेल्या होत्या.

ल्हानपणी त्यांना अनेक छंद होते. आजोबा धार्मिक व घरात बाईमाणसाचा पत्ता नाही अशी स्थिती असल्यामुळे दादाजीवर छत्र कुणाचेच नव्हते. मोर्शीच्या एका नाग्या साधूजवळ माझ्या दादाजींची गोष्ट निघाली तेव्हा तो मोठ्या

उत्साहाने म्हणाला होता, "हां, हां वह बाबुराव पटेल ना! बडा गांजा पिनेवाला वस्ताद!! हां, हां! ऐसा आदमी लाखोमे बिरला! वाह!"

स्पर्धेने मैफलीत गांजा पिणे यात जसा हातखंडा, तसेच जुवा खेळण्यातही त्यांचा हात कुणी धरीत नसे. मोठमोठे जुवारी त्यांना वचकून असत. त्यांना हनुमान वगैरे प्रसन्न असल्याच्या वंदता होत्या. अडचणीतून मार्ग काढण्याच्या त्यांच्या युक्त्या तर कितीकच! गावाचा उपाशी मजूर त्यांनी पुलगावच्या सैनिक-तळावर पोहोचवला व परत यायला उशीर लागल्यामुळे पहारेकरी गुरख्यांच्या बंदुकीचे भक्ष्य होण्याची पाळी आली. तेव्हा सिमेंटच्या धुळीने अंग माखून घेऊन हमालांच्या घोळक्यासोबत ते बाहेर पडले.

त्यांच्याबद्दल या व अशा अनेक कथा लोक चवीने सांगतात. एकदा नागपूरला जवळचे पैसे संपले म्हणून गोट्यांचा खेळ खेळून पैसे जमवीत ते गावाला पोहोचले. स्पर्श करतील ती गोष्ट त्यांना आत्मसात होई. एकदा अमरावतीला त्यांनी घरचा सारा कापूस विकला; पण सारे पैसे (बहुधा जुव्यात) गमावले. लगेच दादाजींनी पठाणाचा वेष घेऊन हकिमी सुरू केली. एका महिन्यात दीड हजार रुपये कमावून ते घरी आले. ती काही खरी वैद्यकी नव्हती. आपल्या भाषाचातुर्याने श्रीमंत आजाऱ्यांवर छाप पाडून खडूचा भुरकाच त्यांनी पंचवीस रुपये तोळ्याने विकला म्हणतात. पण ही गोष्ट दादाजींना लागून राहिली. आणि नंतरच्या दिवसात त्यांनी नेटाने वैद्यकीचा अभ्यास करून आसपासच्या वीस कोसात निष्णात वैद्य म्हणून लौकिक कायम केला. तो एक प्रसंग सोडला तर त्यांनी उभ्या आयुष्यात एकाकडूनही दवेचा पैसा घेतला नाही. मौल्यवान् दवाही त्यांनी स्वतःच्या पैशाने लोकांना फुकट वाटल्या. अनेकदा तर एका वर्षात दहा हजार रुपयांपर्यंत धर्मादाय दवाखान्यावर त्यांनी खर्च केला. आयुर्वेद व निसर्गोपचार हे गरीबांना परवडणारे उपाय आहेत म्हणून त्या प्रथमदर्शनी परस्परविरोधी वाटणाऱ्या चिकित्सापद्धतीची सांगड घालण्याचे शास्त्रोक्त प्रयोगही त्यांनी केले.

असा हा पुरुष नेमका घरी येण्याचे टाळतो हे मला नेहमी खटके. ते घरी न आल्याने पुढे पुढे आमच्या घराची अवस्था फार बकाल झाली. दावणीला बैल नाही, की उत्साही शेतकऱ्याच्या घरी दिसणारा कसलाही उद्योग नाही; जेव्हा जेव्हा बघावे तेव्हा आईचे तोंड उतरलेले व डोळे सुजलेले असा ताल झाला. माझी

कुठलीही वाढ त्या घरात होईलसे वाटेना. आईकडे ओढ असूनही त्या घरात मन न रमल्याने मी सुट्टीतही घरी जाण्याचे टाळत असे. दादाजी ज्या गावी राहात तेथे मात्र नेमके त्याच्या उलटे चित्र होते. आमच्या घरी दादाजींनी एक पोरका मुलगा वाढवला होता तो सज्ञान झाल्यावर त्याची शेती व पैसा सरकारने त्याच्या हाती दिला. दादाजींनी त्याच्या गावी त्याला नेऊन संसार थाटून दिला व ते संन्यास घ्यायला म्हणून रामकृष्ण आश्रमात प्रयाग येथे गेले. त्या मुलाने हट्टाने त्यांना परत आणले. अर्थातच ते घरी परतणे शक्यच नव्हते. तेव्हा त्याच मुलासोबत ते राहू लागले. तेथे त्याच्यावर भार नको म्हणून आईने आपले दागिने मोडून त्यांना शेत घेऊन दिले व त्याचे उत्पन्न त्या पोराला देऊन दादाजी दोन वेळा जेवण करू लागले.

अशा संसारविरक्त माणसाबद्दल अनेकांप्रमाणे मला आदर वाटायला हवा होता. खऱ्या अर्थाने तो कधीच वाटला नाही. ज्या गावात ते राहिले तिथले चित्र फारच रमणीय होते. श्रीमंत तरुणांना जीवनाचे यथायोग्य ज्ञान दिले तर समाजाची वेगळी क्रांती घडवण्याची आवश्यकता नाही असे त्यांचे मत होते. त्याआधी पाचसहा वर्षे तुकडोजी महाराजांबरोबर भटकून आणि तऱ्हेतऱ्हेचे साधू जमवून, यज्ञ घडवून वगैरे त्यांनी पुरेशी क्रांती का काय म्हणतात ते करून पाहिले होते. नंतर मात्र त्यांनी हा उपक्रम सुरू केला—कुठलाही श्रीमंत मुलगा दिसला की त्याला गाठायचे, सोबत वागवायचे व त्याला विवेकानंदांची पुस्तके वाचायला द्यायची. सुटीत मीही त्या सर्व कार्यक्रमात सामील होई. गावाला जाऊन आईचा रडवा चेहरा पाहण्यापेक्षा ते फारच लोभस होते. वीस बावीस तरुण श्रीमंत व जोडीला काही गरीबही एकत्र राहताहेत. दादाजींचा हास्यविनोद चाललेला आहे. तीनचार कपाटे भरून आयुर्वेद, शेतकी, तत्त्वज्ञान इत्यादी विषयांवरची पुस्तके ठेवली आहेत. त्यांचे वाचन सर्वजण करताहेत—मोठेच सुंदर दृश्य ! आणि त्या पोरांची सरबराई किती ? दूध, तूप, काय वाटेल ते—सारा गोकुळीचा थाट. त्या सर्व पोरांचे आईवडील बिचारे पोरांना घरी परत नेण्यात अयशस्वी होत. दादाजी म्हणजे त्यांचा वैरी नंबर एक ! या माणसाने आपल्या कर्त्यासवरत्या मुलांवर मंत्र-मोहिनी घातली असा त्यांचा प्रामाणिक अंदाज असे.

दादाजींचे हे जीवन पाहून मग मीही एक दिवस शाळेला रामराम ठोकला. त्या वेळी दादाजी नुकतेच डॉ. धर्मानंद कोसंबी यांची अखेरची सेवा करून सेवा-

ग्रामहून परत आले होते. सोबतच त्यांनी विनोबा–तत्त्वज्ञान, उकडलेल्या भाज्या इत्यादी आगल्यामुळे संपूर्ण दीड वर्ष मग आहारशास्त्राचे प्रयोग, तिखट वर्ज्य, ग्रामसफाई इत्यादींना ऊत आला. त्या मंडळीत मीही होतो. इतर मुलांच्या मानाने दादाजींचे प्रेम आपल्या वाट्याला कमी येते असे मला नेहमी वाटत राही. ते सले. मग मी कुरापत काढून पाही. पण दादाजी मख्ख. या माणसाने स्वतःचा संसार सोडला असतानाही पुन्हा हा व्याप का, हा प्रश्न मला नेहमी सतावी. त्यांचा स्वार्थ, आसक्ती गेली होती तरी नवी शेते विकत घेणे, बरडी जमीन सवान करणे, प्रयोग करून शेती पिकवणे नेहमी चालू असे. त्यांनी पिकविलेली फळे व भाज्या जिल्ह्याच्या मार्केटात पहिला उच्च भाव घेत. गाई-म्हशींची खिल्लारे वाढवून त्यांनी दुधाचे ओहोळ व खताचे ढीग निर्माण केले. ज्याच्याकडे राहात त्याची शेती व धन अमाप वाढविले. हे त्यांनी आमच्यासाठी का करू नये याबद्दल मी चिडे. ते म्हणत, " मुलाबाळांसाठी इस्टेट करणं हा स्वार्थ. त्यात मी गुंतून जाईन. खरं म्हणजे मी काहीच करायला नको. पण इंद्रियांचं वळण ना ! " म्हणूनच इकडे स्वार्थत्याग पुरेपूर बाणलेला असूनही इस्टेट वाढवणे, तिचा कारभार करणे व आपले कर्तृत्व गाजवणे हे त्यांचे चालू होते. पुढे पुढे तर त्यांनी धनाला साधा स्पर्श करणेही सोडले. एक आण्याच्या नाण्यालाही ते स्पर्श करीत ना. रामकृष्ण परमहंस यांचे शरीर रुपयाच्या स्पर्शामुळे दुखावले होते. त्या कथेतल्यासारखे होण्याचा हव्यासही त्यांना होता हे पाहून पुन्हा मला कोडे पडे की हा आहे कोण ?

दुसऱ्या भोकाची गुंडी पहिल्या भोकास व बरेचसे टोपीबाहेर आले आहेत असे केस असलेला भव्य चेहरा, कधीही सुटू शकणारे एक भोंगळ धोतर व सदरा आणि धोतर यांची मलीनपणात चढाओढ असा त्यांचा बेंगरूळ अवतारही आम्हांला ओढ लावून जाई. त्यांचे पोट सुटलेले होते; पण आधीच्या आयुष्यात त्यांनी खूप व्यायाम केला होता म्हणे. कच्ची कणीक व दूध ते तसेच ओरपीत असत. हा माणूस आरंभी पाहून अपरिचित माणूस त्यांच्याविषयी वेगळ्या कल्पना करी. पण एकदा या बावळ्या माणसाची जीभ चालू लागली की साक्षात सरस्वती उतरल्याचा भास. बोलण्यातली ओज म्हणतात, भाषेचा रुबाब म्हणतात तो फक्त मी दादाजीत पाहिला. " नुसत्या बोलण्याच्या बळावर तुम्ही कोठेही स्वामित्व स्थापाल. " असे आम्ही कधी म्हटले तर ते एकदम गंभीर होत.

कधी खुशीत असले तर आमच्या बोलण्यावर उत्तर म्हणून स्वतःच्या हातावरची दहा चक्रे दाखवीत. हस्तसामुद्रिकानुसार ते चिन्ह प्रभुत्वाचे आहे म्हणे.

शाळा मी दोन वर्षे सोडली खरी; पण या माणसाच्या नादी लागून आपले भले होईल असे मला पटेना. घर सोडले, बायको सोडली, आता ईश्वरभक्तीस लागला. पण धड ईश्वरभक्तीही नाही आणि दुसऱ्यासाठी धन जोडून धड स्वार्थही नाही, हे त्यांचे विक्षिप्त जीवन मला मानवणार नव्हते. त्यांनी समाज-क्रांतीच्या व आत्मोन्नतीच्यासाठी गोळा केलेली तरुण मंडळीही हळूहळू पांगली. संसाराला लागली. माझ्यापुढे मोठे शून्य निर्माण झाले. दादाजी हा अयशस्वी महात्मा व अव्यवहारी व्यवहारपटू असा पुरुष आहे; बेचाळीसच्या सत्याग्रहीं-पासून आजूबाजूच्या अज्ञ, रुग्ण, दरिद्री लोकांपर्यंत सर्वांचा आधार, सल्लागार, पण मलाच तेवढा निरुपयोगी आहे म्हणून मीही एक दिवस त्यांचा निरोप घेतला. पुन्हा शाळेत दाखल झालो.

मॅट्रिकमध्ये शिकत होतो तोपर्यंत आईपेक्षा दादाजींकडेच जास्त जात राहिलो. मुलाबाळांची त्यांना आसक्ती नव्हती. आम्हांलाही प्रेम नव्हते पण आवश्यकता होती. मी त्यांना दिसेपर्यंत माझी आठवण त्यांना येत असेल असे वाटत नसे. शिवाय या दिवसात त्यांचे जपध्यान वगैरे वाढत्या प्रमाणात होते. खुर्चीत ते पडले म्हणजे आम्ही हाका मारूनही त्यांना ऐकू जात नसे. कुठल्या तरी तंद्रीत ते हरवत.

अशातच त्यांना ऐंशी दिवसांचा टॉयफाईड झाला. त्यांचा जो मानलेला मुलगा त्याने फार श्रम घेतले व त्यांना वाचवले. याही आजारात डॉक्टर खुद्द दादाजीच. मी नंतर काही दिवसांनी त्यांना भेटायला गेलो. त्यांच्या गत आजारा-बद्दल फारसा जिव्हाळा दाखवला नाही म्हणून ते खूप चिडले. मला आनंद झाला. मी म्हणालो, " चला, बायकोची, मुलाबाळांची नाही, तरी स्वतःची चौकशी तुम्हाला आवडते. " ते दचकले. असे मी त्यांना कधी बोललो नव्हतो. त्या वेळी ते चूप राहिले. पण तीन दिवसांनी जणु त्या घटनेचा संदर्भ घेतल्यासारखे मला म्हणाले, " काही दिवस तुझ्या आईकडेही राहून ये. " पुन्हा ते म्हणाले, " इस्टेट कमावण्याचा माझा छंद सुटला नाही हा माझा मोठा पराभव असू शकेल; पण माझी जित यातच की ती कमावताना मला माझी किंवा मुलाबाळांची मालकी त्यावर असावी असं वाटलं नाही. " मी यावर चूप राहिलो. पुन्हा ते

म्हणाले, "पण मी तुमचं नुकसान केलं नाही. तुझ्या आजोबांच्या शेतीतला एकरही कमी केला नाही. इतःपर अधिक हवे तर स्वतः मिळवा. मी आता देवाचा झालो आहे."

वाईट हेच होते की सुव्यवस्थेने मुले बिघडतात हे त्यांच्या मनाने पक्के घेतले होते. म्हणूनच त्यांनी, आमच्यासाठी धन जोडले नाही, तसेच वैद्यकीतले काही दुर्मिळ नुचकेही त्यांनी मला कधी सांगितले नाहीत. मी त्यावर पैसा कमावीन ही त्यांना भीती होती.

मी अमरावतीस शिकायला परत आलो. दरम्यान दादाजी एकदोनदा अमरावतीस येऊन गेल्याचे कळले. मुलाकडे किंवा सासुरवाशीण मुलीकडेही ते कधी येत नसत. त्यामुळे आम्हा भाऊबहिणीस ते आल्याची नुसती बातमी कळे. एक दिवस असेच एकजण म्हणाला,

"काल दादाजी आमचेकडे आले होते."

"त्यांची तब्येत कशी होती?"

"झक्क! टॉयफाइड सफा गेला. आणि शरीर कसं नव्यानं भरून आलं आहे."

"बरं, परत गेले काय?"

"नागपूरला गेले, डीलक्सनं."

अरे देवा! त्याच गाडीला तर अपघात झाला होता. चारजण जागच्या जागी ठार झाले होते. माझे दादाजी असतील का त्या मेलेल्या लोकात? मी समोर पाहिले. तो निरोप सांगणारा गेला होता. मी धूम ठोकली. तार ऑफिसात गेलो. रामकृष्ण मिशनमध्ये तार केली, 'डीलक्समध्मे दादाजी होते. दवाखान्यात चौकशी करा.'

आणि लगेच मी मोटारीने नागपूरकडे निघालो. तेथे गेल्याशिवाय काहीही कळण्याची सोय नव्हती. मृतांपैकी तीन जणांची नावे वृत्तपत्रात आली होती. चौथ्या प्रेताबद्दल उल्लेख होता, 'एक हिंदु सज्जन.'

रात्री नागपूरला सरकारी दवाखान्यातल्या प्रेतांच्या खोलीत दहाबारा मुडद्यांना मी अंधारात चाचपून पाहिले. त्यातले एक प्रेत एका हिंदु सज्जनाचे होते. ते माझे दादाजी होते! "आपल्यास मृत्यू येताना माहीत होऊ नये, असा तो अचानक यावा. आजारात तर मुळीच येऊ नये." दादाजींनी धर्मानंद कोसंबींना म्हटले होते. कोसंबींचा अलौकिक मृत्यूही फक्त एकट्या दादाजींनीच पाहिला

होता. आता इच्छेप्रमाणेच मरण आलेले. दादाजींचे प्रेत दोनतीन तुकडे होऊन पडले होते. टिकेकर घाटावर गीतेचे श्लोक म्हणत मी त्या तुकड्यांना अग्नी दिला. दादाजींवर प्रेम नसल्यामुळे म्हणा किंवा ते गेले हे खरे न वाटल्यामुळे म्हणा मला दुःख झालेच नव्हते. मर्तिकाहून परत आल्यावर स्नान करून यथेच्छ जेवलो व ताणून दिली. अर्धवट झोपेत शेजारचे लोक मृताबद्दल बोलत असलेले मला ऐकू येत होते—" तसा माणूस लाख हो! पण बुवाबाजी फार. पोरंसोरं जमवून त्यांना ज्ञान सांगायचा. " मी आणखीही काही काही ऐकले. नंतर मात्र कंटाळून झोपून गेलो.

घरी अंतोऱ्यास त्यांच्या अस्थी घेऊन गेलो. उभ्या अठरा वर्षांत त्यांचा पाय घराला लागला नव्हता. म्हणजे या वातावरणावर आता त्यांच्या मृत्यूने वेगळा परिणाम होणार नव्हताच. आपल्या मरणाच्या कितीतरी आधी ते या घराच्या वास्तूला मेल्यातच जमा होते. मला त्या वेळी एक गंमत वाटली. सडकेपासून तो गावापर्यंत जी जी गावे मला लागली तिथली तिथली सर्व मंडळी माझ्यासोबत चालत माझ्या गावापर्यंत आली. ते अस्थीचे भांडे एका हातात धरून मी मनात म्हणालो, " चला, दादाजी तसे घरी नाही आले, त्यांच्या अस्थी तर शेवटी मी घरी आणल्या! " ज्यांची आपण तासन् तास पाठ दाबीत होतो, ज्यांच्याशी खूप भांडावेसे वाटत होते, ज्यांच्या विनोदी व विचारी स्वभावामुळे मी अनेकदा इच्छेविरुद्धही त्यांचेकडे ओढला गेलो त्या प्रचंड माणसाची फक्त काही हाडेच सध्या माझ्याजवळ होती!

घरी अंगणात दारातून आत शिरून तुळशीजवळ उभा राहिलो. दादाजी अपघातात सापडले हा पत्ता आमच्या आईस लागला होता. पण नक्की काय ते माहीत नव्हते. म्हणूनच माझ्या नागपूरहून येण्याची वाट ती पाहात होती. मला पाहून ती फारच आनंदली. पण सोबत गावोगावच्या लोकांची जत्रा व त्यांची उतरलेली तोंडे पाहून तिने मला अधीरतेने विचारले, " काय झालं, तेईची तब्येत कसी आहे? संगं आनलं काय? "

मी होकारार्थी मान डोलावली. तिने अधीरतेने पुन्हा प्रश्न केला, " कुठाय, कुठाय मंग ते? "

दादाजींचा स्पर्श घ्यायला आमच्या घराचा कणन् कण उत्सुक दिसला. अठरा वर्षांनंतर त्या घराला दादाजी आले !

मी गोंधळलो. दादाजी गेले त्याचा या घरावर आता वेगळा परिणाम घडणार नाही असे वाटत होते ते ढासळले. खालमानेनेच मी अस्थींचा डबा उघडा करून आईला दाखवला. आईने कुंकू पुसले.

नवयुग : दिवाळी १९६२

# ओघावेगळा सुरेश भट

सुरेश भटाची कवितेने भारलेली दुनिया मी बघत आहे ती उण्यापुऱ्या एका तपापासून. जगात या अवधीत खूप बदल झाले. सुरेश मात्र जसाचा तसा आहे. उत्क्रांतीच्या तत्त्वाला धाब्यावर बसवू शकण्याला एक कारण हे असू शकेल की त्याची प्रतिभा आणि जगण्यातला पक्केपणा यात पुरेशी उत्क्रांती त्याच्या व माझ्या परिचयापुर्वीच होऊन गेलेली असेल. उमाळा शिगेला आल्यावरच सांडण्याची सवय झाली म्हणजे कवितेत हळुवारपणे मोठे होण्याची आवश्यकता उरत नाही. भटाच्या ५१ सालच्या कविता व आजच्या कविता यात रचनेची सफाई अथवा अभिव्यक्तीची कल्हई हा फरक असेल; भावनांची उब्रळ जीची तीच आहे. आज त्याला सरकारने ओळखले म्हणून काही विद्वानही म्हणत आहेत की, ' अहो, भटांच्या कवितेतील ही ताकद आम्ही पूर्वीच ओळखली होती. ' हे असे म्हणणारे पुष्कळच प्रमाणात ढोंगी आहेत. इतके खरे की त्या त्या ढोंग्यांनाच नव्हे तर जातिवंत अरसिकांना, त्याच्या वैऱ्यांना देखील त्यांच्या कवितेत काहीतरी जोमाचे आहे याची खात्री होती. उदाहरण म्हणून सांगतो, जेव्हा दगडाचे डोळे आणि दवबिंदूचे रत्नजडित गुपित इत्यादींवर किंवा निळ्या व्यथा नि जांभळ्या भावना, चिंचेचे किंवा दुपारचे निःश्वास इत्यादीइत्यादींवर वादळगतीने रचना होत होती. त्या ५०-५१ च्या दरम्यानही भटाची कविता आपले वेगळेपण राखून होती. मान्यवर मासिकातून त्याची रचना प्रसिद्ध होण्यात बरेच अडथळे होत होते. तरीही एखाददुसऱ्या ठिकाणी त्याच्या—

" राबणारे हात आम्ही
राबणारे हात
पारखा ही मनगटे, वा
पारखा पोलाद "

अशा ओळी दिसल्या की तत्कालीन नवकाव्याच्या वादळाला बळी पडलेले लोकदेखील बोलून जात की त्या ओळींमध्ये एक नवे वादळ भरलेले आहे. पन्नास सालापासून मराठी कवितेला जे एक दुर्ज्ञेय तंत्र लाभले त्याचे दोन परिणाम बहुतेक कवींवर झाले. पहिला असा की मुळीच अभिप्रेत नसलेली, नवटीकेने शोधलेली वैशिष्ट्ये रसिकांना आंधळेपणाने मान्य करावी लागली. कवींना देखील तसे भास होऊ लागले. दुसरे म्हणजे कवींची नंतरची रचनाच मुळी नवटीकेला संवादी अशी व्हायला लागली. सुरेश भट या दोन्ही दुष्परिणामातून अलिप्त राहिला. तंत्र जमले नाही तर वेगळे सोईस्कर तंत्र शोधण्यात व ते मान्य करवून घेण्यात बराचसा वेळ खर्च होतो. किंवा तंत्र तोडण्याचे बंड करून त्याबद्दल गौरव मागण्याची चढाओढ चालते. सुरेश भटाच्या बाबतीत असे अट्टाहासाने म्हणावे लागेल की, त्याला सर्वच तऱ्हेच्या कविता उत्तम रीतीने करता येत असल्यामुळे जीवनाव्यतिरिक्त दुसऱ्या कोणाशी झगडण्याची गरजच भासली नाही.

त्याचे जीवन वरवर दर्शनी बरेचसे बकाल आहे. खाण्यापिण्याची, विश्रांतीची पर्वा न करणारा हा माणूस सर्वच बाबतीत अनियमित आहे. अस्थिर आहे. एक तऱ्हेचा कडक राठ बेछुटपणा त्याच्या भव्य चेहऱ्यावर आल्याने तो चेहरा त्याच्या मित्रांनाही उग्र वाटतो. पण बेवारस खडकावर उगवलेल्या तृणांकुराप्रमाणे शोभणारा बालकभाव, एक निरागसपणा त्याच्या चेहऱ्यावर दुसऱ्याच क्षणाला दिसतो. त्याच्या बोलण्यातली स्वप्ने, मते मांडताना दिसणारा भाबडा आग्रहीपणा आणि शिष्टाचारी विश्वाला न पेलणारी त्याची शेलकी शब्दावळ हे सारेच न्यारे असते. धुंदी हवी असलेल्यांना, नित्याचे जग नकोसे झालेल्यांना भटाचा सहवास मस्त वाटतो. निसर्गाला शरण गेलेल्या निद्रिस्त जगाकडे पाहात हा मस्त जीव रात्र रात्र कविता म्हणत बसलेला असतो. या धुंदीत आपण गावाबाहेरच्या पुलावर रात्र काढीत आहोत की गस्तीच्या पोलिसाला काळजीत टाकून भर चौकातच आवाज लावीत आहोत याची त्याला तमा नसते. आणि अशा जग जिंकणाऱ्या नशेतून जर सोबत्यांनी घरी जाण्याची गोष्ट काढली तर भट जी उत्तरे परजून त्याला हलाल

करतो ती तर लिहिण्याची सोयच नाही. भटाच्या या अशा वागण्यात खोटेपणा असू शकेलसे मलाही वाटत होते. पण त्याच्या धुंदीचे हे वादळ जेव्हा त्याच्या बी. ए. च्या वार्षिक परीक्षेच्या आधल्या दिवशीही मी पाहिले तेव्हापासून मी त्याच्या अस्थिर जीवनापेक्षा लोकांच्या स्थिर जीवनाचाच संशय घेऊ लागलो. काहीही बदल न करता इतक्या तडफेने कालचे जीवन आज टिकविणारा माणूस भटाशिवाय दुसरा निदान मी तरी पाहिला नाही. आपल्या कविमयतेचे प्रस्थ वाढविण्याचे हजार प्रयत्न लोक करतात. दाढी वाढविण्यापासून टक्कल करण्यापर्यंत मजल जाते; पण या वेगळ्या राहणीत जीवनाच्या झळी सोसण्याची कुठलीही तयारी नसते.

भटाला आज तशी आवश्यकता नसली तरी पोटापाण्याचा प्रश्न इतःपर आई-वडिलांवर न सोपविण्याचा निर्णय त्याने अधूनमधून घेतल्याचे आढळते. मग मुंबई, पुणे, इंदूर, तरोडा, येवला ( ही आपली शेदोनशेच्या वस्तीची ठिकाणे ) या अशा कितीतरी ठिकाणी त्याने आपणहून नोकऱ्या केल्या. नोकरी त्याला लाभी नाही. फार फार फारच तर तीन महिने तो एक नोकरी करू शकला. हे मात्र खरे की अल्पावधीसाठी का होईना पण आपल्या हाती एक बुद्धिमत्तेचा राक्षस नोकरीला होता अशी मालक मंडळीची खात्री होत असते.

त्याच्या आवडीचा व्यवसाय आहे वृत्तपत्राचा. या भुईवर, इथल्या कंगाल देहावर व मोठ्या मनावर या तरुणाचे खूप प्रेम आहे. या गरीब गांजलेल्यांच्या दुःखाला वाचा फोडता यावी, स्वार्थी जगावर जीवभरून तडफडता चडफडता यावे म्हणून त्याची लेखणी वृत्तपत्रव्यवसायात झिजायला सदाच उत्सुक असते. अर्थातच या धोरणाने चालत असणाऱ्या वृत्तपत्रांची सर्वच भवितव्ये भटाच्याही वाट्याला आली आणि आजवर तीनचार वृत्तपत्रे त्याला मांडावी मोडावी लागली. भीती हा शब्द त्याला ठावा नाही. तो कोण्या वेळी कोणावर उखडेल त्याचा नेम नाही. लोक चरफडतात. एकदा तर या शहरात चांगला चारपाच हजार जनांचा समुदाय मोर्चा काढून त्याच्याबद्दल नापसंती व्यक्त करून गेला. त्या वेळी त्याचा मित्र या नात्याने मलाही गौरवाचे भरते आले.

गरीबांची बाजू घेऊन इतके चिडणारा हा स्वभाव त्यामुळेच नाजूक आहे. खूप ओला आहे. आणि नेमका त्याच लयीत त्याचा विनोद आहे; भाषिक आणि सक्रियहि. त्याचा विनोद विशेष फुलला तो त्याच्या कॉलेजजीवनात.

सामान्य माणसाला भीती वाटावी इतका त्याच्या विनोदात आनंद असतो. वृत्तपत्रीय जीवनात तो विनोद छद्मी, विडंबनी व कधी कधी तर स्वरूप पालटून निर्भर्त्सनेच्या चेहऱ्यातही येतो.

त्याच्या जीवनावर लिहीत होतो तेव्हा खरे म्हणजे मला ते सारे त्याच्या कवितेवरच लिहावयाचे होते. त्याच्या वहीवर सहसा न आढळणाऱ्या कितीतरी ओळी त्याच्या टिकाऊ क्षणाची नोंद करून आम्हा लोकांच्या स्मरणात राहात आहेत. क्षणाचाही विलंब न करता तो प्रेमिकांची टिंगल करून जातो—

" मेरे दिलके दहिवडे पर
उसने अपनी नजरोंकी खटाई झोकी ! "

किंवा

" माझ्या मनाच्या म्हशीला
तुझ्या स्मृतीचा गोचीड "

आणि त्याच्या वृत्तपत्रातून येणाऱ्या एखाद्या लोकप्रिय गीताच्या राजकीय विडंबनाकडे तर लोक अक्षरशः डोळे लावून असतात–ती उदाहरणे देण्याचा मोह टाळणेच बरे.

भरपूर पण अनियमित खाणे, झोपणे, फिरणे, वाचणे, लिहिणे यात सुरेश भट आला. किंवा कवितेची वही, ( ती स्वतःचीच हवी असे नाही. चांगल्या कविता कोणाच्याही चालतात. त्यावर स्पष्टीकरण असे, " अबे...मिठाई कैसी बनी ये देख. हलवाईकी पुछताछ क्यों करता ? " ) कडकातली कडक तमाखू, चार पाच मित्र ( भटाच्या आधी न थकणारे ) इतके असले म्हणजे भटाला स्वर्ग मिळतो. हे त्याचे निष्काळजी जीवन पाह्यले म्हणजे ' चिवचिवते फक्त शून्य काटेरी घरट्यातून ' ही किंवा, 'येथल्या मुलामुलीत खेळते मराठी।' 'येथल्या लहानग्यात रांगते मराठी,। गीत तुझे मी आई गाईन,' या सर्व नाजूक ओळी या कविताही माणसाने लिहिल्या हे खरे वाटत नाही. त्याचे जीवन जसे इतरांहून वेगळे तशा कविताही इतर कवींहून ' वेगळ्या. बऱ्याचदा तर त्याच्या मित्रांना दिसलेल्या जीवनापेक्षा त्याचे काव्य कितीतरी बदललेले असते. कधी कधी मात्र लोकांच्या डोळ्यातून तोवर सुटलेले भटाचे एखादे वैयक्तिक दुःख कवितेचे आभाळ पांघरून अधिक नम्र होते नि एकदम ओळखायला येते. 'पांगळ्या पायास माझ्या श्वास माझा रोखतो. '

कोणाच्याही अनुकरणाची त्याला गरज भासली नाही त्याचे एकमेव कारण म्हणजे समकालीन कवीच्या अकाली व अवास्तव कीर्तीचाही त्याने कधीच हेवा केला नाही. तद्वतच कोणत्याही संप्रदायाला तो बळी पडला नाही. प्रकृतीने दिलेल्या ओळीच त्याने पकडल्या. सुविद्य मातोश्रींनी त्याचे हृदय संपन्न केले व ज्ञानेश्वरीपासून आजच्या बोलीपर्यंत सर्वच थरातील शब्दसंपत्तीचा परिचय घडवला. वडील वरकरणी नाराजी दाखवीत असले तरी त्याच्या काव्यजीवनाला व लेखनाला त्यांनी कुठेही आडकाठी केलेली नाही.

सुरेशचे जीवनवरकरणी अस्थिर व अवाढव्य आहे. पण कुठे तरी एक शिस्त आहे. कुठे तरी हिरवळ व कोवळेपणा जपलेला आहे. या बेछूट जीवनातही त्याने आपल्या अभ्यासासाठी राखलेले इमान हेवा करण्यासारखे आहे. तो मुद्दाम कधी पुस्तक हाती घेणार नाही. पण हा राक्षस एकदा वाचू लागला म्हणजे मग त्याला साध्या न्याहारीला एक त्याच्याएवढे लठ्ठ पुस्तक लागते. मग वाचनालयाचे घड्याळ थबकते. इंग्रजी, मराठी, हिंदी उर्दू कोणतीहि भाषा असो—त्याच्यासाठी ती अगदी मातृभाषाच आहे. उर्दूमध्ये काव्याचे भांडार दडले आहे याचा पत्ता त्याला लागला मात्र. त्याने इथल्या प्रख्यात उर्दू जाणकाराजवळ शिकवणी लावली. तो पर्शियनही शिकला. उर्दू रचूही लागला. हिंदी रचनेचा सराव तर त्याला मराठी इतपतचा जुना आहे. हिंदीभाषी व उर्दूभाषी मित्रांचा त्याच्याभोवती असलेला गराडा पाहिला म्हणजे आम्ही त्याला सुरेशचांद भट असे म्हणत असू. उर्दूच्या उच्चाराची विशिष्ट वळणे आहेत. ती त्याला पूर्ण लकबीनिशी मालूम आहेत. त्याचे उर्दूवरचे प्रभुत्व एकाच पुराव्याने सिद्ध व्हावे. कॉलेजात त्या साली यूनोची प्रतिरूप सभा झाली होती. ट्रिग्वेलीच्या भूमिकेत मी देशोदेशांचे प्रतिनिधी न्याहाळीत होतो. पाकिस्तानचे नुमाइंदे अजून यायचे होते. प्रतीक्षेच्या दुसऱ्याच क्षणाला एक जाडजुड व्यक्ती आपली थोटी (व खोटी) दाढी गोंजारीत मस्त चालीने सभागृहातून स्टेजकडे येऊ लागली. मलाच नव्हे तर सर्वच लोकांना ओळखायला ताण पडला की तो सुरेश भट होता. आणि पाकिस्तानची बाजू मांडताना त्याचे ते नाटकी कोकलणे, हाताचे थरथरणे, मुठी वळवणे, आणि 'इस्लाम धोके मे' इत्यादी गर्जना करणे तर मला आजही शहारून टाकतात. विषय होता काश्मीरचा. हे नुमाइंदे बहस करू लागले:

"कश्मीर की गरीब जन ता हिंदोस्ताँके दुहरी ताकदोसे मुकबला नही कर

सकी तो उसने अपने दोस्ताने का दस्त मुल्के पाक के तरफ बढाया। हमारे वझीरे आझम भी अपनी बिरादरी में कामयाब रहे ...'' इत्यादी इत्यादी. आणि हे सर्व भाषण समयस्फूर्त होते. इंग्रजी वक्तृत्वात हाच बाणा. मराठी, हिंदी भाषेत झालेली भटाची भाषणे तर कॉलेज विद्यार्थ्यांपासून इथल्या सामान्य जनतेपर्यंत साऱ्यांच्याच परिचयाची आहेत.

या सर्व भाषांचे ज्ञान वाढवताना ज्या खस्ता भटाने खाल्ल्या त्या केवळ तोच जाणू शकेल. पांढरपेशा लोकांची दुपारची झोपमोड करीत व त्यांच्या संस्कृतीची इस्तरी पूर्ण विस्कटून टाकीत त्याकाळी भट ढोलक-पखवाजाची तालीम करीत बसलेला असे. लावणीच्या सातारी ढवीपासून तो खानदेशी व वऱ्हाडी हेलातल्या नजाकती तुळण्यापर्यंत सारा अभ्यास त्याने प्रत्यक्ष केला आहे. 'वधू-परीक्षा' ही नाट्य-लावणी ( वग ) इथल्या साऱ्या रसिकांना वेड लावून गेली. हा 'गोजा' माणूस संगीताचा देखील मोठाच दर्दी आहे. आता त्याने त्याच्या मित्राच्या 'स्वप्नवासदत्तम्' साठी काही गीते दिली ती वाचण्याऐकण्याने या विधानाची खात्री होईल.

उर्दूच्या अध्ययनाने त्याने मराठीत गझले रचली. ती मराठीला मिळालेली नवी देणगी म्हणावी लागेल. माधव ज्युलियनच्या खांद्यावर बसलेले हे बालक त्याच्याहून उंच आहे असे म्हटले तर त्यात कोणाच्या भावना दुखू नयेत, उलट मराठी कवितेचा गौरव व्हावा. 'दुःख माझे माझियापाशी असू दे, ते बिचारे एकटे जाईल कोठे' किंवा 'तुटलेल्या पंखास पुन्हा आभाळ दिसावे' सिंधूला जलबिंदूचे सामर्थ्य कळावे' किंवा 'पूर्तता माझ्या व्यथेची माझिया मृत्यूत व्हावी' ह्या रचना मराठीला फार नव्या आहेत. आताशा मराठी कविता ही छापील स्वरूप धारण करीत आहे अशा वेळी—

अमृतमय मी अमृतमय तू
तनमन अमृत बनते ग

या कवितेतील थरथरणारे अमृतनभ, आत्म्याच्या चांदण्यात घुमणाऱ्या परस्परांच्या हुरहुर हाका, प्राणाच्याही पार घडणाऱ्या भेटी, स्पर्शाविनाही भिरभिरणारे धमन्यामधले स्पर्शाचे वादळ, आणि 'तुझी नव्हाळी माझी तगमग, कोण कुणाला खुडते ग ?' हा अमृत प्रश्न ! हे सारेच न्यारे आहे.

सुरेश भट जातीचा कवी आहे हे अट्टाहासाने म्हणावे लागत आहे. त्याचा हा आणखी एक पुरावा—

पांगळा बंदिस्त माझा जन्म
आभाळून जावो
वादळी आवेग माझा
चार भिंतींना कळू दे.
रक्त येशूचे परी डोळयात माझ्या
साकळू दे.

त्याचे शब्द कधीच नपुसक नसतात. समर्थ शब्दांचा त्याला तुटवडा नाही. त्याच्या भावना वांझोट्या नाहीत. कठोर जगावर त्याचे शब्द नुसते थुंकत असतात. ‘ माझिया मस्तीत मी जाई पुढे, मात्र बाजारू कवाडे लागती. ’ हा आहे त्याचा खाक्या.

या साऱ्यांनाच साजेसे लावण्यही त्याच्याजवळ त्याच्या शब्दांच्या उरात भरपूर असते. उदाहरणार्थ,

स्वप्न माझ्या वेदनेच्या चांदण्याचे ये म्हणाले
अमृताच्या पावलांनी रूप भेटायास आले...
कोवळया लावण्यगंगेच्या मिठीमाजी बुडाले.
बावरें पातें जिवाचें कापऱ्या श्वासांत हाले.
लागली तृप्तीमध्ये ओल्या निखाऱ्यांना समाधि
आंधळया शब्दास स्पर्शाचे नवे डोळे मिळाले.

भटाने अशा भावकविता लिहिल्या. लावण्या, पवाडे, गझला, कवाल्या इत्यादी पासून तो पायात पिटुकले बूट घालून शाळेत जाणाऱ्या बाळापर्यंत सर्वांवर तो लिहीत आहे. कुशल स्वयंपाकी कोणतेही पक्वान्न सारख्याच हातोटीने घडवतो. त्याची साक्ष म्हणजे त्याचे अभंग. ‘ एकनाथ हिशेबात करी वारंवार चुका ’ ही ओळ अभिजातपणाची ग्वाही देते. त्याने न लिहिलेला काव्यप्रकार बहुधा नाहीच.

शब्द समजूनउमजून वापरणे आणि अत्यंत शीघ्र गतीने गणवृत्त रचणे यात तर या गावात त्याचा तोच जोड आहे. त्याच्या प्रतिमा नेहमी उंच, भव्य, उदात्त, अफाट व पवित्र असतात. सौंदर्यात, नाजुकतेने नटलेल्या असतात. प्रसंगी हेच सामर्थ्य पहाड बनते. एऱ्हवी, तेजात नाहणारे काळीज; रक्तामध्ये हाका मारणारे

आभाळ, भोवती गुणगुणणारे आयुष्य, कात टाकणारी पहाट, ‘ तुजकडेच वळणारे आत्म्याचे सूर्यफूल, कळी मध्ये न विरणारा मोकळा कापूर, भासाच्या अमृतात उठणारे तरंग, वसंताच्या जुन्या खुणा दाखविणाऱ्या मनाच्या पाकळ्या, वेणीतला शुक्रतारा, नसातून झळाळणाऱ्या सुगंधी विजा, वेदनेच्या वनातली प्रत्ययाची फुले, या पवित्रतम प्रतिमा सततपणें त्याच्या कवनांत फिरत असतात. मिलन विरह या कल्पना देखील एका पारलोकिक शक्तीभोवती घुमतात. ‘ पाहिले मी येवढे की पाहणे सौंदर्य झाले ! ’ हा त्याचा प्रत्यय.

नुकतीच त्याने काही मुक्तके रचली आहेत. एक वेगळाच सुरेश भट त्यात आहे. केव्हातरी दिशापल्याड पाहिलेल्या व्यक्तिशक्तीस दर्शनाविना रूप दाखविण्याची विनंती त्यात आहे. डोळयांना डोळेपण तुजमुळेच आले ग। अन् तुझिया जाणिवेत अंग अंग न्हाले ग...जपलेल्या आशयास आज काय झाले ग ? ही ही त्यातल्याच एका मुक्तकाची चव. ‘मी एवढा संपलो तरी संपणे सरत नाही ’ या दुःखाने व्यंग्र होऊन भट एका मुक्तकात म्हणतो, “ आंधळे अस्तित्व माझे मारताहे वांझ हांका । सूर्य थोडा का वळेना ? चंद्र मागे का फिरेना ? ” तसेच रोज रोज कळा सोसणारा हा भणंग जीव मध्येच बोलून जातो “ रोज आपोआप मी झंकारतो, ” त्याचा शोधही वेगळा आहे- बंद डोळयांनी चोहीकडे शोधायचे व भेट कुठे तर ‘ माझ्याच प्राणात लाजताना पाहिले.’ शब्दाविना हाक दिली तेव्हा पुन्हा लाजून ‘ हे अंगांग माझे व्यापले. ’

भटावर लिहिण्यासारखे पुष्कळ आहे. त्याच्या कविता सर्वांना ओढ लावतील. पण त्या भावनांशी, कासाविशीशी इमान राखणारे त्याचे जीवन हे वंदनीय आहे. अशा कवीला सरकारी बक्षीस मिळेपर्यंत साधी मासिक प्रसिद्धीही न देणाऱ्या, उत्तोमोत्तम कविता केराच्या टोपलीतून टाकून देणाऱ्या संपादकांचा पायंडा नवा नाही. पण खरोखरच जर सुरेश भट आपल्या सर्व रचनेसह वाचकांसमोर आला तर गटबाज कविजनांच्या नाकावर टिचणारी सृष्टी भटाच्याकडून खचित मिळेल. माझी त्याची वैयक्तिक मैत्री जाणिवेस धरूनही हा आग्रह बोलून दाखविण्यात मला नेपॉटिझम वाटत नाही.

नवयुग : ६ ऑगस्ट १९६१

# डोमाकाका

एक विचित्र माणूस म्हणून डोमा पाटलाकडे पाहण्याची आम्हाला लहानपणापासूनच सवय होती. म्हणजे तो,कमरेचे सोडून डोक्याला गुंडाळी अशातला काही प्रकार नव्हता. विचित्रच ठरवायचे तर गावात कितीतरी लोक त्या पदवीला पात्र होते. मोहरमच्या दिवसात मोडकी हॅट घालून साहेबी बोलीच्या थाटात वाटेल ते येसफ्येस बोलणारा चक्राजी देशमुख, अस्वल होऊन नाचणारा व बाखरभाई वाघ झाले असताना त्यांच्याही समोर जाण्याचे धाडस करणारा हमजू, दरसाल नवे घर बांधणारा रामभरोसा इत्यादी मंडळी निश्चितच विचित्र या सदरात बसण्यासारखी होती. डोमा आबाचा विचित्रपणा त्यांच्यापुढे काहीच ठरू नये. पण येरू लोक हे त्या त्या वख्तापुरते नवल दाखवीत. दुसऱ्या दिवशी पुन्हा चक्राजी ते चक्राजी आणि हमजू ते हमजू राहात. वीज झळकल्यासारखे करून पुन्हा गिडीगप्प होत. डोमा आबाचा उलटेपणा असा गांडुळजीवी नव्हता. चमकण्याइतका जोरदारही नव्हे अन् चिखलातल्या वळवळीइतका 'थोडावेळू' ही नव्हे. त्याच्या वागण्यात सोंगाड्याचे हातवारे नव्हते. तोंड चक्राजीसारखे जोकराचे नव्हते किंवा त्याचे चालणे हमजूसारखे अस्वली नव्हते. थोडक्यात म्हणजे डोमा आबा माणसासारखा माणूस. तीळभर सामान्य माणसाहून साजरा. उन्हाने कितीही जळला तरी रंग घाटोड्या गव्हाइतका तेजस. बोलणे चांदूरच्या गुळासारखे मिट्ठास. पोरासोरात बसवा-पोरासोरांसारखा, मंडळीत मंडळीसारखा. कोणाच्या लेकीबाळीला पाहायला कुठले पाहुणे आले तर बैठकीची शोभा वाढवायला डोमा

आबाला हाक मारीत. अशा ऐन प्रसंगी हमजू, चक्राजी किंवा राम भरोसा यांचा नंबर लागत नसे. असा हा गावारावांनी भलमाणसाई दिलेला माणूस. तरीही म्हणणारे त्याला विचित्र म्हणत. त्याच्याबद्दल लोक बोलत ते मात्र हेटाळणीने नव्हे. चांगल्या चवीने बोलत. कौतुक करीत. वडील मंडळी आपुलकीने म्हणत, "ह्या डोम्याचं ल्हानपणापासूनच असं. लोक गाडीरस्त्यानं गेले तर ही मूर्ती आडरस्त्यानं जाईल."

"म्हणजे कसं?" हा प्रश्न कोणीही म्हणजे खुद्द डोमा आबाच्या पोरानं-देखील विचारला असे. मग त्यावर एकामागून एक आठवणी निघत. त्यातून कळे की सारी सुगी असताना डोमाजींनी शिळेपाके यशी लावले असे आणि माय शाबूत असताना या स्वारीचा ओढा असे कुत्रीकडे. गावात दुभती कुत्री दिसली की डोमाने पकडावी. तिच्या स्तनाला तोंड लावावे आणि घुट्ट घुट्ट दूध प्यावे. बरे, इतके करून त्याची कधी जाहिरात नाही की चेहऱ्यावर कसली नवलाई नाही. प्लेगाचे साल पडले. एकाला जाळून यावे तर दुसरा तिरडीची वाट पाहात तयार. अशा वेळी तिरडीला चार जिवंत माणसे मिळणे कठीण झाले. डोमाची तब्येत आधी-पासूनच मस्त. 'दोन-दात्या' गोऱ्ह्याची ताकद आणि अंड्यावरच्या कोंबडी-सारखा गरगरीत पिंड. पठ्याने आपल्या पोरवयात दोन दोन मुडदे खांद्यावर नेऊन वर्धेवर जाळले. तिरडीबिरडीची मिजास ठेवली नाही. रात्र पाहिली नाही की दिवस पाहिला नाही. मेल्या माणसाच्या नावाने नदीवरच एक बुडी मारून पुन्हा गावाकडे परतायचे. रस्त्यावर दिसेल त्या मोहोल्ल्यातले प्रेत घेऊन पुन्हा नदीवर. तेथे हा महार, हा ब्राह्मण भेद नव्हता. म्हणूनच पुढे आमच्या जिल्ह्यात सेवाग्राम आश्रम आला आणि गांधीजींनी जातीभेदनिर्मूलन सुरू केले त्याचा पहिला आनंद डोमा आबालाच झाला. गांधीजींपूर्वीच आपणाला या सर्व गोष्टी पटल्या होत्या. त्यात त्यांचे नाविन्य ते काय हे डोमाजीला कळत नव्हते. पण या कारणाने त्याचे गांधीजींवरचे प्रेम मात्र मुळीच कमी झाले नाही.

रोजच्या वागण्यात इतरांना त्रास होण्यासारखे काही नसले तरी एक प्रकारचा गडद मनसोक्तपणा होता. दादाजी, बाजीराव बापू वगैरे मंडळी रोज बाराबाराशे दंडबैठका काढून त्या जोरपाण्याने घामाघूम होत. ते पाहून डोमा आबा त्यांची नजर चुकवून हासे. तब्येतदार होण्यासाठी अशा निरर्थक उठवशीची गरज काय तेच डोमा आबास कळत नसे. तो ज्याला त्याला सांगण्याची कोशीस करी, "अरे,

हे माहा शरीर काय मोठ्या दादाहून व बापूहून कमी आहे? मंग स्या काय मुद्‌गल फिरोले का रोज बाराशे उठबशा काढल्या? आँ!"

खरेच, कोणत्याही पैलवानापेक्षा तो देह ठोकून पिटून घडवला होता. तापल्या तांब्यासारखा तो उन्हात झळाळे. नदीवर वाहत्या धारेला मागे रेटत, धावपळ करीत पाण्याची कोंबडाकोंबडी खेळावी आणि सोकारीच्या निमित्ताने दहा गावे व पाच जंगले पायाने तुडवावीत! बस्स. यापार दुसरे काहीही त्या शरीराला लागत नव्हते. मग त्यात बिमारी नाही की फिमारी नाही. गावात डोमा आबाच्या या तब्येतीचे कुतुहल होते. कसरत करणाऱ्या मंडळीपेक्षा डोमामध्ये ताकद जास्त आहे अशी बहुतेकांची खात्री होती. एकादोघांनी हिंमत करून बाजीराव बापू किंवा दादाजी यांच्यापैकी कोणाशी तरी डोमा आबाची लढत ठरवण्याचा घाट घातला. चार लोकांची निराशा नको म्हणून दादाजी व बापू यांनीही होकार भरला. डोमा आबा आपल्याला चीत करीलच अशी त्यांना धास्ती नव्हती; आणि तो वरचढ होणारच नाही असा भरोसाही नव्हता. एकदाचा पडताळा घ्यावा असे ठरले.

पण डोमा आबा काही केल्या त्यासाठी तयार होईना. त्या कसरतवाल्यांपेक्षा आपणात ताकद निश्चितच अधिक आहे याबद्दल त्याला शंका नव्हती. त्याचा आग्रह कायम होता. पण येवढ्या मानवाईक मंडळींशी कुस्ती खेळून त्यांचा अपमान करण्यास मात्र तो राजी नव्हता. 'अरे आंगाची ताकद अलग अन् मानाचा रुबाब अलग.' कुस्ती काही झाली नाही. डोमा आबाचे शरीर हे नदीत पोहून, इंधन फोडून व कोसोशी चाल चालून घडले होते. त्याला कुस्तीचे डावपेच येत नसतील व त्यामुळे तो घाबरला असेल, असा समज गावकऱ्यांनी करून घेतला. काहींची मजल तर 'त्याच्या अंगात ताकदच नाही' असे म्हणण्यापर्यंत गेली. पण तशा लोकांकडे सिंहाने मच्छराकडे टाकावी तशी नजर टाकून आबा चूप बसला. बोलवा फारच झाली तेव्हा बापू व दादाजी यांना अध्यक्ष करून डोमा आबाने एक मूळजड बाभूळ खलखला हालवून दाखवली. एका बुक्कीने नारळ फोडून लोकांना चीत केले. एका उग्र भुर्रट बैलाला डिवचून त्याची शिंगे धरून मागे रेटले. आणि हे सर्व करून दादाजी व बापूंच्या पाया पडून तो तेथे चूप बसला. मग दोघांनीही जाहीर केले; "खबरदार, कोणी आबाच्या जोराबद्दल

उणंदुणं बोललं तर. तो आमच्याहून सरसा आहे." मग पुन्हा आबा त्यांच्या पाया पडला "नाही बापा, मी कुठं अन् तुम्ही देवमाणसं कुठं?"

आबाने गावात कोणाशी आंगझोंबी केली नाही. कोणताही झगडा तोंडापुरता ठेवला. वर्धेच्या पुरासारखा तो भरभरून गढूळ बोलू शके. पण केवढ्याही रागात त्याने कोणाला दोन बोटांची चापट म्हणून मारली नाही. आणि याचसोबत आबाच्या स्वभावात एक गोम होती. आपण पाटील मंडळीतले आहोत याची त्याला नेहमी जाणीव असे. म्हणूनच कोणाकडे सालामहिन्याने राहणे त्याला जमले नाही. छोट्या बरडाच्या खाली त्याचे एक वावर होते. गावात दोपाखी घर होते. येवढ्यात काही निभत नसे म्हणून चार कष्ट तो करी. पण ते कष्ट दर्जेदार असण्याबद्दल त्याचा आग्रह राही. त्यामुळे आंब्यांची उतारी, कापसाचे भाडेतोडे असे काहीसे करून तो जगे. कुठलेही काम त्याला सांगायचे तर नुसते पैसे देऊन भागत नसे, 'हे काम तुमच्याशिवाय होणार नाही' असे त्याचे महत्त्व त्याच्या मनावर बिंबवावे लागे. मग उण्यापुऱ्या देण्या-घेण्यातही पाटील ते करून टाकी. अशा एका धामधुमीच्या सालात त्याला कापसाच्या गाड्यांसोबत अमरावतीला जाण्यासाठी आम्ही राजी केले. त्या वर्षी कापसाच्या गाड्या मार्केटपर्यंत सुरळीत पोहोचणे मोठे मुश्किलीचे झाले होते. विशेष म्हणजे माहोलीच्या पलीकडे चोर रात्र साधून गाड्या लुटत. त्या खेपेस डोमा आबाला पंधरावीस चोरांनी बडव बडव बडवले. एकट्याने इतक्यांचा मुकाबला झाला नाही. आठ दिवस आबाच्या पाठीला हळदअफू लावावी लागली. आबाला मार खाल्ल्याचे दुःख नव्हते. आल्यागेल्यास तो पाठ उघडी करून मार दाखवी. पण आपल्यावर इतका भरोसा टाकून कापसासोबत पाठवले त्याचा काहीच उपयोग झाला नाही याची सल त्याला त्याला फारच झोंबली. लोकांच्या लेखी आपण खालावलो अशा समजाने मग आबा फारच खचला. रातंदिवस मग तो भजनात राहू लागला. अर्थात् भजनही झाले तरी ते आबाच्या प्रकृतीस जुळणारेच हवे होते. तुकडोजी महाराजांचे साधे पेटीतबल्याचे व सिनेमाच्या मुलायम चालीवरचे भजन त्याच्या तब्येतीत बसणे शक्य नव्हते. अत्यंत उग्रमधुर असे अवधुंती धांगधडांग वाजणारे भजन त्याने सुरू केले. त्याचे ते भजन. त्यातला आबानीच वाजवलेला पखवाज सुरू झाला की गावाची झोप पार उडून जाई.

कापुसगाडीवर मार खाल्ल्यापासून आबाला स्वतःचाच वीट येत चालला होता. तो

गावात राहायचे टाळी. मग कुठे विहीर फोडणे तर कुठे आणखी काही असे शोधीत तो परगावी फिरे. येवढ्यात त्याला एका दर्जेदार कामाचा पत्ता लागला. त्या वेळी आणि बव्हंशी आजही नागपूरला बहुतेक इमारती कौलाच्या आहेत. उन्हाळ्यात कौले शाकारायला तेथे तज्ज्ञ माणसे लागतात. आबा मग तेथे जाऊ लागला. तेथे आपल्या अवधुती भजनाचे मासले त्याने लोकांना दिले. नागपूरकर मंडळी फार खूष झाली. विशेष म्हणजे आबाची कवित्वशक्ती तेथे उगवली. अवतीभवतीच्या दिखाऊ माणसातला मूर्खपणा व खोटेपणा त्याच्या प्रतिभेतून परिस्फुट होऊ लागला. आपली खेडवळ प्रतिमासृष्टी उभवून तो गोड रचना करू लागले.

“ आरे दहा रुपयांची घडी हाताले
वाजले किती ? नाही समज त्याले ”

ही किंवा—

बैल बुद्धीले अक्कल थोडी
म्हैस विकून घेतली घोडी ॥

अशी मार्मिक रचना त्याने केली. गावच्या दंढारवाल्यांनी ती उचलून धरली. आबा आपल्या व दुसऱ्याच्या गाण्यात भेदभाव करीत नसे. या ओळीदेखील त्याच्या की दुसऱ्याच्या याबद्दल आम्हाला नक्की सांगता येणार नाही. शिवाय चार ओळी आपल्या तर चार दुसऱ्याच्या असाही प्रकार आबाच्या बाबतीत चाले. त्याबद्दल त्याची भूमिका ही की, “ आरे आपल्याले काय त्या छापाले द्या लागतेत ? आपल्या असो कीं दुसऱ्याच्या असो. मन गमवाशी गरज. आता अमरावतीत सराफ्याच्या दुकानावर साजरे भांडे मांडले राह्यलेत. तो चांदीसोन्याचे बासनं काय सर्वे एकटाच सराफ करते काय ? कुणीकडूनही दुकान साजवाची गरज ! काय ? ”

हे सर्व असे होत राहिले. आणि त्याच वेळी आम्हा सर्वांच्या कळत नकळत गाव बदलत राहिला. बघता बघता तो दोदली झाली. इलेक्शने आली. नेहमीच्या कलागतींना पार्ट्यांचे रूप आले. डोमा आबाची येजा पूर्वीसारखीच सर्वांच्या घरी होत राहिली. पण दोपाखी गावात सर्वत्र सारखे स्वागत होईना. पूर्वी-सारखा रंग कोठे दिसेना. आपल्या म्हातारपणी हे काय विपरीत पाहणे आले म्हणून आबा पुरता भांबावला. गावकऱ्यांकडून कामाचा मोबदला त्याने

मजुरांसारखा पैशाअधल्यात घेतला नव्हता. मानवाईकपणा कायम राहण्याच्या दृष्टीने त्याने अपरूक कामाबद्दलही पाहुणचाराची अपेक्षा बाळगली नव्हती. इकडे कुटुंब वाढत चालले व जीवनभर पैसा तर गाठवला नाही. आता थकल्या काळात गावात ही दोंदली ! आबा हे पाटील म्हणून पाटील पार्टीचे गणले जाऊन बाकीचे त्यांच्यापासून फटकून वागू लागले. घरच्या घरी होईल तितकी उठबस करीत जीवन वाहात राहिले.

अशातच एक महान घडले—लहान आर्वीला मोठा सप्ताह झाला त्या वर्षीची ही गोष्ट आहे. महिना उलंगवाडीचा होता. थंडी जाऊ जाऊ म्हणत होती. ढोरेवासरे खळयात गेली होती. मामुली लांडगे, तरस सोडले तर वासरावगारांना काही म्हटल्या काही वांधा नव्हता. एखादा लंगडाफेंगडा माणूस शोभा म्हणून बसवला तरी एकटा शंभर दाव्यांची राखण करू शके. रान सारे उलंगलेलेच म्हणून मोठ्या हाकेच्यापारही माणूस मिळायचा नाही. वातावरण वखवखू लागले. तसा मग दुपारपारी मुशाफरही रस्त्याने दिसेनासा झाला. डोमा आबाचा वात उन्हाळयात उगवे. हे असे आरंभीचे गरम दिवस तर त्याला अगदीच द्वाड. तशात झाले काय की सात कोसावरचा लहान्या महादेवाचा डोंगर भडकला. कोळसेवाल्यांनी तिथे भट्ट्या चेतवल्या. रात्री त्या डोंगराचे रूपडे मोठे राजबिंडे दिसे. आंगणात उभे राहून पाहिले की पहाडाने जरीची टोपी घातल्यासारख्या त्या भट्ट्यांच्या टिकल्या चमचम झळकत. पण हे पहाण्यातले कौतुक वेगळे व या भडकण्याचे प्रत्यक्ष परिणाम निराळे. झाले असे की सालबर्डीच्या पहाडातली अख्खी वाघरे त्या गरमाटीला लहाखून वाट फुटेलशी पळत सुटली. वाघ इथे दिसला, जानवर तिथे पाहिले अशा ग्वाह्या कानी येऊन रात्री बाहेर पडणे मुष्कील झाले. हाकेवरच्या गावी रात्री जाण्यास भल्याभल्याची छाती होईना. अशात कोणीतरी डोमा आबाला हेटाळी.

" आता आबाले वात आहे म्हणून गोष्ट अलग आहे. पन त्या वाघाची खोड डोमा आबानंच मोडली असती. "

" हो ना तं काय गा ! वाघाची काय लावली ? आबानं आपल्या जवानपणात उभा बैल खाली बसवला होता ना. "

आणि हशा वाढवीत विरुद्ध पक्षाची मंडळी तेथून निघून जात. आबा आपल्या हतबलतेकडे पाहून मनातच हळहळे. एकदा देवाने करू नये असे केले. महाराचा

एक जवान पोरगा पाटलाच्या मोठ्या गुढाआड ' दिशेला ' बसला. वेळ काही फारशी नव्हती झाली. फार तर एका प्रहराने मारोतीच्या देवळात सांजदिवा लागला असता. अन् त्यानंतर काही क्षणांनी नागझिरीच्या डोंगरावरचा उजेडाचा ठिपका उडून गेला असता. ही काही अलतेभलते घडण्याची वेळ नव्हे. काही ध्यानीमनी नसताना त्या महाराच्या पोराला मानेजवळ गरमधाण श्वास जाणवला. पोराने वळून पाहिले आणि जोरदार किंकाळी फोडून तो धाडकन खाली पडला. आसपासच्या लोकांनी ती किंकाळी ऐकली. पण ते तेथे पोचेपर्यंत पोराच्या दंडाचे, छातीचे लचके तोडून वाघरू गरम रक्त चाटीत होते. ते दृश्य पाहायलाही अत्यंत कठीण होते. पहाणारांच्या किंकाळया गावात ऐकू यायला लागल्या. पण ते किंकाळया फोडणारेच गावात शिरल्यामुळे इतर कोणाची त्या बाजूने जाण्याची हिम्मत होईना. डोमा आबानेही गलबला ऐकला. पण काय कसे ते त्याला कोणीच सांगेना. हा बुढा माणूस खामोखाम आपला वख्त खराब करतो व नसल्या चौकशांची याला काय गरज असेच प्रत्येकाला वाटले. पण त्याही स्थितीत गलबल्याच्या दिशेचा अंदाज घेऊन एकेक पाऊल टाकीत आबा निघाला. ' भूक नसो पण शिदोरी असो ' या न्यायाने त्याने भाल्याचे थेरले धारदार पान बसवलेला सोकारीचा ' नेजा ' हातात धरला होता. आप्पाजींच्या शेवटच्या कोठ्याजवळ आबा पोहोचला. मंडळी केवळ कुतूहल म्हणून त्याच्या आगेमागे होती. काहीबाही बोलत होती. एकादोघांनी आबाच्या कानात सांगून पाहिले, " आबा, कायले घोर करून घेता जिवाले. आता या वयात काय जमनार आहे ? आन थो पोरगाही आपल्या पार्टीचा नाही. "

आबा त्यावर काही उत्तर देणार तोच त्या पोराची किंकाळी आणि वाघाची डरकाळी ऐकू आली. येव्हाना तो पोरगा आपल्या मुर्च्छेतून जागा होऊन जिवावर उदार होऊन वाघाशी झुंजू लागला होता. आबा एकदम पुढे सरसावला. त्याचा वात कोठे पळाला. म्हातारपणाची कात झडून गेली. पुढचे मग लोकांनी पाहून पाहिले नाही. ऐकून ऐकले नाही. भांबावलेल्या डोळयांना अर्धाएक तासानंतर फक्त एकच दिसले की डोमा आबाने त्या जखमी पोराची लेथ आपल्या खांद्यावर आणली होती. त्याला गांवकऱ्यांच्या हवाली करीत आबाने सांगितले—

" वाघाचं धूड तिथं पडलं आहे ते घेऊन या. येवढं ओझ आणण्याची या

सरत्या आंगात ताकद नाही. आता ते तुम्ही आणा. माझा भाला तेवढा त्याच्या पोटातून घरी आणून द्या."

पुन्हा सारे म्हातारपण, सारा वात अंगावर लेवून आबा धापा टाकीत घरी गेला. एखाद्या तरण्या नटाने म्हाताऱ्याचे वेषांतर करावे तसा आबा लोकांना वाटला. लोकांनी त्या पोराला उपचार केले. वाघाची शेपटासह लांबी मोजली. चामडे काढले. चरबी पळवली. सर्व केले आणि दोन दिवसात सर्व स्तब्ध झाले. मग आबा चेकाळला. अरे हे लोक आहेत की कोण? मी एवढा वाघ मारला पण कोणाच्या तोंडी शाबासाचा शब्द नाही?

"अहो, आम्ही करतोच आहो तुमची तारीफ. पण आम्ही कितीही झालो तरी तुमचे लोक. आपणच आपल्या माणसाला वानवले तर लोक हसतील ना?"

"मग बाकी लोक कुठे गेले?"

"ते कशाला करतील तारीफ? तुम्ही पाटील पार्टीचे ना? त्या पोराची स्तुती चालवली आहे त्यांनी."

"ती का बा?"

"अं ऽ ऽ. तारीफीसाठी कारणे कशाला हवी. तो त्यांच्या पक्षाचा आहेना. म्हणून तो वाघाशी कुस्ती खेळला अशी त्याची वानवा चालली आहे."

"चालू दे. चालू दे. त्याचीही तारीफ चालू दे. थे पोरगंही मर्दापोटचं आहे. थे वाघाशी कुस्ती खेळलं."

डोमा आबा इतके म्हणून चूप बसला. पण त्याचे मानी मन त्याला गप्प राहू देईना. सारा जन्म जपलेला स्वाभिमान आता असा वायाकारणी चळणार नव्हताच. सत्याग्रहाच्या साली लोक साधे पळता पळता पकडले गेले तर वीर ठरले. त्यांचे सत्कार झाले. ते पुढारी झाले. आणि मी येवढा जमिनीवरून वाघ मारला, नुसत्या भाल्याने टोचला. या वयात हे कवतुक केले. मग माझ्यासाठी का नाही कोणी सभा भरवीत?

दोन दिवस असे विचाराविचारात गेलें. तिसऱ्या दिवशी चांभार कातडे घेऊन आला. घाण सुटू नये म्हणून त्याने चामड्याला मीठ लावून आणले होते. पाटील आप कौतुकाने त्या लांब चामड्याकडे पाहून त्यातला परवा दिवशीचा वाघ उभा करू लागले. ती तंद्री चांभाराने मोडली, "पाटील, मीठ लावल्याचे चार रूपये द्या."

बाप रे ! आता हे चार रुपये कोठून द्यायचे. चामडे विकले तर त्यातून देता येतील. शिवाय वरही पाचपन्नास उरतील. पण छे ! पाटील मंडळीत पह्यल्यांदा मी वाघ मारला. तो येवढा मोठा उदेभान पाटील. त्याच्या पणजोबाने डाका अडवला होता म्हणतात. पण त्यानेही वाघ नव्हता मारला कधी आणि अशा इतिहासाचे हे चामडे विकायचे ?

मग डोमा आबा चार घरे फिरला. दहा जगांना दाटदूट करून त्याने चार रुपये गोळा केले. आबाच्या आधीच त्या जखमी पोरासाठी एका पक्षाने वर्गणी गोळा केली होती. तरीही भिडीभाडीने लोकांनी आबाला चार रुपये दिले. सभा वगैरे होण्याची वाट पाहात आबा थकून गेला. तेवढ्यात वार्ता आली की लहान आर्वीस महाराज समाप्तीसाठी येणार आहेत. आता महाराज येणार म्हणजे त्यांच्या भजनासाठी आसपासच्या दहा गावाचे लोक येणार हे ओघानेच ठरले. भजनाच्या आरंभी महाराज भाषण देत. म्हणजे ती एक प्रकारची सभाच झाली. डोमा आबाने ही संधी साधण्याचे ठरवले. काखोटीला चामड्याचे बोचके घेऊन तो आर्वीकडे निघाला. भजन होणार होते चांगले जेवणारात्री. आबा तर उलीशा दिवसालाच तेथे पोचला. गावोगावीच्या लोकांची वर्दळ तेथें चालू होती. गॅसबत्त्यांचा चमचमाट होता. डोमा आबा हुरळून गेला. ह्या इतक्या मंडळी समोर आणि ह्या अशा झगझग उजेडात महाराज लोकांना सांगतील, " पाहा आपल्या भारत देशात कसे वीर आहेत ! हा डोमा आबा असा खंगलेला— पण त्यानं वाघ मारला—"

पण महाराज कदाचित् हे हिंदीतही बोलतील. ते दोन्ही भाषांमधून सारखेच बोलतात. मग ते आपल्याबद्दल हिंदीत कसे बोलतील त्याचा अंदाज आबा बसल्या बसल्या घेऊ लागला. महाराज गावात आले होते. महाराज उतरले त्या घराच्या आसपास आबा रेंगाळत राहिला. एकादोघा अनोळख्यांनी त्याच्याकडे पाहून स्मित केले. हे अपरिचित लोक आपणाला ओळखत असावे अशी आबाची खात्री झाली. आपण वाघ मारला आहे ना ? आणखीही लोका आपणाकडे वाघाच्याच संदर्भात पाहात आहेत. असे त्याला वाटून गेले. गावाच्या एकादोघांनी तर चक्क वाघाचा विषय काढूनच आबाशी बोलण्यास सुरुवात केली. त्यामुळे हा वेळपावेतो आपल्या पराक्रमाची कथा महाराजांपर्यंत पोंचली असेलच असे मानून आबा निःशंक झाला. महाराजांनी सत्कार केला तर आपणालाही

काही उत्तरादाखल बोलावे लागेल. काय बरे बोलावे ? मागे गुलाबराव दादांचा सत्कार झाला होता. ते म्हणाले होते, " बंधूंनो व भगिनींनो... " छे, छे. ते तसे नाही जुळणार आपणाला. गावात आपले सर्व नातू, पोरे शोभतात. त्यांना बरोबरीच्या नात्याने ' बंधुभगिनींनो ' कसे म्हणायचे ? आणि भाषणही गुलाबराव दादांपेक्षा फक्कड झाले पाहिजे. डोमा आबा कितीहि झाले तरी कवी होता. भजने, लावण्या करणारा होता. महाराज अर्थात् मोठे कवी. पण त्यांच्यासमोर थोडे तरी रंगीत भाषण आपण करायला हवे. काय बरे बोलावे आपण ? या सत्काराची गरज नाही, या म्हातारवयात गावाची सेवा घडली याचीच खुषी आहे. छे, छे. असे काहीतरीच नको. हे तर पुढाऱ्यांसारखे खोटे झाले. गावकऱ्यांनी पार्टीपार्टीच्या झगड्यात आपल्या पराक्रमाचे खोबरे केले याबद्दल चिडायचे का ? पण नको. महाराज देवमाणूस. त्यांच्यासमोर नको अशा चितरकथा. जाऊ द्या. वेळेवर सुचेल ते बोलू.

होता होता भजनाची वेळ झाली. महाराजांच्या अवतीभवतीच्या सेवका-महासेवकांनी आबाला महाराजांपर्यंत पोहोचूच दिले नाही. मग एकदम महाराज प्रगटले ते जनसंमर्दाने भरलेल्या आखरात. त्यांचे राष्ट्र, विश्व वगैरेवर एक भाषण झाल्यानंतर सुरेल भजन सुरू झाले. आबाच्या सत्काराची संधी अर्थातच हुकली. पण त्या वेळपर्यंत आबा एक हात चामड्याच्या बोचक्यावर पक्का ठेवून भजनात रंगून गेला. भजन आटोपले तसा तो भानावर आला. महाराज मुक्कामाला परत जाण्यापूर्वी भक्त मंडळींची पाया पडापडी सुरू झाली. आधीच्या माणसाला अक्षरशः बाजूला रेटून दुसरा त्यांचे दर्शन घ्यायला सरसावे. अशा गर्दीत महाराजांशी बोलणे वगैरे कोणाच्याच वाट्याला येणे दुरापास्त होते. फार तर, ' हं कसं काय ? ठीक है ना ! ' असे महाराज अधून मधून बोलत. तशाही स्थितीत आबाने मुसंडी मारली. नमस्कार केल्यावर इतरांच्या रेटारेटीस न जुमानता तो महाराजांसमोर उभा राहिला आणि म्हणाला, " महाराज मला क्षमा करा. मी पापी आहे. "

महाराज कोणाला तरी कुशल विचारीत होते. त्यांचे लक्ष नव्हते तरी दुसऱ्याच कोणाचे कुतुहल जागे होऊन त्याने आबास विचारले, " काय आबा, कसले पाप केले ? " हा वेळपर्यंत महाराजांचेही लक्ष आबाकडे वळले होते. ते पाहून आबा पुन्हा चटकन बोलून गेला, " महाराज मी जीवहत्या केली आहे. "

साधा वाघ मारल्याबद्दल आपण कसे शोभिवंत बोलून गेलो त्यावर आबाही एकदम खुष झाला. सरस्वती आपल्या जिभेला प्रसन्न आहे याबद्दल त्याची खात्री पटली. ' जीवहत्या ' या शब्दामुळे प्रत्यक्ष महाराजही दचकून त्याच्याकडे पाहायला हरकत नव्हती. पण इतक्यात पायापडूंची गर्दी वाढून आबा कुठल्याकुठे रेटला गेला. महाराजांपुढे बोलणे तर राहोच पण कावोटीचे चामडे सांभाळणेही त्याला कठीण झाले. शेवटी मोठ्याच बेदिलाने तो गावात परत आला.

काही दिवसांनी त्याला पत्ता लागला की शहरातले साहेब लोक वाघाचे चामडे विकत घेतात. शिकाऱ्याजवळून कातडे घेऊन मग मारे स्वतःचा फोटो त्या चामड्यासह काढणारे लोक आबालाही ऐकून ठावे होते. तो तशा शोधात मोशीला आला. चारदोन ठिकाणी फिरला. साहेबांची जातच मुळी हुशार लोकांची. ते त्याला तीसेक रुपयांपर्यंत ते चामडे मागू लागले. मग आबा माझ्याकडे आला. दोन सांजा आमच्या बोर्डिंगातच जेवला. मला कोणी आडनावाने हाक मारली की तो त्या वेळी त्याला अडवी, " त्याला वाघमारे म्हणा. "

" वाघमारे ? पण त्याचं तर आडनाव... "

" असेल, असेल. पण ते परवापर्यंतचं. आता त्याच्या आजोबानं वाघ मारला आहे. जिवंत वाघ मारला, तुमच्या साहेब लोकांसारखा मेला वाघ नव्हे. "

आबाने आणखी दोनतीन सांजा विचार केला. किंमत तीस रुपयांच्या वर लागेना. व आयुष्याचा पराक्रम तीस रुपयात विकणेही त्याला परवडेना. शेवटी मला म्हणाला, " असं कर, तूच ठेवून घे हे कातडं. "

" पण डोमा आबा, माझ्याजवळ कुठले इतके पैसे ? " मला त्या वेळी घरून नऊ रुपये महिना येई. शाळेची फी, बोर्डिंगचे धान्य एकदम देण्याची प्रथा होती. वरखर्चाला ही एवढी रक्कम मिळे. त्यातून आबाला तीस रुपये द्यायचे कसे ?

" अरे तीस कोण मागते ? तू असं कर पंचवीस दे. पाच रुपये कमी घेतल्यानं माझा जीव नाही जाणार. काहीही झाले तरी चामडं आपल्या घराण्यांत राहायले पाहिजे. "

दोन रुपये महिन्याप्रमाणे संपूर्ण एका वर्षांत मी आबाला पैसे दिले. पुढे त्या चामड्याची घाण येऊ लागली म्हणून गावाला पाठवून दिले. कोण्यातरी सरकारी माणसाला ते आवडले व मोठ्या दादाने त्याला ते अर्पण केले. आबाचा त्यामुळे तीळपापड झाला. पण तो वैतागाने म्हणाला,

“ नेऊ त्या साहेबाला. पाटील मंडळीतल्या माणसानं वाघ मारला होता ही गाष्टच मला खोटी वाटते.”

तरीही आपण पाटील मंडळीतले असण्यावरचे त्याचे प्रेम उसळ्या घेतच राहिले. अमरावतीस पाणी कमी होते. त्या वर्षी एक बैलगाडी व पाण्याची टाकी घेऊन आबा तेथे धंदा करायला आला. कॅफे फेमसमध्ये त्याची माझी गाठ पडली. माझ्यासोबत दोनचार सुटाबुटातले लोक होते. म्हणून आबाने मला आरंभी ओळख देण्याचे टाळले. पण मीच आपणहून त्याच्याशी बोलल्यावर त्याला फारच खुलावट आली. वाघाची गोष्ट सोबत्यांना सांगितल्यामुळे त्यांनीही कौतुकाने आबाला नमस्कार केला. त्याचा एकमेव परिणाम हा झाला की त्या दिवशी पाणी विकून कमावलेले अख्खे साडेतीन रुपये आबाने कडोसरीतून काढले आणि आम्हा सर्वांसाठी आइस्क्रीमची ऑर्डर दिली.

खूप वर्षांनंतर गावाला आलो. तेव्हा आबा फारच थकल्याचे कळले. खाण्यापिण्याचे हाल चालले होते. ग्रामपंचायतीचे राज्य सुरू झाल्यामुळे व स्वतःच्या दारिद्र्यामुळे आबामधला पाटीलपणा गळला होता. मी ऐकले की आबा आमच्या दोनचार घरी झोळी फिरवतो. पाटील मंडळीच्या बाहेर मात्र त्याने अजूनही भीक मागितली नव्हती. एक दिवस मी बैठकीत होतो. तेव्हा शेजारच्या विहिरीजवळ गलका झाला. दहापाच लोक कोणालातरी हाकलून देण्याच्या फिकरीत होते. त्यात माझ्या नावाचा संबंध ऐकून मी लक्ष घातले. पाहतो तर डोमा आबाच गर्दीच्या हटव्याला न जुमानता खुरडत खुरडत माझ्याकडे येत होता. पायाला चिंध्या बांधल्या होत्या. माझ्यासमोर हा प्रकार नको म्हणून शेवटी दादानेही त्याला घरी जायला सांगितले. पण डोमा आबा येवढेच म्हणाला, “ मी त्याला काही मागणार नाही. तुम्ही लोक जीवंत असेपर्यंत मले दाय तुकड्याले नुपुर नाही.”

आबाला माझ्यापासून मदत म्हणून पैसे नको होते. सरकारी दवाखान्यात दोनदा इलाज करूनही पायाचे भेद बरे झाले नव्हते. म्हणून त्याला माझ्याकडून दवाखान्यात पोचविण्याचीही मदत नको होती. घराण्याची आपुलकी म्हणून आमच्या चारदोन मंडळींनी त्याला दोन भाकरी देण्याचीही व्यवस्था केली होती. डोमा आबाला माझ्याकडून त्यातले काहीच नको होते. आपल्या पायाचे भेद व जखमा मी पाहाव्या. नुसत्या पहाव्या. सर्वांनी पैपैसा दिला होता. भाकरी दिल्या होत्या. शब्दातून सहानुभूती दिली होती. आता हे इतकेच करणे उरले होते.

कोणीतरी त्याची जखम नुसती पाहायची होती. पाहणे-बस्स. बाकी डोमा आबाला काहीच नको होते.

प्रत्यक्ष दादालाही न जुमानता आबाने एकेक पट्टी सोडली. साऱ्या चिंध्या मोकळ्या केल्या. माझ्याकडे त्या जखमा निर्विकारतेने करून तो म्हणाला, " तू आल्याचं कळलं म्हणून साऱ्या चिंध्या मुद्दाम नदीवर जाऊन धुतल्या. म्हटलं तू ह्या जखमा पाहशील तेव्हा तुला खराब वास यायला नको. "

डोमा आबाची व माझी—माझी आणि त्या स्वच्छ चिंध्यांतल्या जखमांची ती भेट शेवटची होती.

नवयुग : दिवाळी १९६४

# डॉ. पंजाबराव — एक जमाखर्च

राज कॉलेजच्या समोरच्या अंगणात उभे राहून पाहिले की केवढी तरी विशालता अवतीभोवती नजरेला पडते. अगदी नाकाशी गरीब विद्यार्थ्यांचे एक वसतिगृह, त्याच्या थोड्या बाजूला शिवाजी प्रेसची इमारत; तेथून नजर थोडी तिरपी चढून गेली की शिवाजी संस्थेचे मध्यवर्ती कार्यालय. याच संस्थेने चालविलेल्या अनेक शाळा-कॉलेजेस आणि इतर शिक्षणसंस्था ह्या वऱ्हाडभर सर्वत्र पसरलेल्या असल्या तरी त्यातल्या काही, आपण उभे असतो त्या अंगणातूनच दिसायला लागतात. या अंगाला शिवाजीची पाच कॉलेजेस, दुसऱ्या अंगाला एक शारीरिक शिक्षणाचे कॉलेज आणि वसतिगृहाला लागून एक भला मोठा स्टेडियम, तसेच राज कॉलेजच्या नव्या इमारती समोर वटवृक्षासारखी गंभीरमुद्रा धारण केलेली रूरलची इमारत. इकडेतिकडे, मागे पुढे, कुठेही नजर टाका, आपली दृष्टी शिवाजी संस्थेच्या पार जाऊच शकत नाही. संपूर्ण, अर्धी, निदान पाव तरी मालकी या सर्व शिक्षण संस्थांवर शिवाजी एज्युकेशन सोसायटीची आहे. हे शिक्षणाचे विराट आणि एकसंध जग मी रोज पाहत असतो. सगळे व्यवहार तेथे नित्य चालत असतात. स्टेडियमवर पोरे खेळतात, एन्. सी. सी. परेडचा खाकी समुद्र तऱ्हेतऱ्हेच्या ऑर्डर्स बरहुकूम तेथे हेलावत असतो. कॉलेजमध्ये ऑफ पिरेडसची मुले उपहार-गृहातून किंवा कुंपणालगतच्या गुलमोहरीखालून पहुडलेली असतात. संस्थेला लागणारी पत्रके, परिपत्रके आणि रजिस्टर्स इत्यादी छापता छापता प्रेसच्या नाकी नऊ येतात. आपली तीस वर्षांपूर्वीची जुनी सायकल समोरच्या चढावावरून लोटीत

लोटीत ठाकरे गुरुजी मध्यवर्ती ऑफिसात जातात. मधूनच मामासाहेब लोंढ्यांची जीप रूरल मधून मध्यवर्तीत आणि मध्यवर्तीतून रूरलमध्ये दचकल्या सारखी फेऱ्या घालते. पण हेही नेहमीच्याच कार्यक्रमामध्ये बसणारे. महिनोंशी हे असे चालत राहते. आणि एखाद्या दिवशी––

मध्यवर्ती संस्थेच्या अंगणातला एक उंच खांब आहे. त्याच्यावर एक भगवा झेंडा उगवतो. निष्पर्ण वृक्षाला एक भले मोठे-फूल यावे आणि वसंतापेक्षाही वेगळा ऋतू सुरु झाल्याची साक्ष पटावी तसे काही तरी मग सभोतालच्या वातावरणाला जाणवते. प्रेस जास्तच उत्साहाने धडपडू लागतो. वसतिगृहाच्या भिंती स्नान केल्यासारख्या हरिखतात, आणि स्टेडियमवर रंगीबेरंगी कपड्यांचा हंगाम सुरू झाल्यासारखे वाटते. भेसूर रस्त्यांना एकदम कमानी चढतात. त्यांचे खांब आंब्याच्या डहाळ्यांनी मढवले जातात. कुठे कुठे इंद्रधनुष्याच्या पट्ट्यासारख्या रंगीत तोरणांच्या धारा आपल्याशीच खूष होऊन डोलू लागतात. तऱ्हेतऱ्हेच्या छोट्यामोठ्या गाड्यांतून नानासाहेब, तात्यासाहेब अशा संबोधनांनी ओळखली जाणारी थोर थोर मंडळी त्याच झेंड्याच्या जागेकडे चौकशी करतात, "भाऊसाहेब कधी आलेत? किती दिवस राहणार आहेत?" आणि कुठल्याशा उत्तरावर मग स्वतःशीच चिडल्यासारखे बोलून जातात, "असं कसं होईल. निदान त्यांनी आमच्या गावची तारीख द्यायलाच पाहिजे. आमच्या शाळेनं येवढा बोर्डात पहिला नंबर आणला."

असे हे भाऊसाहेब! अधूनमधून केव्हातरी येतात. मध्यवर्तीच्या खांबावर झेंडा उगवला म्हणजे मग सर्वांना ते कळते. आणि ह्या शैक्षणिक जगात एकदम धावपळ सुरू होते. या जगातला कणन्‌कण भाऊसाहेबांची वाट पहात असतो. विदर्भभर पसरलेल्या शिवाजी संस्थेच्या अनेक शाळा आणि कॉलेजेस् यांची प्रमुख कार्यकारी मंडळी वर्षभर काहीतरी चांगले करण्याची धडपड करीत असते. आपल्या हातून नाव घेण्यासारखे काहीतरी घडले म्हणजे मग ते लोक आसुसून भाऊसाहेबांची वाट पहात असतात. त्यातच कोणाला तरी कुठली तरी एखादी कल्पना सुचते. दवाखाना काढायचा, बालसंगोपन गृह काढायचे, बालगुन्हेगारांसाठी एखादी संस्था चालवायची आणि काय वाटेल ते. या सर्व कल्पनांचे जनक आपल्या खंबीर हातांना तयार ठेवून भाऊसाहेबांच्या भेटीची प्रतीक्षा करतात. एकदाचे भाऊसाहेब आले की मग ते तेथे असतील तितके दिवस त्यांच्या अवती भोवती अशा लोकांची गर्दी असते. भाऊसाहेबांना आपली कल्पना सांगून त्यांचा

आशीर्वाद मिळाला की, त्या क्षणी संस्था निर्माण होते. अशाच दोन दोन तीन तीन मिनिटांच्या भेटीतून आजवर कितीतरी संस्था जन्माला आल्या. परवा ठाकरे गुरुजींकडे भाऊसाहेब जेवायला आले. येथे तरी जेवणापलीकडे दुसरे काही होणार नाही अशी माझी कल्पना होती. पण सहज गप्पा करण्याच्या बहाण्याने एकत्र जमलेल्या त्या मंडळींनी तेथेही एकदोन संस्था जन्माला घालण्याबद्दल भाऊसाहेबांशी चर्चा केल्याच. दहावाजीच्या डाहाळ्या देखील इतक्या तडकाफडकी जमिनीत मुळ्या धरत नसतील. याबद्दल माझी आपली कल्पना अशी की, या सर्व संस्था त्यांच्या जन्म होण्याच्या वेगाने आणि सहजपणाने मोडूनही जात असतील. वनमहोत्सवात जशी त्याच त्या ठिकाणी दरवर्षी नवीन झाडे लावावी लागतात, दारूबंदीची प्रतिज्ञा जशी तेच ते लोक दरवर्षी नव्याने करतात, तसेच ह्या संस्थेचे असेल. मी मामासाहेब लोंढ्यांना त्याबद्दल भीतभीत विचारूनही पाहिले. त्यावर त्यांनी आत्मविश्वासाने उत्तर दिले, " आजवर निर्माण झालेली आमची कुठलीही संस्था अजूनपर्यंत मोडली नाही. तुम्ही कसोशीनं तपास करा आणि त्याचा पडताळा घ्या. " संपूर्ण एक महिन्यानंतर मला तपास लागला की एक बालमंदिर मोडले होते आणि डोंगरात सुरू केलेली एक शाळा खलास झाली होती. पण तोट्यात का होईना ती चालवायाचीच असा निर्धार करून शिवाजी संस्थेने ती पुन्हा सावरून धरली होती. त्यामुळे मला चूप राहणे भाग पडले. कित्येकदा सरकारलाही जड वाटू शकणाऱ्या ॲग्रिकल्चर कॉलेजसारख्या संस्था भाऊसाहेबांनी चालवून दाखविल्या.

अनेकदा मी विचार करतो की, भाऊसाहेबांचे नेमके यश कशात आहे? माझ्यासमोर त्यांच्या संस्थांच्या ताब्यात असलेली अक्षरशः मैलोगणती जमीन उभी राहते. कमीत कमी पाच रुपये फुटांची ही जमीन, तिच्यावर उभ्या असलेल्या अवाढव्य इमारती, तऱ्हेतऱ्हेच्या पिकांनी गच्च भरलेली शेती, फळाफुलांनी बहरलेले बगीचे, लाखो रुपये किंमतीची अवजारे आणि यंत्रे, दृष्ट लागाव्या अशा गाईबैलांचे कळप हे सारे माझ्यासमोर उभे राहते. दुसऱ्याच क्षणी भाऊसाहेबांच्या भाषणासाठी उत्सुक असलेला लाखोंचा समुदाय, भाऊसाहेब निवडून आले म्हणून एकमेकांना आनंदाने पेढे वाटणारे गोरगरीब हे माझ्यासमोर तरळतात. यातून मला माझ्या प्रश्नांचे थोडेफार उत्तर गवसते. पण थोडेफारच. भाऊसाहेबांचा मोठेपणा तेथे पूर्ण झाला याची खात्री पटत नाही. अजूनही काही वैभव शिल्लक

राहिले असे वाटते. मग रूढीच्या रोगट जाचातून सोडवलेला बहुजनसमाज, दारिद्र्य आणि कर्ज यांना भाऊसाहेबांच्या आधाराने हटवून सुखी झालेला विराट जनसंमर्द, तसाच स्वतःच्या पायावर नीटनेटक्या पोशाखात ऐटीने उभा राहिलेला एकेकाळी असहाय असलेला तरुण वर्ग यांच्याकडूनही मला काहीसे उत्तर मिळते. शिक्षणखाते, जंगल, शेती, कापूस बाजार, धान्य अशा कितीतरी क्षेत्रांमध्ये नवे नवे नियम व सुधारणा करून भाऊसाहेबांनी जनतेला सुखी करण्याचा प्रयत्न केला. शेतकऱ्यांसाठी बँका स्थापण्यापासून आपल्या गावापलीकडचे जग न पाहिलेल्या शेतकऱ्यांना अमेरिकेत हिंडवून आणण्यापर्यन्त आणि जागतिक पातळीवर शेतकीप्रदर्शने, जत्रा, मेळे इत्यादी भरविण्यापर्यन्त त्यांनी कार्य केले. लंडनसारख्या परक्या ठिकाणी भारतीय विद्यार्थ्यांची सर्व सोय करणारी संस्था स्थापून तिची झेप पॅरिस–न्यूयॉर्कपर्यंत नेण्याची स्वप्नेही त्यांनी रंगविली. अनेक दिवसांच्या झोपेतून जागा झालेला बहुजनसमाज आपल्या आर्थिक जागृतीचे, धर्म–जागरणाचे आणि राजकीय हितकारणाचे श्रेय भाऊसाहेबांना देतो. आणि अशा जागृतीमुळे निर्माण झालेली विकृती जेव्हा समाजातल्या वरच्या थरांचा द्वेष करण्यापर्यंत गेली, तेव्हा तिला लगाम घालण्याचे कार्यही भाऊसाहेबांनीच केले. आज भाऊसाहेबांसारखेच देशमुख हे आडनाव लावणारी बरीचशी मंडळी समाजातल्या उंच उच जागांवर दिसतात. व एके काळी ब्राह्मणांनाच झाला असेल असा गंभीर अभिमान त्यांनाही झपाटून ते आपले रक्त, आपले घराणे, आपला दर्जा इत्यादीबद्दल भलभलत्या कल्पना करून बसलेले आहेत. जे नेमके ब्राह्मणांपासून घडते म्हणून त्यांच्या विरुद्ध चळवळ उभारली गेली तेच, त्याच स्वरूपात ही मंडळी करत असतांना इतर बहुजनसमाज त्यांचा द्वेष करू लागल्यास नवल नाही. पाटील, हरिजन इत्यादी लोकांचे पुढारी जेव्हा त्या मंडळींना खाली ओढून हुसकून लावण्याचा प्रयत्न करतात तेव्हा त्याचा प्रत्ययही येतो. पण त्या शिव्यांचा उग्रपणा भाऊसाहेबांना झोंबू शकत नाही. याची विरोधकांनाही कल्पना असते. कारण आपला विवाह हा घराण्याची प्रतिष्ठा, हुंड्याचा लोभ आणि जाती–रक्ताची आपुलकी याचा कसलाही लोभ न धरता त्यांनी निष्ठावंत समाजसुधारकाला, साजेसा असा जातिनिरपेक्ष वृत्तीने साजरा केला. ह्या एकाच गोष्टीने विरोधकांची तोंडे बंद झाली. आणि या सर्व व्यापातून स्वतःसाठी दोन पैसे वैधिकपणे देखील कनवटीला लावण्याचा लोभ त्यांनी धरला

नाही. भारतीय समाजावर त्यांचे प्रेम आहे; एक विश्वास आहे. त्या विश्वासातूनच त्यांना खात्री झाली आहे की, आपण जाऊ तेथे दोन भाकरींचे एक ताट आपल्यासाठी तयार राहील. या समाजाला, नव्हे अगदी जवळच्या माणसाला देखील त्यांनी कधीही हक्काने त्रास दिला नाही. एकदा असेच ते नागपूरच्या विमानतळावर रात्री उतरले. भरगच्च अंधारात, नॅशनल कॉलेजकडे जाऊन मोटारच्या आखूड प्रकाशात नव्या इमारतीचे बांधकाम त्यांनी डोळे भरून पाहिले. आणि परममित्र श्रीमंत धनवटे किंवा इतर कोणीही आप्त, यांना त्रास देण्याची कल्पनाही मनात न आणता त्यांनी गाडी सरळ शंभर मैलावरच्या अमरावतीच्या दिशेने सुरू केली. अमरावती जवळ असली तरी रात्र कायम होती. त्यांनी रस्त्याच्या कडेला एका झाडाखाली गाडी उभी केली. आणि ड्रायव्हरला सांगितले, "उगवले की मला उठव" व तेथेच त्या निरुंद सीटवर पाठ टेकून त्यांनी आपले दोन दिवसांचे जागरण सोडले. सकाळी अर्थात सर्व पत्ता लागल्यानंतर अनेक मंडळी त्यांना रागे भरली. "आमच्यावर तुमचा एवढाही हक्क नव्हता का?" म्हणून त्यांनी विचारले. भाऊसाहेब चूप होते.

यातूनही त्यांचा मोठेपणा अथांगच राहतो. असे मनाला पुन्हा जाणवते. कितीतरी लोकांना मी भेटले. भाऊसाहेबांबद्दल, त्यांच्या मोठेपणाबद्दल विचारले. आपापल्या परीने त्यांनी उत्तरे दिली. आकोटची शाळा शिवाजी संस्थेच्या ताब्यात आली आणि ती अमक्याच माणसाच्या कारवाईमुळे आपल्या हातून निसटली म्हणून एक ग्रहस्थ तावातावाने तेथल्या भेंडे गुरुजींच्या अंगावर धावून आले. त्यांच्या माराने छाती चेपून त्या शिक्षकांचा श्वास कोंडला आणि तरीही त्या क्षणीही तो आनंदी दिसत होता. मी त्याबद्दल विचारले तेव्हा उत्तर मिळाले, "भाऊसाहेबांसाठी याहूनही जास्त त्रास सोसण्याचे भाग्य मला देवाने द्यावे." शिवाजी सोडून इतरही अनेक शिक्षण संस्था या भागात आहेत. अशाच दहाच्या वर शाळा कॉलेजेस चालविणाऱ्या ॲडव्होकेट राठींना मी विचारले तेव्हा ते म्हणाले, "डॉ. देशमुख थोर आहेत. आपल्यापेक्षा कितीतरी जास्त शिक्षणकार्य ते करीत आहेत. त्यांचा आमचाच काय, पण शिक्षणकार्य करणाऱ्या कोणत्याही माणसाचा त्यांच्याशी विरोध राहू नये."

अगदी लहानतल्या लहान माणसाचे देखील भाऊसाहेबांवर प्रेम आहे. भाऊसाहेबांचा समावेश मंत्रिमडळात झाला नाही, म्हणून एकजण हमसून

हमसून रडला. भारतीय राजकारण, लोकशाही, इत्यादींचा कसलाही ग्रंथ न वाचता केवळ उरातून बाहेर आलेले ते दुःख होते. आणि जरा वेळाने तोच भीत भीत म्हणाला, " दादा, झालं ते एकेपरी बरंही झालं. म्हणजे असं की, भाऊसाहेब आता तरी अमरावतीत राहतील. एवढं आपल्या हक्काचं गाव, पण नेहमी पाहावं तर ते आपले पाहुण्यासारखे येतात आणि भुर्रकन् उडून जातात. " भाऊसाहेब आले म्हणजे त्यांना भेटण्याची गर्दी करणारे असतातच. पण त्यांना न भेटणारे, त्यांच्याशी एक शब्दही न बोलणारे, पण ते मोटारीतून इकडे तिकडे जात असताना त्यांचा नुसता चेहरा दिसला म्हणून आनंदून जाणारे लोक रस्त्याच्या बाजूने रांगा लावत असतात. " काय करावं लागते भेटूनच ? अन् त्यैइच्याशी बोलाचालाले आपण थोडेच काय शिकले सवरले आहोत ? नुसती नजरीले नजर पडली अन् डोळे भरून पाह्यलं तरी लय झालं. " असे ते समाधान असते. भाऊसाहेबांनाही लोकांना भेटण्याची आवड आहे. आणि लोकांना त्यांची भेट घेण्याची. " जो न लोकास कंटाळ, ज्यास कंटाळती न ते " असे ते नाते आहे. " लोकांनी आपली कामं मला सांगावी, भेटावे, बोलावे. त्याची मला हौस आहे. मी सर्वांची कामे करू शकणार नाही. या दोन हातांना ते अर्थातच अशक्य आहे. तरीही ती कामे ऐकण्याची या कानांना इच्छा आहे. " असे काहीसे भाऊसाहेब परवा बोलले. जीवनभर शिक्षकाचा व्यवसाय करून निवृत्त होणाऱ्या एका सालस माणसाच्या सत्कारप्रसंगी भाऊसाहेबांनी हे उद्‌गार काढले.

कोणाला कोणत्या कारणांनी भाऊसाहेब मोठे वाटतील याचा नेमच नाही. लोक एकमेकांजवळ बढाया मारतात; " भाऊसाहेब काल नागपूरहून आले. " दुसरा म्हणतो, " धूत लेका ते दिल्लीहून आले. " तिसरा त्यावर चढी करतो, " अबे जावे, ते का फक्त दिल्लीलेच राहते का ? ते तर काल रशियाहून आले. तेथ त्यांचा पॅरीसले मुक्काम होता." भूगोल जरासा बऱ्यापैकी जाणणारा पाचवा त्यावर हसून त्यांना सांगतो, " लेकांनो पॅरीस रशियात नाही. भलतं सलतं नका सांगत जाऊ. रशियात ते न्यूयार्कला होते." मग ती चर्चा संपते; आणि आपले भाऊसाहेब मोठे आहेत, म्हणून ते मोठमोठ्या ठिकाणी राहतात, त्यामुळेच अमरावतीस कमी राहतात; आणि त्यांच्या जन्मगावी म्हणजे पापळला तर फारच कमी राहतात असा त्या मंडळीचा समज होतो.

भाऊसाहेब मोठे असतील, पण मोठेपणा झाकण्याचा त्यांचेइतका गुण फार

कमी लोकांमध्ये आहे. एखाद्या वादळाने झुळकीचे रूप घ्यावे तसा काहीसा प्रकार त्यांच्या बाबतीत आहे. त्यांना अनेक लोक जेवायला बोलावतात. तेवढ्यासाठी पोरांची लग्ने, सोयरिकीधायरिकीचे पाहुणे यांना खोळंबून ठेवतात. उत्सवासाठी म्हणून राखून ठेवलेले द्रव्य अशा वेळी ते वेचतात. व भाऊसाहेब आपल्या घरी दोन घास खाऊन गेले याची आठवण जन्मभर जपतात—आपल्या म्हाताऱ्या आईच्या फोटोसारखी! आणि तो प्रसंग, खरे म्हणजे, लाडवाजिलेबींनी आणि पुरणावरणाने सजलेला असतो. तरीही त्यातल्या भाऊसाहेबांबद्दलच्या आठवणी म्हणजे, "का गा हिरव्या मिरच्यांचा ठेचा खावा तो भाऊसाहेबांनीच! आपली काय ताकद आहे इतकं तिखट खाण्याची?"

परवा एस्. व्ही. यांनी पुष्कळ आठिवणी सांगितल्या. ते म्हणाले, "भाऊसाहेब आम्हा सर्व लोकांशी ज्वारीच्या भावापासून तर शाळेच्या छपरापर्यंत वाटेल त्या सामान्य विषयावर बोलतात. का? माहित आहे? आपल्या समोरच्या माणसाला आपल्यापेक्षा विद्वान् माणसाशी आपण बोलत आहोत याचा गंड ते होऊच देत नाहीत. त्यांना जन्मभर असे साधेसुधे बोलतांना मी पाहिले. आणि याच माणसाने इंग्लंडमध्ये वेदांवर पीएच. डी. घेतली हे मग आम्हीही विसरल्यासारखे होतो. समोरच्या माणसाच्या पातळीशी ते इतके समरस होतात." हे त्यांचे बोलणे ऐकून मलाही त्यांची पार्लमेंटमधली भाषणे वाचल्यानंतर त्यांच्या विद्वतेचा विराटपणा नव्याने आठवला. एकदा 'नॅशनल' मध्ये ते आपले अमेरिकेतील काही अनुभव सांगत होते. त्यांचे फर्डे इंग्रजी तेथल्या पारशी व खिश्चन विद्यार्थ्यांनाच काय ते कळत असेल. पण लगेच त्यांनी तेच भाषण आमच्या पातळीवर मराठीत केले. आणि गाडगे महाराजांनी शुद्ध मराठीतून बोलावे, तसा गोडवा आणि आत्मीयता हे त्यातून जाणवले. अमेरिकेच्या वैभवाची खूप वर्णने त्यांनी केली. एखादा उत्कृष्ट रंगीत चित्रपट पाहावा तसे काहीसे त्यावेळी उभे राहिले. मध्येच त्यांनी विनोद केला. "ते काय करतात पहा की, मक्याची उत्तम कणसे तेवढी निवडून घेतात. थोडी जरी वाईट असली तरी फेकून देतात. मी त्यांना म्हटले, अहो साहेब, हे काय करता? ती कणसेही तेवढीच उत्तम आणि चवदार आहेत. एकदा माझ्यावर विश्वास ठेवा. नाही तर स्वतः खाऊन खात्री करा. एवढ्यानेही नाही जमले तर ती आमच्याकडे पाठवा. आम्ही खाऊ." भाऊसाहेब हे सांगतांना स्वतः हंसत होते, लोकांना हसवीत

होते; आणि आपल्या देशस्थितीची, दारिद्र्याची एक झोंबरी जाणीव त्यांच्या डोळाभर फिरत होती.

भाऊसाहेबांची भाषणे आणि संभाषणे अशी नेहमीच तंतोतंत गणितांनी आणि त्याच वेळाला सहज गप्पांचे रूप घेतलेल्या तत्त्वज्ञानाने भरलेली असतात. संघटित कामगारांच्या मानाने खेड्यातला मजूर किती पटीने तोटा खातो इथपासून तर शेळीला काय खाऊ घातले म्हणजे तिच्या दुधाचा वास जाईल. इथपर्यंत ते कशावरही बोलतात. त्यांना आपल्या बागेत पिकलेल्या सुंदर द्राक्षांचा हार घालत असताना कोणते खत अधिक द्यावे याचीही चौकशी किसान मंडळी केल्याशिवाय राहत नाही. भाऊसाहेबांना वाटेल ते विचारण्याचा हक्क आणि भाऊसाहेबांचे त्याबद्दलचे ज्ञान दोन्हीही तेथे गृहीत धरले जाते.

हे असेच त्यांना सतत काम करू दिले तर त्यांच्या देहाची खैरीयत नाही हे समजून घेऊन त्यांच्या भोवतीच्या लोकांनी काही उपाय करूनही पाहिले. भाऊसाहेब त्या उपायांना बधत नाहीत, याचा अनुभव आल्यामुळे शेवटी बाहेरच्या लोकांवरही बंधन घालण्याचे प्रयत्न झाले. पण दारावर रोखल्या गेलेल्या दर्शनेच्छूंच्या मदतीला स्वतः भाऊसाहेब धावून येतात. त्यांची माझी मुळीच ओळख नसताना काही पोरांना घेऊन मी दिल्लीला त्यांच्या बंगल्यात शिरलो. दिवस जागतिक शेतकी प्रदर्शनाचे होते. भाऊसाहेब अत्यंत कामात आहेत, थकलेले आहेत हे आम्हांला बंगल्यातून येणाऱ्या फोन्स्च्या आवाजातून पुरेसे जाणवत होते. म्हणूनच आम्हांला पडवीतच रोखून धरणाऱ्या त्यांच्या सेवकांवर फारसे दातओठ खाता येत नव्हते. तेवढ्यात लहान पोरांचा कलकलाट ऐकून स्वतः भाऊसाहेबच आम्हांला सामोरे आले. सोबत विद्यार्थी आहेत. म्हटल्यानंतर माझ्या त्यांच्या वैयक्तिक परिचयाची आवश्यकताच त्यांना वाटली नाही. प्रदर्शनाचे येवढे अवाढव्य काम फोनवर सांभाळीतच त्यांनी पोरांच्या जगातील सर्व तथाकथित महत्त्वाच्या प्रश्नांची चर्चा केली. त्यातून विटीदांडू व पंतगही सुटला नाही. पोरे अंडी खात नाहीत याचा अचंबा आणि नुकत्याच सप्रेम भेट आलेल्या संत्र्यांची आठवण व त्यांचे पोरांना वाटप इत्यादी करून ते तात्काळ आपल्या कार्यक्रमाला निघूनही गेले. भाऊसाहेबांना भलत्या वेळी निष्कारण त्रास दिला हे चेहऱ्यावर भरपूर प्रमाणात दाखविणाऱ्या एका माणसाने आमच्या हाती तेवढ्याच नाखुषीने एक चिठ्ठी दिली. राष्ट्रपतिभवन, नेहरूंचे घर इत्यादींना भेट देण्याची ती सोय होती.

भाऊसाहेबांची तबियत दिवसेंदिवस खालावत आहे, त्यांना पक्षाघाताचा झटका आला. हळवे मन कितीही नाकबूल करीत असले तरी अटळाची छाया आणि विलीनांची पावले जाणवल्यावाचून राहत नाही. त्यांना दीर्घायुष्य मागणारे असंख्य आहेत. त्यांत त्यांचे चाहते आहेत, मित्र आहेत, भक्त आहेत. आणि विरोधकही आहेत. जीवनाचा एक भला मोठा अर्थ साकार करण्यासाठी त्यांची गरज सर्वांना आहे, आणि त्याच वेळी एकंदर जमाखर्च साकल्याने पाहण्याची गरजही समोर उभी आहे. भाऊसाहेब मोठे आहेत ते दोन्हीही अर्थांनी. त्यांच्या इतका लोकप्रिय या भागात दुसरा नाही. आणि त्यांच्या इतका गैरसमजही दुसऱ्या कोणाच्या बाबतीत नाही. ब्राह्मणांना ते मराठा वाटतात. आणि मराठ्यांना ते ब्राह्मण वाटतात. साधा माणूस म्हणून त्यांना जगू देण्याची कोणाचीच इच्छा नाही. त्यांच्या अगदी जवळच्या माणसाची देखील नसेल. स्वातंत्र्यपूर्व काळात ते मंत्री झाले, म्हणून उच्चभ्रूवर्गाने आपली नाके मुरडली असतीलच. हा माणूस आता सर्व महत्त्वाच्या पदांवर महार, मांग आणि कुणबी भरणार अशी भिती त्यांना वाटली असेल आणि बहुजनसमाजातल्या लोकांनाही काही फार आनंद झाला नाही. कुसुमावतीबाई देशपांडे आणि मोडक या अमराठ्यांना त्यांच्या जातीपेक्षा योग्यतेला मान्यता देऊन उच्चपदी आणले ही गोष्ट भाऊसाहेबांच्या अनेक भक्तांना धडकी मारून गेली. वादळही झाले. भाऊसाहेबांनी आपली पी एच. डी. वेदांतावर मिळवलेली आहे. ब्राह्मणी विद्येचा अभ्यास करता करता हा माणूस ब्राह्मणधार्जिणा झाला की काय, तो भटाळला की काय—ह्याबद्दल शंकांचा डोंब उसळला. धावपळ सुरू झाली. त्यांच्यावर अमुक एका मतप्रणालीचा कायम शिक्का मारण्याचे प्रयत्न चालले. ब्राह्मणेतर चळवळीच्या एका पत्रकावर त्यांची सही मागण्यासाठी लोक आले आणि धक्का बसून अतिशय नाराज होऊन परत गेले. सही नाकारल्यामुळे ब्राह्मणेतरांचा रोष त्यांनी ओढवला म्हणून काही त्यांच्या वाट्याला ब्राह्मणांची सहानुभूति आली नाही. त्यांनी आपल्या कर्तृत्वाने 'ब्राह्मण्य' मिळविले, पण ब्राह्मण मिळविले नाहीत. एकट्यादुकट्या मित्राची गोष्ट सोडा; संपूर्ण अशा कोणत्याही पक्षाने त्यांना आपले म्हटले नाही, हाच त्यांचा पराभव, किंवा हेच त्यांचे यश. आणि त्यामुळेच अचानक धक्क्याने त्यांचे जीवन भरून गेले. जातीबाह्य विवाह केला म्हणून नातेवाईक नाराज, शिवाय दुसऱ्या जातीचे सख्य नाही ते नाहीच! असे सारीकडून दगडच फक्त

त्यांच्या वाट्याला आले. अर्थातच हे सर्व गैरसमज त्यांच्याबद्दल झाले ते मतलब्ध आणि मतलबी लोकांकडून. संपूर्ण जनतेने त्यांच्यावर प्रेमच केले दर निवडणुकीच्या वेळेला खूप मोठी गंमत उडते. मराठ्यांचे थोर थोर पुढारी त्यांना विराट सभांमधून शिव्या देतात. त्यांना देशमुख धार्जिणे म्हणतात. देशमुख मंडळी त्यांच्यावर तशाच काही कारणांनी नाराज असते. बहुजन व नवबुद्ध तर त्यांच्यावर सपाटून चिडून असतात. ते मंत्रिमंडळात आले तर आपले कसे होईल याची उच्च वर्गाला विवंचना असते. मराठा म्हणून, देशमुख म्हणून, भटाळलेला म्हणून, आणि हरीजनांचा पक्षपाती म्हणून ते सर्वांना दूरचे असतात. त्यांच्या संस्थेचे शिक्षकदेखील त्यांच्या विरुद्ध राजरोस प्रचार करीत असतात व हा माणूस आता शून्यावर उखडणार की काय —डिपॉझीट जप्त होणार की काय—अशी भिती वाटते. सारे वातावरण, सारे प्रचारक, सारे गट त्यांच्या विरुद्ध चेतलेले असतात. नेहमी मुका राहणारा सामान्य माणूस याही वेळी चूप बसतो. तो कुणाला तरी मतदान करतो. चूपचाप घरी निघून जातो. एक दिवस निकाल जाहीर होतो; आणि भारतात जास्तीत जास्त मते मिळविणाऱ्या काही थोड्या भाग्यवंतांमधे भाऊसाहेबांचे नाव जाहीर होते. मग भाऊसाहेबांनी गरिबाच्या पोरासाठी सरकारातून आणलेल्या शिष्यवृत्त्या, त्यांनी जातीनिरपेक्षपणे वाटलेल्या नोकऱ्या, शेतकऱ्याच्या मालाला मिळवून दिलेला योग्य न्याय, कर्जबाजारी समाजदोषांवर घातलेली सहानुभूतीची फुंकर येवढ्याच गोष्टीचे अर्थ तेवढे प्रगट होतात. हे जसे अचानक घडते तसे दुसरेही काही प्रसंग अनपेक्षित घडतात. चापांच्या शाळांतून, कौलारू कॉलेजांतून भाऊसाहेबांनी हजारो पदवीधर, कितीतरी वकील, प्राध्यापक कर्मचारी निर्माण केले, आणि विद्यापीठाच्या उपकुलगुरुपदी ते बसायला जाऊ पाहताच असंख्य विद्वानांनी त्यांना अर्ध्यातच अडवले. त्यांची ही हार, हा त्यांचा पराभव होता की विद्येचा, हे एक न सुटणारे कोडे आहे.

भाऊसाहेब असे आहेत. त्यांच्यावर, त्यांच्या संस्थांवर, त्यांच्या माणसांवर नाराज असलेले मी शेकडो पाहिले. त्यांच्या गुणावर, त्यांच्या कार्यावर, त्यांच्या स्फोटक विचारांवर चिडणारे मी हजारो पाहिले. आणि ही सर्व चीड जशीच्या तशी कायम ठेवून त्यांना आपल्या मताचा कौल देणारे मी लाखो पाहिले. आणि त्या कुठल्याही स्वरूपात भाऊसाहेब महान् राहिले.

मराठा : २६ डिसेंबर १९६४

# श्री. पी. के. देशमुख

एकेकाळी मंत्री असलेले व आता तसे नसलेले तीनचार तरी लोक या गावात आहेत. सर्वांशीच माझा परिचय नाही. माणूस मंत्री असताना पाहण्याची मला फारशी उत्सुकता नसते. आपोआप दिसलेले बहुतेक मंत्री हे एका ठराविक मुखवट्याचे वाटले. मंत्री असेपर्यंत तरी त्यांच्या त्या टाइपात फरक पडणार नाही अशी माझी समजूत असते. मंत्री होण्यापूर्वी तो एक सामान्य माणूस असणार—तेव्हा त्याबद्दलची माहिती काढण्याचीही मला उत्सुकता नसते. नवे चेहरे धुंडाळणारा माझा स्वभाव खरा रमतो तो काल मंत्री असलेल्या आणि आज साधा माणूस असलेल्या माणसांच्या जवळ. मंत्रिपदाच्या आठवणी ते लोक कशा व्यक्त करतात हे पाहणे नक्कीच मजेचे ठरेल. दुर्दैवाने मला तशी संधी आली नाही. कारण मंत्री होण्याचे दुःख करणे व पूर्व वैभवाच्या आठवणी उगाळीत बसणे, त्या तोरा, सत्ता, व वैभव यांनी भरलेल्या भूतकालाच्या गुळाला चिटकून मुंगळ्यांसारखे राहणे इत्यादी गोष्टी या भूतपूर्व मंत्र्यांनी ज्या काळात केल्या असतील तो काळ माझ्या आधीचा. त्या तऱ्हेचे वागणे त्यांच्याकडून झाले असेल की नाही हेही आज कळणे दुरापास्तच. काळ लोटत गेला म्हणजे माणूस वास्तव स्वरूप मान्य करायला शिकतो. आपण मंत्री नाही. सलाम करणारे शिपाई व हार घालणारी बडी धेंडे समोर नाहीत हेच एकेकाळी खोटे वाटणारे ते बिनमंत्री मगमग हळूहळू काही गोष्टी खऱ्या मानू लागतात. पुढे पुढे तर त्यांचे जीवन व काळ असा काही पालटत जातो की आपण कधी तरी मंत्री होतो हेच

त्यांना खोटे वाटते. ते सत्तापद म्हणजे कधीतरी आपणाला पडलेले स्वप्न असावे याही मानण्यापार ते जाऊन पोहोचतात. एका माजी वृद्ध मंत्र्यासोबत मी कुठेसा जात होतो. त्याच वेळी विद्यमान मंत्र्याच्या मोटारीचा काफिला जात असल्याने आमची गाडी पोलिसांनी रस्त्यावर थांबवली. आमची गाडी अर्थातच भाड्याची फोर्ड. आणि समोरून जाणाऱ्या मंत्र्यास व त्याच्या प्रभावळीस तऱ्हतऱ्हेच्या उत्तम कार्स लाभलेल्या होत्या. त्याचे वैषम्य खरे म्हणजे आमच्या वृद्ध माजी मंत्र्यांना वाटायला हवे होते. कधीकाळी त्यांना ते वाटलेही असेल. पण त्या प्रसंगी मात्र ते वैषम्य वाटण्याचा काळ ते विसरून गेले होते. मंत्री होतो हे तर त्याही आधी ते विसरले असावे. त्यांच्याऐवजी मलाच तेव्हा काहीतरी गद्‌गदून आले.

मंत्रिपद नुकतेच गेलेले येथले दोन लोक म्हणजे डॉ. पंजाबराव व दुसरे पी. के. त्या दोघांच्या चेहऱ्यावर त्या पदांच्या काही आठवणी व प्रक्रिया बघायला मिळाव्या म्हणून मी खूप धडपडलो. म्हणावी तशी संधी मात्र आली नाही. डॉ. पंजाबराव येथे नसतातच. कधीमधी येतात तेव्हा दिल्लीत ते कोण्या मोठ्या संस्थांचे अध्यक्ष असल्यामुळे त्यांचा दरारा व वैभव हे माझ्यासारख्या तिऱ्हाईत माणसाला मंत्र्यासारखेच दिसते. त्यांचे मंत्रिपद गेले तेव्हा त्यांचा चेहरा कसा दिसला असेल याचाही अंदाज फक्त अंदाजच ठरला असता. त्यांच्या चेहऱ्याऐवजी त्यांच्या चाहात्यांचे काही उतरलेले चेहरे मला येथे पाहता आले. पण ते सर्व लोक डॉ. पंजाबरावासाठी दुःख करण्याऐवजी स्वतःचेच काही नुकसान झाल्याने दुःखी झालेले वाटत होते. राहता राहले पी. के. मंत्रिपदावरून उठल्यानंतर ते दिल्लीत किंवा इतरत्र न जाता येथेच आले. माझी त्यांची ओळख तेव्हा नव्हती. दुरून दुरून मी त्यांना पहात होतो. ते नागपूरहून आले तेव्हा त्यांच्याजवळ एक गाडी होती. काही दिवसांनी ती दिसेनाशी झाली.

कालपर्यंत अलीशान मोटारीतून व तेही लवाजम्यासह फिरणारे हे गृहस्थ आता पायी फिरणार हे उघड झाले. त्यांचा मोटारच्या आठवणींनी हुंदके देणारा चेहरा पहाण्याची मी मनाशी तयारी केली. कालपर्यंत त्यांच्याभवती कुत्र्यासारखी शेपटी हालवणारे लोक आता नव्या मंत्र्यासाठी आपले गोंडे साफ करीत असतील. आज सामान्य माणूस म्हणून जगणाऱ्या अण्णासाहेबांना आता कोणी कुत्रेही विचारणार नाही असाही एक विचार मनात चमकून गेला. इकडून तिकडे सहज जातायेता मी त्यांच्या घराकडे नजर टाकीत होतो. नवल असे की

त्या वाड्यापुढे अजूनही मोटारीतून उतरणारे काही लोक दिसत. ते भल्या आदराने त्या वाड्यात शिरत. माझी खात्री झाली की, अण्णासाहेब आजकाल मंत्री नसल्याची वार्ता त्या लोकांना कळली नसावी. तशी माहिती असलेला आजचा कोणताही शहाणा माणूस आपली गाडी नव्या मंत्र्याच्या आगेमागे चालवण्याऐवजी या वाड्याकडे येण्याची चूक करणार नाही.

जे बडे बडे लोक अजूनही येवढ्या आदरानेही त्या वाड्यात का जातात व तेथे जाऊन काय करतात ते पाहण्याची इच्छा झाली होती. पण माझी ओळख नव्हती. शिवाय एखाद्या किरकोळ पोराला पुढे लेखक वगैरे होण्याची इच्छा आहे व त्यासाठी त्याला अनुभव वाढविण्याची संधी द्यावी अशा सोयी येथे होण्याचे कारणही नव्हते. अण्णासाहेब रस्त्यावरून पायी जाताना आपणांस कधीतरी दिसतील व त्यांच्या चेहऱ्यावर खोटा तोरा, पूर्ववैभव न विसरण्याचा हट्ट, वास्तवापुढे मान टाकलेला केविलवाणेपणा अथवा लोकांच्या नजरा चुकविण्याची धडपड यापैकी काहीतरी आपणांस पाहायला मिळेल अशी आशा जोजवीत मी काही दिवस होतो. एकदा माझ्या समोरून एक उंच, ताठ पाठीचा माणूस हातात काठी घेऊन सहजपणे पण जरा घाईत पावले टाकीत जाताना दिसला. ते पी. के. असावे अशी शंका आल्याने मी सायकलचा वेग वाढवून समोर गेलो. ते माजी मंत्री श्री. पी. के. च होते; पण मला हवे असलेले काहीही त्यांच्या चेहऱ्यावर नव्हते. ते आपल्याच नादात फिरायला निघाले होते. आजूबाजूच्या लोकांचे नमस्कार स्वीकारीत पुढे पुढे जात होते. मीही ओळख असल्यासारखा एक नमस्कार ठोकून तेथून काहीच न गवसलेल्या भिकाऱ्यासारखा पळालो. त्यांच्यापेक्षा माझाच चेहरा त्या वेळी पाहण्यालायक होता. मला ही गोष्ट सारखी रुतत होती. कुठल्या तरी ठिकाणी म्हणे एक मंत्री एक दिवस साधा M. L. A. ही राहिला नाही. त्याने असेंब्लीकडे जाणारे भाग्यवान लोक रस्त्यावर पाहिले व त्यांचे काही विकार उद्भवून तो चाराठ दिवसात मेला. हे खरे असेल किंवा नसेलही. पण काल मंत्री असलेल्या व आज नसलेल्या माणसाने अगदी हाय खाऊन मरणे नसले तरी निदान चेहऱ्यावर त्या कै. मंत्रिपदाचे थोडे सुतक तरी ठेवायला हवे ना ? तेवढेही नैसर्गिक दुःख श्री. पी. कें. नी रस्त्यावरून जाताना चेहऱ्यावर ठेवायला नको का ?

या माझ्या पराभवानंतर मी त्या माजी मंत्र्याचा नाद सोडणार होतो. माझ्या

दैनंदिन छंदातला एक ' अभ्यास ' म्हणून ते गृहस्थ निरुपयोगी ठरले व त्यांचे नाव माझ्या यादीतून कटल्याने माझे फारसे नुकसानही होणार नव्हते. म्युनिसिपालिटीचा सदस्यपणा जाण्यापासून तर ' कॉलेजचा प्रिन्सिपाल झालो असतो ' या नुकसानीपर्यंतची थडगी आपल्या चेहऱ्यावर जपणारे कितीतरी लोक ' निरीक्षणा 'साठी कामी येण्यासारखे होते. पण श्री. पी. के. यांचे व माझे काही विधिलिखित संबंध संपण्यासारखे नसावे. त्यांचा थोरला मुलगा हा जाता येता भेटला तर मला नमस्कार करी. ओळख फारशी म्हणजे जवळ जवळ मुळीच नसल्याने आमचे बोलणे कधी होतच नसे. नमस्कार मात्र चुकत नसत. वडील मंत्री असतानाही जराजराशा परिचयाच्या व्यक्तींना असा आदर देण्याची त्याला सवय होती हे मला कोणीसे सांगितले. एक दिवस नागपूरच्या छोट्या माडखोलकरांच्या सावलीसावलीने मी अण्णासाहेबांच्या वाड्यात शिरलो. माडखोलकरांच्या कामाशी माझा संबंध नव्हता. त्या वाड्यात शिरताना वाड्यात शिरणे येवढेच माझे काम. एक उत्सुकता. एक माणूस, बडी व्यक्ती जवळून पाहावी ही इच्छा. यापार काही नाही. तेथे गेलो तेव्हा पाव्हण्यांसोबत पाव्हण्यां-इतकेच मलाही ' या बसा ' झाले. चहापोह्यांची भांडीही माझ्या वाट्याला समसमानच आली. मी कोण ? वगैरे चौकशी त्या माजी मंत्र्यांनी करावी असे कुठेतरी वाटून गेले. पण गप्पांच्या धारेत असेल कदाचित— मला तेथे ' इसम ' या भूमिकेत बसणेच प्राप्त झाले. आपले थोडेसे अस्तित्व लादण्याची एक संधी मी शेवटी शेवटी घेतली. कितीही झाले तरी श्री. पी. के. नसले तरी त्यांचा मुलगा मला नमस्कार करीत असे ना! मी हिंमत करून तीच गोष्ट नेमकी त्यांना सांगितली. माझ्या त्या मध्येच बोलण्याला धागा नव्हता. तरीही अण्णासाहेबांना माझी दखल तेव्हा घ्यावी लागली. माझा परिचय माडखोलकरांनी करून दिला. तात्काळ विसरण्याच्या योग्यतेचाच माझा संपूर्ण परिचय. पण अण्णासाहेब मान डोलवीत ' असं का, अरे वा oh ऽ I see ' वगैरे करू लागले. त्यामुळे धीर येऊन मी पुन्हा पूर्वीचेच बोललो. अण्णासाहेबांनी ते ऐकले व आम्ही माडीच्या पायऱ्या उतरताना ते म्हणाले, " माझ्या मुलाबद्दल ही गोष्ट कळल्यानं फार आनंद झाला. या सर्व आपल्या जुन्याच रीतीभाती नव्हेत का ? "

येवढ्या ओळखीच्या जोरावर मग आमच्या भेटी होत राहिल्या. पण तेथे जेव्हा जेव्हा जावे तेव्हा तेव्हा त्यांची बैठक राजकारणातल्या रथीमहारथींनी



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
६३८५७ ... मिडांई/
१९८२ ... ४/३/६७

भरलेली असे. ते सारे बोलणे मला कळत नसे आणि तो माझा प्रांतही नव्हता. एक दिवस संधी साधून मी त्यांना म्हटले,

" अण्णासाहेब, मला राजकारणात गम्य नाही. येथे आल्यावर तुमच्याशी काय बोलावे कळत नाही. "

" वा ! मग तुमच्या विषयावर बोलत जा. आम्हांला तेवढाच विरंगुळा ! " राजकारणात मुरलेल्या माणसाने वाङ्मयावर बोलण्याची उदार परवानगी दिली खरी. पण ते बोलणे एकांडेच राहणार अशी धास्ती होती. अनुभव नेमका उलटा आला. वाङ्मयात मी त्यांच्या ज्ञानात भर टाकण्याऐवजी तेथे मलाच काही नवे उमगले. कॉलेज जीवनातला वाङ्मयाचा संबंध अण्णासाहेब टिकवून होते !

परिचय व बैठकी काही प्रमाणात वाढल्या. तशी मग अण्णासाहेबांची नवनव्या पैलूंची ओळख होऊ लागली. त्यांची बैठकीतली व व्यासपीठी मतप्रणालीही कळली. पण त्यांची खासगी मते कळण्याचे प्रसंग अजून यायचे होते. इकडच्या घरंदाज कुळातल्या पुढाऱ्यांना दोन तऱ्हेच्या आचारसंहिता पाळाव्या लागतात. निवडणूक लढवायची म्हणून खालच्या जमातींना हीनगंडांची जाणीव होऊ न देण्याची खबरदारी घ्यावी लागते. रणांगणावर जातीभेद नको. आणि त्याच वेळी नातलगांचा परिवार सांभाळण्यासाठी आपली देशमुखीही सोडता येत नाही. म्हणूनच सुज्ञ नेते आपल्या मतांचे सार्वजनिक व खासगी असे दोन विभाग करतात. त्याबद्दल जनतेने चिडायचे नसते. म्हणूनच अण्णासाहेबांच्या कन्येसाठी मुले सुचवताना मी म्हणालो, " अण्णासाहेब, तो अमका मुलगा M. A. मध्ये पहिला आला होता. "

यावर त्यांनी मानेनेच ' ठीक ' म्हटले. पुढे मी, " तो मुलगा चांगला नोकरीदार आहे. सुस्वभावी आहे. "

" बरं, पण त्याच्या अपेक्षा काय आहेत ? "

आधुनिक तरुण पिढीने कादंबऱ्या वगैरे वाचून मुलींबद्दल घडवलेल्या ज्या अपेक्षा असतात त्या सर्व मी त्यांना ऐकवल्या.

" त्यांना सांगा, मी हुंडा देणार नाही. "

हे बोलणे वधूपित्याला साजेसे नव्हते. हुंडा त्या वेळी कायद्याने बंद झाला होता. पण त्याचा फायदा घेण्याचे देशमुखसमाजास कारण नव्हते. मुलींच्या वेळी कायदा आधाराला घेतला तर मुलांच्या लग्नाच्या वेळी नुकसान येणार.

देशमुखांचा प्रतिनिधी म्हणून अण्णासाहेबांनी आपल्या व्यासपीठी मतांआड काही खासगी आचारविचार ठेवावे ही माझी अपेक्षा होती.

" माझी मुलगी M. Sc. आहे. संसाराला मदत म्हणून नोकरी करण्याची तिची तयारी राहील. तेव्हा तुम्ही सुस्वभावी व सुशिक्षित अशीच मुलं सांगा. मला श्रीमंत जावयांची गरज नाही. आणि मुलगा देशमुखच असला पाहिजे ही तर माझी मुळीच अट नाही. "

मला हे बोलणे व्यासपीठी वाटले. म्हणताना सारेच असे म्हणतात. जातीय-वादातीत असण्याचे श्रेय व घरंदाजी हे दोन्ही एकाच वेळी घेतात. " चालला असता कोणत्याही घराण्याचा; पण देशमुखच मिळाला. तेव्हा म्हटलं जुळवून टाकावं. " हे उत्तर पुरेसे असते. कोणतेही घराणे चालले असते त्यातच ' देशमुखही चालेल इतकेच. हुंडा टाळण्याआड त्यांच्या खासगी मतांचा वास मला घेणे भाग होते. म्हणूनच मी म्हणाले,

" अण्णासाहेब, हा मुलगा आज उच्च देशमुख आहे. आणि तसा असूनही फर्स्टक्लास आला. तेव्हा हुंडा तुम्ही द्यायला हवा. त्याला आतापर्यंत दहा हजारापर्यंत ऑफर्स आल्या आहेत."

" मजजवळ तेवढी इस्टेट नाही."

एकेकाळी मंत्री असलेल्या माणसाची ही अर्थव्यवस्था ? पण मंत्री असल्याच्या कारणाने त्यांच्या संपत्तीवर कसलाही फुगवटा आला नाही हे त्यांच्या शत्रूंनाही मान्य होते. पुढे त्यांच्या कन्येचा विवाह झाला. ' देशमुखी ' वगैरेचा हिशेब त्यात खरोखरच दिसला नाही. जावयाची माणूस म्हणून असलेली योग्यताच त्यांनी स्वीकारली. म्हणूनच माळी-महारांपासून मुसलमानपर्यंत सर्व लोक त्यांना आपला नेता का मानतात ते कळले. लग्नात अण्णासाहेबांतर्फे मिरवणारे मुख्य घरवऱ्हाड म्हणजे तमके खान, अमके शेख, हे नवबुद्ध, तो माळी असेच सारे ! ते लग्न खऱ्या अर्थाने या प्रदेशातला सार्वजनिक सोहळा होता.

खालच्या जाती राजकीय जागृतीने वर आल्या. ब्राह्मणांचा एकेकाळी पाटील–देशमुखांनी सूड घेतला तसेच ते दलित वर्गही आज पाटील–देशमुखांना संशयाने पाहतात. निवडणुकीत त्यांच्या तिरस्काराची प्रचीतीही येते. पण राज-वैभव भोगण्याच्या काळातदेखील अण्णासाहेबांनी त्या नवजागृत थरांचे आपुलकीने स्वागत केले. त्यांना न्यूनगंड न होऊ देता विश्वासात घेतले.

कॉंग्रेस ही भांडवलदारांची व थोर घराण्यावाल्या पुढाऱ्यांची संस्था म्हणून त्या दलित जाती तिकडे फिरकल्या नसत्या. पण अण्णासाहेबांना त्या सर्व जमातींचे बळ सदाच मिळत राहिले. आधीच सुसंपन्न झालेल्या समाजाचा विरोध एकपरीने त्यांना होईल; पण नुकत्याच उगवलेल्या सूडाने पेटलेल्या जमाती मात्र अण्णासाहेबांकडे आपला माणूस म्हणूनच पाहतात. त्यांच्या बैठकीत एकाच आसनांवर बसलेल्या लोकांमध्ये एखादा आपल्या अमक्या म्युनिसिपालिटीचा चेअरमन शेठ अमुकतमुक असतो तर दुसरा गिरीजनांमधला एक सामान्य कार्यकर्ता असतो. वाड्याच्या मोठ्या दारातच ही मंडळी सकाळपासून अर्ध्या रात्रीपर्यंत जोरजोराने गप्पा करीत असते. चार जण गेले तर दुसरे पाच जण येतात. अण्णासाहेब रोज निदान दोनशे लोकांना भेटतात. त्यात रोज नवे चेहरे. नवी नावे. पण पानतमाखूच्या सोबत होणाऱ्या त्या गप्पांमध्ये प्रत्येकाशी अण्णासाहेब 'त्याचे त्याचे' बोलू शकतात. इतक्या गर्दीशी बोलताना पूर्वभेटीचे संदर्भ, नावे, गावे, चेहरेयांची याद ठेवणे हे काही सोपे नव्हे. पण ही अचाट आपुलकी व विशाल स्मरण–शक्ती त्यांच्यामध्ये आहे. ऊर्दू, हिंदी, वऱ्हाडी, मराठी, इंग्रजी सर्व भाषांमधून ते दिवसभर त्या त्या मंडळीशी सारखे बोलत असतात. दोनचार खाटा. त्यावर सतरंज्या तक्के . त्यावरही गर्दी मावत नाही म्हणून पुन्हा काही बेंच, खुर्च्या. अण्णासाहेबांनी ही बसण्याची जागाही मोठीच गमतीची निवडली आहे. राजकारणामुळे घरात लक्ष नाही असे कोणी म्हणू शकत नाही. कारण ते घराच्याच दारात व घरगुती म्हणजे अनेकदा धोतर, बनियन अशा निव्वळ घरगुती पोशाखात प्रतिष्ठित पाहुण्यासमोर बसलेले असतात. जेवणानंतरचे पानही घरात म्हणजे दारातच. आणि कोणी मंडळी नसल्याच्या भाग्यवान पाचपंधरा मिनिटात वामकुक्षीही तेथेच ! अर्थात अशी मिनिटे दुर्मिळच. ज्याला माणसे मिळवण्याचे वेड आहे त्याने रिकामी मिनिटे शोधूही नयेत. नरसिंहासारखे त्यांचे हे दारातले ठाण असे गमतीचे आहे. घरात राहून हे सार्वजनिक जीवन चाललेले असते. ते असेंब्लीत किंवा कोठे बाहेरगावी गेले म्हणजे त्या दाराची सारी शोभाच जाते. ते घरात आहेत का याची चौकशी करण्याची गरजच उरत नाही. गावात असले म्हणजे हे दारातच असतात.

विदर्भाच्या जीवनाचा खूप मोठा भाग अण्णासाहेबांच्या वडलांनी घडवला. छापखाना, वृत्तपत्र, लोकजागृतीच्या चळवळात धार्मिक, सामाजिक व राजकीय

सुधारणा इत्यादी त्यांनी केलेच. पण संशोधकाला साजेसे क्षत्रियांच्या इतिहासाचे लेखन, नव्या विचारांच्या पोथ्याही त्यांच्या वडलांनी—काशीराव बापूंनी लिहिल्या. शब्दांचे व्युत्पत्तिशास्त्रदेखील त्या काळात त्यांना किती अवगत होते ते त्यांच्या ग्रंथातून प्रगट होते. शेतकरीसमाजातले वर येऊ पाहणारे अनेक तरुण आज या प्रदेशाचेच नव्हे तर देशाचेही मान्यवर पुढारी म्हणून गाजताहेत. त्यातील कितीकांचे उगवतेपणीचे कौतुक काशीराव बापूंनी केले. आपला मुलगाही त्यांनी असा देशकार्यी वाहला. ते शेवटचे आजारी पडले आणि वारले तेव्हा अण्णासाहेब थोड्या दिवसांसाठी आले ते जेलमधून! थोर पित्याचा हा थोर मुलगा. त्या काळी वडलांना आवश्यक वाटणारी ब्राह्मणेतर चळवळ श्री. पी. के. यांना आकर्षक वाटली नाही. कै. वामनरावांच्या बैठकीतले हे अण्णासाहेब. पण चळवळ पटली नाही म्हणून त्यातल्या व्यक्तींचा त्यांना राग नाही. मंत्री असताना कोणीसे त्यांना सांगितले, " मोर्शीचे ब्राह्मणेतर पुढारी श्यामरावजी अत्यवस्थ आहेत." अण्णासाहेबांनी तात्काळ त्यांची योग्य ती विचारपूस केली. त्या श्यामरावजींची विधवा पत्नी कालपरवा त्यांना भेटली तेव्हा तिला 'आपले घर समजून येथेच राहा' ही विनंती त्यांनी केली.

विदर्भाचा पुढारी मुंबईच्या 'सह्याद्री' बंगल्यात राहण्याची आवश्यकता नसताना महाराष्ट्रावर प्रेम करण्याची शक्यता कमीच. पण भाषणे, चळवळी यांचा गाजावाजा न करता अण्णासाहेबांनी महाराष्ट्राची बाजू राखली. नागपूरला शंकरराव देवांवर स्टेशनात हल्ला झाला होता. तेव्हा अण्णासाहेब भावी अशुभचा वास आल्यासारखे तेथे गेले. मंत्री या नात्याने त्यांनी शरीरसंरक्षकदेखील सोबत नेले नाहीत. त्या क्रुद्ध गर्दीतून देवांना सुरक्षित ठिकाणी पोचवताना ते जिवावर उदार होऊन वादळाशी झुंजत होते.

अण्णासाहेब मंत्री नाहीत. राहू शकले असते का? पण यातले काही विचारण्याचे धाडस मी तरी केले नाही. कुठली तरी सन्माननीय जागा त्यांना सरकारने देऊ केली होती म्हणे. त्याबद्दल त्यांना एक दिवस मी विचारले. " यावर मी न बोललं तर चालेल का?" त्यांच्या या प्रश्नामुळे मग पुढचे बोलणे मिटले. पण त्याच बैठकीत त्यांनी पुढे एकदा म्हटले, " मोरारजींनी तिसरी जागा नाकारली याबद्दल मी त्यांचं नुकतंच अभिनंदन केलं."

मंत्री नसले तरी कुळकायद्यापासून तर इतर अनेक महत्त्वाच्या बाकीच्या

बारीकसारीक मुद्द्यांपर्यंत असेंब्लीतले सभासद त्यांची मते मोलाची मानतात. कायदे करण्याचा, अमलात आणण्याचा या प्रदेशातला सर्वांत जुना अनुभव त्यांचा. आजही त्या दारातल्या खाटांवर बदलत्या कायद्यांची, बिलांची अद्यावत माहिती देणारी कागदपत्रे सज्ज असतात. पुढील निवडणुकीत पुन्हा निवडून येण्याचे सवंग प्रयत्न करण्याच्या धोरणापेक्षा असेंब्लीच्या कामात इतका रंगून नव्हे रुतून जाण्याचा त्यांचा बाणा पाहिला म्हणजे वाटते हे थोर व्यक्तिमत्त्व असेंब्लीसाठीच जन्माला आले आहे.

अण्णासाहेबांच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल अधिक काही सांगणारा एक प्रसंग परवा घडला.

एका शनिवारची ती रात्र. दहा सव्वादहाच्या सुमारास एक मुलगा धापा टाकीत त्यांच्यासमोर उभा झाला. कसेबसे शब्द जुळवीत त्याने सांगितले, " अण्णासाहेब, बंडूला अपघात झाला आहे. इरवीन अस्पताला — " त्यांनी त्या वार्ता सांगणाऱ्याकडे क्षणभर शांतपणे पाहिले. समोरच्या रिक्षात पाय ठेवीत ते आजूबाजूच्या लोकांना म्हणाले,

" त्याच्या आईला काही सांगू नका. ती आजारी आहे. "

दवाखान्यापर्यंतच्या संपूर्ण रस्ताभर अण्णासाहेब त्या रिक्शाचाच एक भाग बनल्यासारखे शांत बसून होते. कुठल्या तरी ताकदीच्या जोरावर दवाखान्याच्या पायऱ्या चढले. जखमी पुत्राला उपचारासाठी टेबलावर घेण्यात आले होते. तोंड भरून ' अण्णासाहेब ' म्हणणारे, बोबड्याबोलापासून भाषणे देण्यापर्यंत वाट चाललेले त्या कर्त्या पोराचे ओठ फाटले होते. वडलांच्या ओठांचे छापे जपणारे गाल, ते सारे गोड पापे चिंधडले होते. रक्त उसळून झरत होते. डोक्याच्या भयंकर जखमेमुळे कानातून रक्त सांडत होते. बापाला एकदम घेरी आली. दवाखान्याच्या कर्मचारांनी त्यांना लगतच्या खोलीत हालवले. वैदर्भीय समाजाला वेळोवेळी धीर देणारा, स्वातंत्र्य चळवळीत अनेकदा मृत्यूला सामोरा गेलेला तो पुरुष पुन्हा आपले कवच धारण करून सावरून बसला. अतिशय शांतपणाने एकेक शब्द बोलत ते म्हणाले, " मी याहून गंभीर प्रसंग पाहिले आहेत. तोंड दिलंच पाहिजे त्या सर्वांस. " सोबतच्या लोकांजवळ अर्थातच त्यावर शब्द नव्हते. दै. हिंदुस्थानचे श्री. मराठे आपल्या या निकट मित्राला पुन्हा पुन्हा सांगून फसवण्याचा प्रयत्न करीत होते, " सिविल सर्जन त्याला नक्कीच वाचवतील. तेच

सध्या त्याचं ऑपरेशन करीत आहेत. " पी. कें. चा त्या आशावादी बोलण्यावर भरवसा बसत होता आणि नव्हताही. जन्ममृत्यूच्या बातम्या सारख्याच निर्विकारपणे छापणाऱ्या त्या संपादकाला आज तसा तिऱ्हाईतपणा जमत नव्हता. स्वतःची व्यथा झाकण्याचा फुसका प्रयत्न करीत ते पी. कें. मधल्या पित्यास धीर देत होते.

पी. के. त्या वेळी म्हटले तर शांत होते. म्हटले तर अत्यंत वादळात होते. बोलताना एकेक शब्द नाण्यासारखा खणखण वाजत होता. त्यांनी त्या वेळी तरी आपल्या हिमतीच्या देखाव्याने आम्हांला फसवले. खोटा आशावाद दाखवून एकमेकांना फसवण्याची ती अजब स्पर्धा होती. राजकारणात मुरलेली ती जीवने गोंधळल्यासारखी आज स्वतःवरच उलटत होती. इतक्यात अॅनेस्थेशिया ऑपरेशनसाठी संमती मागायला डॉक्टर आले. पी. के. अत्यंत हिमती चेहऱ्याने एकेक शब्द लिहू लागले. हात अडखळू लागला. पुन्हा त्यांना शरम वाटली. मग काहीतरी निमित्त म्हणून ते डॉक्टरांना शब्दांचे स्पेलिंग विचारू लागले. त्यांना स्पेलिंग अडणे हा धडधडीत खोटेपणा होता. असेंब्लीतल्या ज्यांच्या इंग्रजी भाषणाची टाइम्सने तारीफ करावी तो माणूस साध्या साध्या शब्दांवर अडावा !

शस्त्रक्रियेचा अवधी संपता संपत नव्हता. तो तास सव्वातास निदान दोन वर्षांचा असेल. मिनिटे वाढत होती आणि त्याचबरोबर गर्दीही. इतक्यात कोणा दोघा सज्जनांनी एक शरीरभर लटपटणारी आजारी बाई आधार देत तेथे आणली. एकमेकांचे न जुमानणारी गर्दी तेव्हा मात्र एकदम बाजूला सरली. ती बाईही तेव्हा शांत होती. शांत— पी. कें. सारखी. शांत—त्या निर्जीव इमारतीसारखी. शल्यकर्म संपवून पोराला बिछान्यावर नेत होते. ती तिकडे जायला लागली. आणि मग अण्णासाहेब तिच्याकडे वळले. जवळच्या कोणाला तरी म्हणाले, " तिला इतक्या लवकर कसं कळलं ? छे कळायला नको होतं. " मुलाच्या आईला वाटेल तितके असत्य सांगून पी. कें. नी तिचा हंबरडा रोखला. तिला घरी नेण्यासाठी ते लोकांना घाई करू लागले.

उपचार, धावपळ, मनाचे हेलकावे यात मिनिटे आणि तास संपत होते. अण्णासाहेबांनी मग एकदोघांना जवळ बोलावून अपघाताचे वृत्त ऐकून घेतले. आपण इतके तिऱ्हाईत झाले की सांगणाराला वाटावे जणू काही परका माणूसच सहज उत्सुकतेने ते सारे ऐकत आहे. रात्र काढायला राहिलेल्या लोकांची बसण्याची, निजण्याची व्यवस्था करण्याची त्यांची वृत्ती तेव्हा साजत नव्हती

प्रत्येकाला कसेसे वाटत होते. त्यांचा दुःख गिळणारा मोठेपणा आम्हाला असह्य होत होता. पण त्यांना काही सांगण्याबोलण्याची हिंमत एरवीच या शहरातील लोकांजवळ कमी. त्यातून हा प्रसंग. जो तो खचलेला. शेवटी रामदयाळ, मराठे इत्यादींनी त्यातल्या त्यात मन पक्के केले. एक सतरंजी आंथरून तीवर पी. के. यांना जबरदस्तीने निजविले. तिकडे मृत्युशय्येवर अखेरच्या क्षणांशी लढत देणारा पोरगा व इकडचे सतरंजीवरचे अण्णासाहेब—जबरदस्तीने निजवलेले—आणि गांधी चौकातल्या भकास भव्य घरात तळमळणारी ती आई! त्या तिघातले कोण सुटणार आणि कोण उरणार याचा अंदाज येत नव्हता. मरणारा सुटणार होता. उरलेले लोक ते मरण भोगणार होते. खरेच जिवंत माणसांइतकी मरणाची व्यथा कोणालाच होत नाही.

पेशन्टचे चढउतार चालू होते. मुळीच न घेतलेल्या झोपेतून पी. के. जरा वेळाने जागे झाले. यम पराभव पावल्याच्या खुणा हळूहळू साकारत होत्या. अण्णासाहेब तडक उठले, घरी गेले. तोंड धुऊन जरा ताजेतवाने होत नाहीत तो प्रकृती जराशी बिघडल्याचा निरोप आला. अशा वेळी ‘ जराशी बिघडणे ’ या शब्दाचा अर्थ त्यांना कळत होता. आपणहूनच त्यांनी मुलाच्या आईला तिकडे नेण्याची व्यवस्था केली. स्वतः आले. पेशन्टच्या सुजलेल्या अनोळखी तोंडाकडे पाहून त्याच्यातला आपला पुत्र ते शोधू लागले. बावीस वर्षे घडवलेल्या चेहऱ्यात काही ओळखीचे कण आढळतात काय म्हणून ते क्षणभर तेथे थांबले. त्या वेळी त्यांना धीर देण्याचा मूर्खपणा कोणीच केला नाही. दुःख स्वतःचं इतके मोठे होते की त्याने रडे येणे शक्य नव्हते. पी. कें. नी त्या श्वास थांबलेल्या चेहऱ्याकडे पाहिले. एकेक पाऊल वधस्तंभाकडे टाकल्यासारखे चालत बाहेर आले. समोर उभ्या दिसलेल्या पहिल्या माणसाला जवळ बसवीत ते म्हणाले,

“ बंडू झाला तेव्हा मी जेलमध्ये होतो. ”

दूरदूरच्या प्रदेशाकडे टक लावून पहात व नजरेने वीस वर्षांपूर्वीचा काळ पकडीत तिथे स्मृतीत हरवले. स्वतःशी बोलले, “ बेचाळीसचा कुठला बरं तो महिना ? डिसेंबर ! डिसेंबर ! तेव्हा तुरुंगात वार्ता आली मुलगा झाल्याची, पहिलाच मुलगा म्हणून सर्वांनाच आनंद वाटला होता. ”

त्यांना पुष्कळ बोलायचे होते. मन बोलू पहात होते तेव्हा जीभ अडत होती. जीभ राजी होती तेव्हा मन शून्य होत होते. एखाद्या तिऱ्हाइताशी बोलावे तसे

ते स्वतःला म्हणाले, "माझ्यावर ही संकटांची साखळी का कोसळावी–कळत नाही. संपूर्ण आयुष्यात पोराकडे लक्ष देऊ शकलो नाही. बाहेरची कामं, मंत्रीपद, निवडणुका— घराकडे केवळ दुर्लक्ष झालं. आता कुठेशी त्याची कर्तबगारी मला दिसायला लागली होती. आपल्या कर्तबगारीकडे बापाचं लक्ष आहे की नाही हेही त्याला कळलं नसेल. एका गैरसमजुतीतच त्यानं मला सोडलं."

प्रसंगाने एका समारंभाचे रूप झपाट्याने घेतले. वादळासारखी गर्दी वाढली. अण्णासाहेबांभोवती थोराथोरांचा गराडा पडला. त्यात स्वकीय होते, राजकारणातले विरोधीही होते. दवाखान्याचा परिसर ओळखीच्या आणि त्यांना दुरून आदर देणाऱ्या असंख्य अपरिचितांनी भरून गेला. कलेक्टर आले. मंत्री खेडकर त्यांच्या खांद्यावर हात ठेवून स्पर्शाच्या माध्यमातून बोलू लागले. कोणी आसवांच्या भाषेतून. मोठमोठ्यांना रडताना पाहात स्वतः पी. के. एका खुर्चीवर बसले होते. अनेक थर जीवनात आले. अनेक पदे आली गेली. काही त्यांनी स्वतः नाकारली. त्यांच्या अपयशाची हेटाळणी, दुःख, यशाचा गौरव–काहीही त्यांच्यासमोर करण्याची हिम्मत कोणाला झाली नाही. सर्व सुखदुःखे एका सिंहाची होती. आज तो सिंह वाकून एका खुर्चीवर बसला होता. खूप म्हातारा दिसत होता. न रडण्याबद्दल स्वतःच्या डोळ्यांना दरडावत होता. हात बिचारे चष्म्याच्या काचा पुन्हा पुन्हा पुसत होते. बरोबरीचा मुलगा या वयात गमावणारे ते अण्णासाहेब त्या वेळी असे दिसत होते. कोणालाच खऱ्या अर्थाने पुरेसे दिसत नव्हते. स्वतःलाही नाही.

मंत्रीपद सोडून आलेले अण्णासाहेब तेव्हा पाहण्याची इच्छा होती. दिसले नव्हते. आता पुत्र गमावलेले अण्णासाहेब दिसले. दोन दृश्यात काही साम्य असेल का?

# सौ. कुसुमावती देशपांडे

परवा एक धक्का बसला. नात्यागोत्याचे कोणी वारल्याच्या वार्ता मी फार थोड्याच अनुभवल्या आहेत. आणि तशा त्या अनुभवल्या तरी त्यामुळे होणारे दुःख परंपरेतले असते. त्या दुःखाला नात्याचा आधार असतो. रक्ताचे स्पष्टीकरण असते. जीवन अनेकदा तीव्र वाटते; पण ते जेव्हा आकलनीय होते तेव्हा त्याची तीव्रता कमी होते. विशेषतः दुःखाची मात्रा कमी होण्यास तशा आकलनाची फार मदत होते. जीवन हे असे आहे, ते तसेच असते हे कळले की, त्यातली सुखदुःखे तिऱ्हाईत होतात. ती निश्चित होतात. त्या निश्चित दुःखांना रक्ताच्या गोताचा अर्थ चिकटला की मग ते रडणेही सुसह्य होते. पण परवा मरणाची बातमी ऐकली तेव्हा असे काही झाले नाही. औपचारिकतेची बंधने झुगारून खरेखुरे दुःख उमाळून आले. रडण्यासाठी रक्ताच्या नात्याचा एखादा आधार शोधू लागले. कुसुमावतीबाई माझ्या कोणीच नव्हेत. त्यांच्या मृत्यूसाठी शोक करायला मन अधिकार शोधू लागले. नाते हुडकू लागले. हिंदु मनाला बादरायण संबंध शोधण्याचा फार छंद आहे. त्याला तो खटाटोप साधतोही. मला बाईशी तशी नाती तडफड मिळालीही. माझ्या रक्ताच्या गोतात येत नसल्या तरी मानलेल्या नात्याची उतरंड मला रचता आली. माझे आवडते शिक्षक डॉ. मा. गो. देशमुख यांच्या त्या मानलेल्या भगिनी. आणि स्वतः बाईही मला भाच्यासारखाच मानीत. अशा मानलेल्या संबंधातून वाहायला मात्र माझे दुःख राजी नव्हते. नाते जमत नाही तिथे जात उपयोगी पडते. पण बाई जातिभेदाच्या पार गेल्या होत्या. ऐन

तारुण्यात आपली कर्तबगारी फळवण्यासाठी जात पुढे करणाऱ्या पिढीत त्या बाईंनं एका ब्राह्मणाशी विवाह केला. लोक जेव्हा ' मानवता ' असा नुसता घोष करीत होते तेव्हा बाईंनी प्रत्यक्ष कृती केली. एका मानवतावादी कवीच्या गळ्यात बाईंनी होतकरू बुद्धिमत्तेची, कर्तबगारीची माळ घातली. त्या तशा बाईंजवळ ब्राह्मणेतर असल्याच्या आधाराने संबंध स्थापणे आणि तेवढ्या खोट्या आधाराने आपुलकी आणणे हेही माझ्या आसवांना जमत नाही. दुःखाला आधार मिळत नाही. तरीही ते प्रगट होऊ पहात आहे. त्याला राहवत नाही; आणि म्हणूनच असा दीडदोन महिन्यांचा अवधी लोटूनही बाईंच्या मृत्यूची वार्ता तीव्र आहे.

कथाकार शांताराम परवा सहज म्हणाले, " कुसुमावतीबाई गेल्या. त्या गेल्यानं नक्की कोणता तोटा झाला ते अजून मला कळलं नाही. अमकी उणीव तमकी उणीव अशा कितीतरी उणिवा नजरेसमोर तरमळू गेल्या. त्या खऱ्याही आहेत. पण त्या सर्व उणिवांना स्वतःचं असं वैशिष्ट्य आहे असं म्हणवत नाही. अनेक लोक असेच बाईंप्रमाणेच जातात. त्यांच्या बाबतीत दुःखाला हीच कारणं असतात. पण बाईंबद्दलचं माझं दुःख हे आहेस मला पटत नाही. काहीतरी वेगळं कारण त्या दुःखात लपलं आहे."

शांताराम हे कुसुमावतींच्या वाङ्मयीन आप्तांपैकी एक आहेत. निकटचे आहेत. ते बाईंचे इंग्रजी विषयाचे विद्यार्थीही होते. त्या गोष्टीचा ते गौरवाने अनेकदा उल्लेख करतात. एक विद्यार्थी व वाङ्मयीन समकालीन या दोन नात्यांच्या पलिकडे शांतारामांचे बाईंबद्दलचे दुःख आहे. त्या दुःखाची अनाकलनीयता त्यांनी मांडली. उत्तर हुडकून जे काही गवसले. तेही त्यांनी मांडून पाहिले. ' मला वाटते बाई गेल्या त्यानं सर्वांत नुकसान वऱ्हाडी लेखकांचं झालं. वऱ्हाडेत्तर व वऱ्हाडी यांच्यातला इतका घट्ट दुवा आता शोधून मिळणार नाही, म्हणजे दुवा हरवल्यामुळे जे वऱ्हाडचं तेच इतरांचंही नुकसान झालं. मीही त्यावर विचार करतो तेव्हा ते पटते. परप्रांतीय मंडळीत परिचय असलेले काही साहित्यिक विदर्भात आजही आहेत. साहित्यिक या नात्याने ते या नात्याने काही प्रमाणात बाईपेक्षाही अधिक प्रभावी आहेत. त्यांचा बोलबालाही जुना व टिकाऊ आहे. पण त्या दमदार मंडळीत कोणाला हात देण्याची वृत्ती फारशी नाही. त्यासाठी लागणारी तृप्ति त्यांच्यात नाही. कुसुमावतींनी दहा गाढवांचे दहा घोडे बनवले किंवा भासवले हा अर्थ अर्थातच येथे अभिप्रेत नाही. पण आज वाण आहे ती घोड्या-

लाही घोडा म्हणणारांची. या पिढीला तर बाई सर्वच बाबींनी वडील होत्या. पण त्यांच्या काळच्या लेखकमंडळींच्या आठवणीतही बाईची प्रसिद्ध होण्याची वखवख नसेल ही खात्री आहे. मिळाले त्यात बाई तृप्त असत. त्यांचा घास कोणी नाकारला असेल. त्यालाही त्या तृप्त शांत डोळ्यांनीच पाहात होत्या. याच वृत्तीमधून लहानांना उचलून धरण्याची वृत्ती जन्म घेऊ शकते.

एक साधे उदाहरण मला त्यांच्या वृत्तीबद्दलचे आठवते. दोन वर्षांपूर्वी मी दिल्लीत त्यांना भेटलो. पायलींची चळत समोर असून देखील बाईंनी माझी सर्व चौकशी केली. मी त्यावेळी अडचणीत होतो. अतृप्त होतो. ठरविले प्राध्यापक व्हायचे आणि झालो मास्तर. असा मी 'Angry man' होतो. काहीतरी हिसकावून घ्यावे अशा आवेशात बाईंना मी सांगून टाकले की, नुसते एम्. ए. झाल्याने मला प्राध्यापकी मिळाली नाही. न मिळू दे. मी आता पीएच. डी. होणार. त्यासाठीं उघड उघड दरोडा घालणार. बाईंनी कादंबरी वाङ्मयावर लिहिलेली पुस्तके पीएच. डी. च्या लायकीची आहेत. त्याच मेथडस् वापरून मी कसले तरी दिखाऊ श्रम करणार व पीएच. डी. लाटणार. माझा हे सर्व सांगण्यात आग्रह पुन्हा असा होता की, बाईंच्या श्रमाची व प्रज्ञेची सहीसही कॉपी केल्यानंतरही त्यांनी माझ्यावर आक्षेप घेऊ नये. बाई त्यावेळी फारच उदार हासल्या. इतके सुंदर हंसताना मी कोणालाच पाहिले नाही. मेणबत्त्या चोरणाऱ्या माणसाकडे पाहून बिशप हासतो असा अभिनय आहे की नाही ते ठावे नाही. पण तो असेल तर बाई तशा हासल्या, हे नक्की. त्यांच्या उत्तम वाङ्मयातूनही काही अंशी उमटायचे उरलेले त्यांचे विशाल व्यक्तिमत्त्व असे जीवनाच्या लहान-सहान कणातून आढळून येई, त्याचा तो एक प्रत्ययच होता. त्यांनी त्याच हासण्यातून एक धक्का देणारी गंमतही त्यावेळी सांगितली. त्या म्हणाल्या, "तुम्ही एम्. ए. आहात ना! मग तुम्ही म्हणता तसा माझ्या मेथडस्चा व श्रमाचा उपयोग तुम्हांला निश्चित होईल. एक मात्र सांगून ठेवते, मला स्वतःला काही त्या कादंबरीवरील भाषणांचा पीएच. डी. साठी उपयोग झाला नाही."

"म्हणजे कोणा विद्वानाला तुमचं कार्य त्या दृष्टीनं तितकंसं योग्य वाटल नाही काय?" माझ्या या विचारण्यात बरीच मोठी धाकधुक होती. आपल्या दृष्टीने बाईचे कार्य कितीही मोठे असले तरी विद्वान नावाच्या प्राणिजातीस ते कमी मोलाचे वाटत असेल तर मग आपण त्यावर डाका घालाच कशाला? दुसरा

विचार असा की, आपल्याला जर बाईंचे विचारधन पदवीच्या साद्यासाठी अनुपयोगी असेल तर बाईनाच त्यावर पीएच. डी. व्यायचा आग्रह करणे बरे! पण बाईंनी उत्तर दिले ते मोठे गंमतीचे होते. गंमतीचे आणि विद्यापीठाची चीड आणणारेही. बाईंची इंग्रजी विषयातली पदवी व त्यांची योग्यता मान्य करूनच नागपूरच्या सरकारी कॉलेजात त्यांना प्राध्यापकी दिली गेली होती. पण त्यांची पाश्चात्य पदवी पीएच. डी. साठी मात्र एम्. ए. च्या तोलाची ठरत नव्हती. अर्थात् बाई हे सांगताना हासत होत्या. त्यांना त्याचे काहीच नव्हते.

बाई नागपूरला इंग्रजीच्या प्राध्यापिका होत्या त्या वेळी माझा त्यांचा परिचय नव्हता. तेव्हा मी शाळकरी मुलगा होतो. प्राध्यापिका व लेखिका या दोन कारणांनी मी त्यांना थोडाफार ओळखत होतो. ही ओळखही एकतर्फी आणि अंधुक होती. अनेक प्राध्यापक व लेखक यांच्या गर्दीत बाई माझ्या मनात कुठेतरी उभ्या होत्या. पण एकदा आमच्या अभ्यासक्रमात बाईंचा एक धडा होता. त्या वेळी आमच्या दृष्टीने लेख लिहिणाऱ्यापेक्षा 'धडा' लिहिणारे अधिक मोठे होते. धड्याच्या आरंभी अभ्यासमंडळाच्या नियमांनुसार लेखकाचा परिचय छापलेला असे. बाजूलाच बाईंचा एक फोटो छापला होता. त्या फोटोत त्यांच्या चष्म्याशिवाय काहीही स्पष्ट उमटले नव्हते. धड्याचे नाव होते 'साधारणांचे कार्य.' धडा शिकविणारे मास्तर वाङ्मयाचे चहाते होते. तो धडा शिकविल्यावर मी भारावून गेलो. संपूर्ण धडाभर माझ्या सामान्य मनाला कोणीतरी जवळचे माणूस हिताचे गुणगुणत आहे असा भास होत होता. उचलखाऊ पण भित्रे, धडपडणारे पण जखमी असे ते माझे चौदापंधरातले मन त्या धड्यातून एक आपुलकीचा दिलासा अनुभवत होते. स्वतःला साधारण समजून स्वस्थ बसू नये. साधारण मंडळींनीच अनेक महत्त्वाच्या कृती केल्या आहेत. वेरूळची खोदचित्रे, आणखी कितीतरी विशाल रचना या साधारण माणसांनी केल्या इत्यादी अनेक साक्षी परोपरीने देऊन कुसुमावती बाईंनी तो धडा रंगवला होता. कुठल्या तरी शाळेच्या स्नेहसंमेलनप्रसंगी दिलेल्या भाषणाचा तो लेख–धडा होता. नुसते एखादे वाङ्मय वाचून लेखकाविषयी अत्यंत जिव्हाळा स्थापन होण्याची ती माझी पहिली वेळ. लिहिणारी बाई आपल्याशी बोलत आहे, उद्या आपण तिला भेटलो तर ती आपणास सहज ओळखेल. समजा, न ओळखले तर आपण नुसते इतके म्हणण्याचा अवकाश, 'तुम्ही त्या धड्यातल्या बाई ना? आम्ही कालच तर

धडा शिकलो. तुम्हीच नाही का त्यातून आमच्याशी बोलला!' की ती लगेच आपणास 'बस बाळ' म्हणेल इत्यादी खात्र्या माझ्या मनात जमू लागल्या. नंतर काळ लोटत राहिला. मी बी. ए. च्या वर्गात असेपर्यंत मग बाईंची फारशी आठवण मनाला रहाण्याचे काहीही कारण उरले नाही. वाढत्या वयाला एक आत्मसन्मानाचे लेणे चढले. कोणीतरी काहीतरी एखादे उपदेशी भाषण लिहावे, त्याचा धडा व्हावा आणि मी त्याने भारावून जावे हा बाळबोध वळणाचा सरळपणा नंतर नंतर पुसत गेला.

मी त्या धड्याने भारावून जाण्याचा क्षण मात्र मोठाच चिवट व चिरंजीव होता असे दिसते. भारावूनच जायचे तर गांधींपासून रसेलपर्यंत अनेक थोर लोक बी. ए. च्या अभ्यासक्रमात होते. व ते थोर परके असतील तर नित्याच्या जगातले जवळचे विद्वानही अमाप होते. जीवनावरही तोपर्यंत विविध संस्कारांची अनेक पुटे चढली होती. तरीही तो क्षण जगला. हजार अनुभवाच्या ढिगाखालीही तो न विझवता जगला. आणि अमरावतीला आमच्या कॉलेजच्या युनियनच्या उद्‌घाटनासाठी संभाव्य पाहुण्या-अध्यक्षांची यादी करायला बसलो, तेव्हा एकदम तो क्षण जिवंत झाला. अभान ओठातून नाव सुचवले गेले, 'सौ. कुसुमावती देशपांडे.'

बाईंना मग रीतसर आमंत्रण गेले. पत्रे-स्मरणे आदी झाले. शेवटी त्यांना येथे येण्याची प्रत्यक्ष विनंती करण्याच्या कामगिरीवर माझी योजना झाली. मी तेथे गेलो तेव्हा रात्र पडली होती. बाई धनतोलीतल्या त्यांच्या बंगल्याच्या पुढच्या भागात मला भेटायला आल्या तेथेही मिणमिण दिवा होता. पूर्वी धड्यात पाहिले तितकेच त्यांचे प्रत्यक्ष चित्रही अस्पष्टच होते. छायाचित्रातला चष्मा ओळखीचा होता. तोही त्या वेळी लावला नव्हता. बाईंचा सामाजिक दर्जा व माझा अपरिचितपणा ह्यांनी मी पुरता भांबावून गेलो होतो. ती धड्यातली ओळखही या वयात अपुरी, थिटी वाटत होती. डॉ. देशमुख व पुरोहित यांच्या नावांचा आधार मला दरवेळी घ्यावा लागत होता. बाई न येण्याचे एकेक कारण सांगत होत्या आणि मी अक्षरशः खचत चाललो होतो. पण बाईंचे व्यक्तिमत्त्व मला खचवणारे जसे होते तसेच त्यांच्या साध्यासिध्या वागण्याबोलण्यातून मला कुठला तरी धीरही मिळत होता. त्यामुळेच मी धरणे धरून बसल्यासारखी बैठक

मारून आमंत्रणाचा स्वीकार झाल्याशिवाय मुळी उठणारच नाही असे त्यांना बजावले. बाई अमरावतीस आल्या.

तेथून मी माझ्या मते बाईशी घनिष्ठ ओळख गृहीत धरली. मोठ्या माणसाशी ओळखी करायला मन धजत नाही. माझ्या बाबतीत नेहमीचा प्रकार असा आहे की, जेथे माझे व्यक्तिमत्त्व समोर बसलेल्या व्यक्तीच्या तुलनेने ठेंगणे वाटते तेथे मी चिडून निचून जातो. तो त्या व्यक्तीने तिच्या स्वतःच्या नकळत केलेले माझा अपमान असतो. बाईपुढे मी सदाच ठेंगणा होतो; का कुणास ठावे पण त्यात माझी नेहमीची सल नव्हती. म्हणूनच अट्टाहासाने मी बाई जेथे भेटतील तेथे त्यांना भेटत राहिलो. त्यांचे जे मिळेल ते वाचीत राहिलो.

बाईंच्या व माझ्या एकूण साऱ्या भेटी फार फार तर सहा आहेत. या काही फार नव्हेत. पण माझ्या कल्पनेतली कुसुमावतीबाई संपूर्णपणे साकार व्हायला मला त्या भेटी पुरल्या. केवळ सहा भेटी! पण त्यात मी त्यांच्याकडून पाठ थोपटून घेतली. खाल्ले, भाषण केले, हट्ट केला. क्षमा व पश्चात्ताप हेही केले, माझ्या सुखाच्या बढाया केल्या, दुःखाच्या तक्रारी बोललो—सर्व केले. आजही नवल वाटते, सहा, फक्त सहा भेटीत हे झालेच कसे? आणि हे सर्व होण्याला भूतकाळ आला तो देखील इतक्या लवकर! आता आता तर मी ठरवीत होतो की ग्वाल्हेरच्या संमेलनाबद्दल मी त्यांचे अभिनंदन करीन. शांतारामाकडे त्यांनी माझी पत्राने चौकशी केली होती. दोन वर्षांत मी त्यांना हरवलो होतो. मी काय करीत आहे म्हणून त्यांनी विचारले होते. त्यालाही तर मी आता आत्ताच उत्तर देणार होतो. मग ही इतक्या झपाट्याने बाई गेल्याची बातमी कशी?

दुसऱ्या तिसऱ्या भेटीत बाईंचे व माझे भांडण झाले होते. नागपूरच्या रेडिओच्या कार्यक्रमाच्या मोबदल्याबाबत मी त्यांच्यापाशी हट्ट धरला होता. अर्ध्या हळकुंडाने इतक्या लवकर पिवळे न होण्याचे त्यांनी मला सांगितले होते. मी त्यामुळे कमी नव्हे, अधिक नव्हे चांगला तीन वर्षे त्यांच्याशी फुगलो होतो. त्या मात्र त्याही काळात माझी चौकशी करीत होत्या. खरेच, आज वाटते बाईऐवजी दुसरे कुणी माझी इतकी ऐट चालू दिली असती काय? आपणहून मी शेवटी नमलो. बाई तेव्हा दिल्लीस होत्या. त्यांना मी तेथे पत्र पाठविले. क्षमा मागितली. त्यांचे उत्तर आले. आईच्या हातांनी लिहिलेले: ‘तुम्ही अजून तरुण आहात

या वयात हे असेच होत असते.' आणि उदारपणाने त्यांनी त्या प्रकरणावर पडदा टाकला.

बाई एकदा यवतमाळला भेटल्या. विदर्भसाहित्य संघाचे अधिवेशन होते. अनिल अध्यक्ष होते. मी बाईंशी फुरंगटलो होतो त्याच काळातली ती घटना असल्याने मी बाईच्या दूर दूर पण कसल्यातरी ओढीने त्यांच्या अवतीभवतीच असा फिरत होतो. बाईंनी हांका मारल्या. भांडणाबद्दल काहीही शब्द काढला नाही. फक्त म्हटले, "तुम्ही आप्पासाहेबांशी भेटला?"

मी नकाराने मान डोलावली. आप्पासाहेबांशी भेटावे असे फार वाटत होते. विद्यार्थीपणातला पुढे पुढे करण्याचा बाणा ताजा होता. आप्पासाहेब विदर्भ साहित्य संमेलनाचे अध्यक्ष. म्हणजे मोठा माणूस! त्यांच्याशी कसे भेटावे हाच तर मोठा प्रश्न होता.यशवंतराव चव्हाण वगैरे मंडळीतून आमच्या वाट्याला आप्पा-साहेब येणे हे कठीणच होते. बाईंनी आप्पासाहेबांना माझा परिचय करून दिला.

'अवतीभवती आणि दूर' याच मनोवस्थेत मी मालवणच्याही संमेलनास उपस्थित राहिलो. बाई दिल्लीला असल्यामुळे त्यांच्याबद्दल ओढ असूनही त्यांना भेटणे जमत नव्हते. पण जर मालवणला गेलो तर बाई तिथे येतील ही आशा होती. आप्पासाहेबच तेथेही अध्यक्ष होते. तेव्हा गावचा अध्यक्ष म्हणून आम्हाला तेथे खूप मिरविता आले असते. शिवाय अध्यक्ष जर आपली ओळख विसरले असतील तर बाई मदतीला होत्याच.

मालवणला बाईंशी भेटण्याचा व बसण्याबोलण्याचा योगच फारसा आला नाही. अनेक नामवंत साहित्यकांनी त्या वेढलेल्या असत. खूप धडपड केली पण व्यर्थ. शेवटी त्यांचा जाण्याचा दिवस आला. अतृप्त मनाने मी धक्क्यावर गेलो. बाई पडावात बसण्याच्या तयारीत होत्या. तेथेही ही गर्दी! तेथेही त्या वेढलेल्या होत्या. दूर उभे राहण्यापलीकडे तेथे माझ्या वाट्याला काहीच येणार नव्हते. मी हारपल्या पोरासारखा चेहरा करून भिरभिर पहात होतो. आपण होऊन पुढे होण्याला माझ्या परीचे रेडिओ प्रकरणीचे भांडण मागे खेचत होते. स्वाभिमान आडवा येत होता. येथेही बाईंनीच पुढाकार घेतला. स्वतःहून त्यांनी मला हाका मारल्या. कधी जाणार, कुठे जाणार ही चौकशी केली. हातातला पुडा फोडला. त्यातले काजू देऊ केले. मी एकेक काजू खात समोर पाहात होतो. बाईंचा पडाव बोटीजवळ पोचला होता.

आणि शेवटी भेटलो ते दिल्लीत. बाईंचा स्वभाव व व्यक्तिमत्त्वच असे की कोणत्याही धडपड्या जीवाला आपल्या अडचणींना कारण बाईच आहे असे वाटावे. इच्छेविरुद्ध मास्तर झालो त्या क्षणापासूनच मी बाईंवर चिडलो होतो. माझ्या नोकरीपाण्याची व्यवस्था बाईंनी का करू नये ? वास्तविक त्या वेळपर्यंतच्या दुराव्यामुळे व भांडणामुळे त्यांच्यापासून त्या अपेक्षा मी ठेवायला नको होत्या. पण मन तशातही वेडनावाला बाईंशी नाते लावीत होते. बाईवर अधिकार सांगत होते. सर्वांच्या नोकऱ्यांचा व कौतुक करण्याचा बाईंनी ठेका घेतला नाही हे मनाला हजारदा पटे. शिवाय बाईंना तसे करणे हे अशक्यही होते. पण बाई ह्या आपल्या घरच्याच वडील माणसातून कोणीतरी आहेत. मी त्यांच्याशी बरा राहात नसलो तरी त्यांनी माझ्यासाठी काही करावे हे मात्र काही केल्या मनातून जाईना. लौकिक दृष्ट्या अत्यंत लहानशा परिचयातून इतक्या अपेक्षा मी का उभारल्या त्याचे उत्तर मला अजून मिळाले नाही. पण त्यांचे प्रेमळ व्यक्तिमत्त्वच त्या आपत्तीस कारण होते. त्यांनी साधारणांशी लावलेली जवळीक, आमची केलेली चौकशी ही व्यासपीठी किंवा औपचारिक नव्हती याचा प्रत्यय अनेकदा येई. म्हणूनच माझे ते चिडणे घडे. त्यासाठीच मी दिल्लीस जाण्याचा योग आल्याबरोबर भेटण्याची संधी साधली.

बाईंनी मला तेथे बराच उपदेश केला. त्याआधी मी पत्रातून माफी मागितल्याने माझे एकतर्फी भांडण तसे पाहिले तर निवळले होतेच. बाई भेटल्या तेव्हा एक वेगळीच जाणीव मला झाली. मी माझ्या लहान नोकरीवर नाराज होतो. बाई आपल्या उच्च नोकरीवर नाखूष होत्या. आपल्या मातीत, आपल्या माणसात राहण्याची त्यांची इच्छा त्या बोलत होत्या. ‘ तू इथं यायचं म्हणतोस आणि आम्हांला ओढ आहे वऱ्हाडची. नोकरी संपत आली आहे. आता अगदी निवांतपणे वऱ्हाडात रहायचं म्हणते आहे. ’

बाई खऱ्याखुऱ्या वैतागाने जीवनाच्या धकाधकीबद्दल बोलत होत्या जीवनाच्या ऐन संध्याकाळी हरवलेला त्यांचा बरोबरीचा मुलगा, फर्ग्युसनच्या टेकडीवर घालविलेले वाङ्मयीन व प्रणयी यौवन, नागपूरच्या कॉलेजजीवनात वागडणारे मुलामुलींचे वातावरण, नातीगोती, सारेच त्यांच्या डोळयातून शब्दात उतरत होते. अनेक खालवर, पांढरे–काळे, खुषीनाखुषी यांनी भरलेला स्वजीविताचा व नियतीचा चित्रपट पहात असताना त्यांच्या तेजस्वी डोळ्यावर राल चढत

असल्याचा प्रत्यय येत होता. जीवनातून निसटण्याचा प्रयत्न, निवांत जीवनाची ओढ इत्यादी बोलत असतानाच त्या नकळत समोरच्या फायलींच्या ढिगाऱ्याची चाळवाचाळव करीत होत्या. घराची ओढ त्या ऑफिसातही डोकावत होती. ऑफीस अगदी खऱ्याखुऱ्या घराच्या खुणांनी सजविण्याचा त्यांनी प्रयत्न केला होता. पण नाठाळ पोराप्रमाणे ते ऑफीस तशा खूणा ल्यायला नाखुष दिसत होते. त्या घराच्या ओढीबद्दल बोलल्या त्यातील भावनिक खळबळ मला आज कळते. त्यांच्या मृत्यूने त्या प्रसंगाला निश्चित अर्थ दिला आहे.

ग्वाल्हेरचे अध्यक्षपद व पुण्याला झालेला सत्कार यांच्या बातम्या मी वृत्तपत्रातून वाचल्या. पुण्यात म्हणे त्यांनी म्हटले होते की, या सर्व सत्कारांचा व व्यापाचा त्यांना कंटाळा आला आहे आणि स्वतः अनिलांनी त्यांच्या हाती पेन कोंबून पुणेकरांच्या निमंत्रणाला होकार द्यायला लावला होता. त्या बातमीचा अर्थ मला वाटते आपल्याला एकट्यालाच सर्वांत अधिक कळला आहे. असे वाटते की, त्यांची शेवटची भेट फक्त आपल्याशीच झाली आहे.

बाईंनी दिल्लीत मला घरी नेले. आईने खूप लांबच्या गावी जाताना हाती निरोपाचे दही ठेवावे अशी एकेक वस्तू त्यांनी मला खायला दिली. खूप थकल्या होत्या तरी स्वतः साऱ्या वस्तू बनवल्या. त्यांचे तिथले घर अजूनही डोळ्यापुढे उभे राहते. आप्पासाहेब व बाई या दोघांमिळून कितीतरी प्रदेशा–देशाशी, वातावरणाशी, पेशांशी व संस्कृतीशी जवळीक केलेली आहे. घर कधी मराठी वाटे, कधी तेथे ठेवलेल्या खटुलीसारख्या आसनामुळे हिंदी वाटे. कधी अधिकाऱ्यांचे वाटे, कधी माझे स्वतःचे वाटे.

बाईंनीं उत्तम ललित लेखन केले. कथा लिहिल्या. लघुनिबंध लिहिले. टीकावाङ्मयातही त्यांनी महान भर घातली. आज बाई हे सर्व करून निघून गेल्या. त्यांची सोपी व काव्याने नटलेली शैली पोरकी झाली. खरे म्हणजे या मृत्यूमुळे कदाचित मराठी वाङ्मयाचेही काहीच अडणार नाही. ललित लेखनाचा प्रकार तर बाईंनी आपल्या हयातीतच नव्या जोमदार लोकांच्या हाती दिला. स्वतः संयमा थांबल्या. Old order changeth, yielding place to new हे त्यांनी ओळखले. आपणहून त्यांनी इतरांना संधी दिली. म्हणूनच त्यांच्या मृत्यूचा ललित वाङ्मयाच्या खुरटण्याशी संबंध नाही. टीकावाङ्मयही मराठीत पुन्हा जोमाने फोफावेल. इतका दिलासा देऊनही त्यांच्या जाण्याचा शोक

कमी होत नाही. उत्तम लेखक, यशस्वी संघटक, उदार व आईमय व्यक्तिमत्त्व अशा स्वरूपात बाई माझ्या जगात होत्या. त्यांच्या जाण्यामुळे त्यातले सर्वांत जास्त काय गेले हेच कळत नाही. लौकिक असा एकही धागा न वापरता बाईंनी मला बांधले. असेच कितीकांना बांधले असेल. तसे बांधण्यासाठी जो एक लवचिक व्यक्तिमत्त्वाचा धागा उपयोगी होता तो आमच्यातून गेला--कदाचित माझ्या दुःखाचं न उमगलेले कारण हेही असेल.

नवयुग : ४ फेब्रुवारी १९६२

# माझी माय

आम्हा सर्व भावंडांना मायचा रंग थोडा थोडा लागला आहे. आमची पहिली मायही अशीच ताजस गोरी होती म्हणतात. ती लेकुरवाळी होण्याआधीच देवाने तिला नेले. खडकीवाल्यांची ती एकुलती एक लाडकी पोर; पण त्यांनी पोरगी गेल्याचे दुःख मानले नाही. माझ्या खडकीच्या आजोबाने स्वतः पुढाकार घेऊन जावयासाठी मुलगी शोधली. तीच आमची माय. मायला स्वतःचा भाऊ नव्हताच. पण खडकीवाल्यांनी आपली पहिलीच मुलगी जीवंत आहे, असे मानले. तसेच मग मायनेही तिकडचेच सारे भाऊ, काका, आई मानले. कित्येक दिवस आम्हांला आमचे खरे आजोबा ठाऊकच नव्हते. माय दोन्ही माहेराला, दिवाळसणाला अन आंबरसाला जायची. त्या खडकीच्या आजोबांना मायच्या गोरेपणाचे भलेच कौतुक होते. दादाजींना ते नेहमी म्हणत, "ए बघा, ही लेकरं कशी बन्सी गव्हासारखी उजळ आहेत ! माझ्या अनूचा बरं हा वाण !"

मला मात्र मायेचे गोरेपण कोरांटीच्या फुलासारखे वाटे--सुंदर पण इतर फुलापासून दूर राहिलेले. कोरांटीचे इतके सुंदर फूल लोकांना का आवडू नये याचे अजूनही मला कोडे आहे. माय आणि दादाजी यांचा दुरावा मनात कुठे तरी सलल्यानेच की काय कुणास ठाऊक पण तिच्या उजळ रंगाकडे पाहून मला ती बहरलेली सोनरंगी कोरांटी आठवे. ते काही असले तरी मला मात्र तिच्या हाताच्या लुसलुशीत अन तकाकणाऱ्या ढोपराकडे पाहिले की वाटे ते कलमी आंब्यासारखे खाऊन टाकावे. या अशा शरीराच्या ओढीमुळेच मी चांगला चौथा

वर्ग पास होईस्तोवर तिच्याजवळ निजण्याचा हट्ट धरून असे. तिच्या अंगाशी झोंबले अन आपले अंग रजईत घुसळावे तसे तिच्याशी घुसळले म्हणजे झोप अश्शी लागे ! वाढत्या वयाचा होऊनही मी झोपेत तिच्या अंगाला तोंड लावून चुटूचुटू पिण्याचा प्रयत्न करी. आपल्या भावंडांच्या मानाने ती आपल्या वाट्याला फार कमी आली अशी तक्रार माझे मन सदैव करीत राही. गावातल्या साऱ्या बायका जशा काही माझ्या उण्यावर टपलेल्या असत. एकमेकींना हाका मारताना त्यांच्या लेकुरवाळेपणाचा गौरव करण्याकडे त्यांचा मोठा कल. म्हणून मायला त्यांनी इतरांसारखे अनसूया पाटलीन म्हणून नये. तर काय की, "अवो शकुंतलाची माय !" नाहीतर "अवो भागोतची माय !" अन् आम्ही गेलो वर्धेत वाहात. बाईचे लग्न झाले. ती सासरी गेली. भागोतदादा शहरात शिकायला गेला. मायच्या जवळ मी एकटा राहिलो. आता माय माझी होती. माझी एकट्याची ! पण गावातल्या बायका मोठ्याच हट्टखोर. चुकून म्हणून त्यांच्या तोंडातून 'अवो मधूची माय' असे काही सांडायचे नाही. ते काही असले तरी इतर कोणाहीपेक्षा मला झोपेसाठी माय खूपच खूप मिळाली. पुढे उरले सुरले लहानपण सरले आणि तिला चिकटून झोपणेही गेले. इंग्रजी शाळेच्या गावी कैकदा उशीला माय समजून मी बोर्डींगच्या पोरात हशा करून घेतला. झोपेत मुळी भानच हरपून बसे.

लहानपणी माय जिथे जिथे दिसली ती ती वास्तूच हारवून गेली आहे. आताची माय त्यामुळे परकी वाटते. मोठ्या ओसरीत मायने माझ्यासाठी झोपाळा टांगला होता. मुद्दाम आजोळाहून बोलावला होता. त्या ओसरीचेच आता छप्पर उडाले आहे. नवे करू म्हटल्यातही दम नाही. वर्धेच्या पुराने गाव दरसाल खरडत चालले आहे. भुरुलालाच्या आंबराईकडे नवे गाव बांधले जात आहे. आमचे तिकडचे घर तर बांधूनही झाले. त्या नव्या घरातली माय अन् या जुन्या वास्तूतली माय या दोघी एकमेकींशी जुळत नाही. माझे लहाणपण अन् आताचे हे 'हे 'पण हेही वेगळेच ना ! ती जुनी वास्तू आठवली की मग संपूर्ण माय आठवते.

काकाजींच्या व आमच्या वाटण्या झाल्या. मोठ्या आंगणात मायने खोली बांधून घेतली. राहत्या घराचा सामानासुमानापलीकडे संबंधच ठेवला नाही. नवी बांधलेली खोली मायने अशी सजवून मढवून काढली ! मिळेल त्या देवाचे चित्र

तिने लावावे. सापडेल त्या पुढाऱ्याचा फोटो टांगावा. शेवटी तर गुलाबराव मामाने तिला डिवचावे, " बाई ह्या तर चर्चिल होये. आपल्या लोकांचा नोहे ह्या पुढारी. " मायची टापटीप अन् कामाचा उरक पाहून काकू थक्क होत. सांधेवात तिचा इमानी सोबती. पण त्याला सांभाळूनही तिने भल्या झाकटीत थंड्या पाण्याचे सारवण घालावे. सूर्यनारायणाला माझे आंगण गधे मुतल्यासारखे दिसू देणार नाही ही तर तिची प्रतिज्ञाच.

टापटिपीने आणि जे काही आपले आहे ते सांभाळीत सुखाने रहावे यासाठी मायने जन्मभर जीवाचा आटापिटा केला. आपल्याला सुख मिळाले नाही. निदान पोरांचे तरी दोन दाणे दोन पैसे वाढावे म्हणून तिने नाही नाही ते उद्योग करावे. काकाजींशी वाटणी घेतली तेव्हा आपल्या हिश्श्यावर काय आले ते बघायला दादाजींना फुरसत नव्हती. अगदीच दीड बुटली जमीन आपल्याला आली आणि 'हत्तीचे मस्तक' अशी मोती पिकविणारी वावरे मात्र दिराने घेतली म्हणून माय त्या रात्री नुसती तगमगली. याला त्याला सांगून 'पोरांच्या हितासाठी तरी हिस्सेवाऱ्याकडे लक्ष द्या' असे कित्येक निरोप तिने दादाजींना पाठविले. पण आमच्या वडलांचा स्वभाव सर्वांनाच माहीत असल्यामुळे ते निरोप तेथवर पोहोचूच शकले नाहीत. हे सारे हाताबाहेर झाल्यावर माय खूप चिडली. सुजलेल्या डोळ्यांनी गुरुमहाराजांच्या तसबिरीकडे पाहात म्हणाली, " लेकरांचं आहे ते वाढवीन. कमी नका पडू देऊ. माझ्या जवळ दोन पैसे असले तरच पोरं मले माय म्हनतीन. एक देठ तोडलं तसं लेकराइले तुटू देनार नाही. "

आणि खरेच, त्या दिवसापासून आम्हाला मागितले ते मायकडून मिळू लागले. आरंभी आमच्या मागण्या फारशा मोठ्या नव्हत्या. मला जरीची टोपी दर महिन्याला नवी लागे किंवा दादाने एखाद्या सायकलची गोष्ट काढली असेल. मायच्या हातून पैसा तसा सहज सुटत नाही. एक पैसा हवा तर दहा बोलणी ऐकावी लागतात आणि तीही दहा तऱ्हेची दहा. 'तुमाले हिरवं रानच दिसते, पैसे म्हणजे चिंचोके होयेत काय ?' इत्यादी. दर क्षणाला पैसा न मिळण्याचाच संभव वाढत जातो. हे सारे तेव्हापासून आजतागायत सारखे चालू आहे. पण त्याला आमचा नेहमीचा तोडगाही ठरलेला आहे, " कागा मधू, ते काल आलेलं पत्र कुठाय ? " दादाने मला अशा वेळी मुद्दाम विचारावे. ते पत्र असे फैजाबादच्या सीड कंपनीचा कॅटलॉग. कुठल्या कोबीचे अन् भेंडीचे हजार प्रकार

व त्यांच्या बिया वगैरेची त्यात माहिती; पण मी ते मुद्दाम फैजाबादऐवजी फौजाबाद सांगून त्या प्रसंगाला गांभीर्य आणावे. सारांश असा की दादाला जर तात्काळ नवी सायकल मिळाली नाही तर तो सरळ फौजाबाद सीड कंपनीच्या फौजेत भरती होणार. मग माय भयभीत होऊन सायकलीची निदान अर्धी किंमत हातावर ठेवणार. आणि ती अर्धी देणार हे जाणूनचे आम्ही आरंभीच ती दुप्पट मागणार. अशी ही साखळी.

मायच्या पेटीत सायकलपुरतेच काय पण मोटरपुरतेही पैसे निघतील हा आम्हा सर्व भावंडाचा नम्र अंदाज आहे. पैकी माझा तर प्रामाणिक भरवसाच आहे. मायला मोजता येत नाही म्हणून ती आण्याअधल्यापासून तो शंभराच्या नोटेपर्यंत सर्व पैसे माझ्याकडून मोजून घ्यायची. रोजकीर्दीसारखी अक्षर–आकड्याविना सर्व हिशेब सांगणारी तिची एक लहान पेटी आहे. तिच्याकडे रोज येणारा पैसा त्या पेटीत असतो. रात्री आम्ही झोपल्यावर तो पैसा एका मोठ्या पेटीत मुक्कामास जातो. त्या पेटीत कुठल्या तरी जादूनेच त्या चिल्लरनाण्यांच्या नोटा होतात आणि त्या नोटा काही दिवसांनी कुठे तरी भूमिगत होतात. मग माय आम्हाला पुन्हा पुन्हा सांगते की तिच्याजवळ जहर खाण्यालाही पैसा नाही. पुष्कळदा दादाचा त्यावर विश्वास बसतो. माझे मात्र त्याबद्दलचे वेगळे तंत्र आहे. तिच्या त्या अद्भुत संदुकात तांदळाच्या अक्षतीच्या डब्यातच ज्वारीचे काही दाणे असतात. एक दाणा म्हणजे शंभर रुपये अशा हिशेबाने तिचा खजिना मोजायचा. अर्थात हे माझे संशोधन तिला माहीत नाही.

मायने जवळचा पैसा कधी दाखवला नाही; मोठमोठी कामेही अडू दिली नाहीत. पुष्कळदा असे व्हायचे की तिच्याजवळ पैसा नाही अशी आमची खरोखुरीच खात्री होऊन जाई. महिनोंशी तिने पैसा नाही म्हणून गुळाच्या पिठीवर निभवावे. आमचे सारे उपाय खलास व्हायचे. अशा वेळी दादाजी एक युक्ती करीत. कोणा गण्या भोयाचे किंवा महादेव बद्र्याचे एखादे वावर विक्रीला निघाल्याची बातमी तिच्या कानावर टाकायचे. आरंभाला माय त्याही बातमीला दाद देत नसे. पण सर्वजण मुद्दामच चूप राहिलेले पाहून ती आपण-हूनच अस्वस्थ होऊ लागे. ते वावर कसे, केवढे, केवढ्याला याच्या दुरून दुरून चौकशा करू लागे. आमचा सालदार दौलतमामा. त्याला हा मायचा स्वभाव ठावा. म्हणून तोही अशा वेळी भाव खायचा. मायचे बरेचसे अर्थशास्त्र त्याच्या

करवी सांभाळले जाई. त्याला तिच्या पैशांचा पत्ता असे. तो मुद्दामच तिला डिवचे, " बाई, कायलं पुसता! ते बाब्र आहे सात हजाराचंइतके पैसे तुम्ही कुठून द्याल ? "

" नाही रे बाबू. इतका पैसा आपल्याजवळ कुठला. पण तुझ्या मालकाले सांगनं व्याले. "

मायचा आग्रह असा की सात हजारातले दादाजींनी सहा हजार द्यावे. उरलेले ती देईल. दादाजी मख्ख. तडजोड होता होता दादाजींनी निदान पाचशे द्यायचे असत. उरलेले पैसे मग मायच्या पेटीतून प्रगट होत. तरीही ते तेथे नव्हतेच हा आग्रह आम्हाला मानावाच लागे. माय हा पैसा आमच्या मावशीकडून ' उसना ' आणी. तिकडे मावशीही आपल्या पोराला इतकेच पैसे देताना मायकडून ' उसने ' आणल्याचे शपथेवर सांगे. असे करता करता मायने आमची जमीन पाचपट केली. " स्त्रियांचं मन अगम्य असो अगर नसो; पण तुमच्या मायची पैशांची पेटी मात्र अगम्य आहे, " असे दादाजी मोठ्याच गंभीर चेहऱ्याने म्हणत.

मायची पेटी खरोखरच अगम्य आहे. आमच्या कुटुंबाचे कितीतरी महत्त्वाचे क्षण त्या पेटीत जपून आहेत. दादाजी सालबर्डीच्या यज्ञात कारभारी होते. स्वयं-सेवकांना देण्यासाठी तयार केलेल्या कापडी फितीतून काही उरल्या त्या मायच्या पेटीत अजून मानाने बसल्या आहेत. दादाजी त्या यज्ञात कोणीतरी मोठे होते. हे त्या फितींवरून मुळीच सिद्ध होत नाही; पण तसे मायला सांगण्याची खुद्द दादाजींचीही प्राज्ञा झाली नाही. सूतकताईच्या स्पर्धेत तिला मिळालेली एक चांदीची टकळी, जंगल सत्याग्रहात काकाजींनी आणलेला एक काटकीचा तुकडा, ताईपासून आमच्यापर्यंतचे बाळपणीचे कपडे, पितळेचे व कापराचे खेळ आणि दादाजींनी केलेल्या बहुतेक तीर्थांच्या प्रसादाचे उष्टे सडके कागद–सारे सारे तिच्या पेटीत आहे. आज नष्ट झालेले काही जोंधळवरणी, तांदुळपोत, पायजिब्रा, बोर हे सोन्याचे जुने दागिनेही तेथे सापडतात. तिच्या आजीसासऱ्यांनी रामेश्वराहून आणलेली सागरफेसाची पुरचुंडीही आहे. मायच्या जवळ मुळीही न टिकलेले दादाजींचे व आम्हा सर्व कुटुंबीयांचे प्रत्यक्ष जीवन असे तिने आपल्या पेटीत अडकवून ठेवले आहे. आमच्या घरी कापडाचे दुकान होते. ते असेच दोनचारदा मांडले. आणि मोडले पण दर वेळच्या चांगल्या मालाची एखादी चिंधी का होईना मायच्या पेटीत दिसतेच. ती पेटी म्हणजे मायचे जग झालेले आहे. आमच्या

घरी उतरलेल्या सर्व साधुसंतांच्या आठवणी त्या जगात आहेत. पुष्कळशा गोष्टींचे स्पष्टीकरण तर केवळ तिचे तिलाच माहीत आहे. सोऱ्यात शिजवून खराब झालेला एक कोट तिने फेकून द्यावा म्हणून दादाजींनी तिला कितीदा म्हटले. पण आपल्या चुकीची, मग दादाजीच्या मोठमोठ्याने हासण्याचिडवण्याची ती आठवण ती काही केल्या दूर करायला तयार होत नाही. माय जर निघून गेली तर कित्येक गोष्टी तिने पेटीत का जपल्या ते कोडेही तिच्याबरोबरच निघून जाईल.

सगळ्या आयुष्याचे आघात सोसून माय एक गोष्ट शिकली—जवळ पैसा असल्याशिवाय आपल्याला किंमत नाही. पतिसुख मिळाले नाही. पोरांकडे आशा लावून होती. निसर्गनियमाने पोरांचाही ताबा त्यांच्या बायकांनी घेतला. मायच्या जवळून सारेच जण निसटून गेले. दौलत सालदार मानलेला भाऊ होता. भाऊबिजेला तो तांब्याचे पाच पैसे तिला द्यायचा. तोही आता स्वतःची जमीन वाळगून आहे. म्हणजेच पोरांसारखा तोही मायच्या जवळून निसटला. बाई तर एक दिवस सासरी जाणारच—ती गेली. म्हणूनच ती पेटी मायची खरी सोबतीण आहे. तिच्यातल्या जिनसा तिच्याशी खाऱ्यागोड जीवनाच बोलतात आणि पैशाचा हिशेब सांगणारे ज्वारीचे दाणे तिला मानाने जगायचा दिलासा देतात. येवढा पैसा आपल्याजवळ असेतो सुना आपल्याशी लघळपणा करतील आणि पोरेही तोंड भरून माय म्हणतील असे तिला वाटते. पोरांना जर बाहेरून पैसा मिळाला तर तिच्या चेहऱ्यावर एक न दिसणारी भिती उमटून जाते.

हा पैसा मिळविण्यासाठी मायने काय काय केले त्याची मोठी गंमत आहे. आपले घराणे सोयरिकीधायरिकीच्या बाबतीत अनेकदा देशमुख मंडळींनी पंगतीला घेतले याचा अभिमान मायला असल्यामुळे त्या देशमुखी राहणीच्या अनेक वाईट प्रथा आमच्या पाटील घराण्यात सुरू झाल्या. त्यामुळे मायचा गोषा फार कडक. कधी म्हणून त्यामुळे आंगणाबाहेर पडण्याची तिला सोय नाही. अशा वेळी पैसा कसा कमावायचा? बाजारात जाऊन व्यापारटापार करण्याची सुतराम् शक्यता नव्हती. बरे, कोणाला पैसे व्याजाने द्यायचे तर लोकही पक्के! शेतीचा सारा कापूस बाहेरच दिवाणजीकडून विकला जाऊन पैसा परस्पर दादाजीकडे कवठाळ्ला जमा होई. नोकरांना आणि घराला लागणारे धान्य सोडले तर घरात काहीही नसे. वाणदुकानचे सारे बिल दादाजी तिकडच्या तिकडून पाठवून देत. माय अशी चहूबाजूंनी बांधलेली होती. अशा वेळी मग मुलांना दूध पाजण्या-

साठी तिला एकदम दोन म्हशी लागायला सुरुवात झाली. त्या म्हशींच्या दुभत्याच्या पैशांवर तिने दहा म्हशी केल्या. दुधातुपाच्या विक्रीने रोज ओंजळीभर खुर्दा जमू लागला. इतक्या म्हशी घरी आहेत याचा तर दादाजींनाही पत्ता नव्हता; पण शेतीचे उसळणारे कडबाकुटार नेहमीसारखे विकले जात नाही हे त्यांना माहीत होते. दोन म्हशींच्या नावाने डझनभर म्हशींसाठी ढेपसरकी आपल्याला घेऊन द्यावी लागते हेही त्यांच्या लक्षात येऊन गेले होते. पण ते मुद्दामच बोलले नाहीत. पुढे पुढे तर धान्यही असेच घरी खायला म्हणून नेहमीपेक्षा पाचपट लागले. डाळ तर दहादहा खंड्या लागू लागली. केवळ दोनअडीच माणसांना इतकी डाळ लागते कशी म्हणून दादाजींना अचंबा होताच. ते गमतीने मला म्हणाले, " अरे जरा वरण कमी खात जा. " मग मीही सांगून टाकले ( त्या सुमारास मायने मला खाऊला पैसे थोडे आखूड दिले होते )— " दादाजी, माय तर दाळ ज्वारी विकते."

" कुठं बाजारात जाते ती ?"

" ती नाही जात. दौलतमामा घेऊन जातो. घरीही ग्राहक येतात. "

हंगामाच्या वेळी माय दुसरीकडूनही वीस वीस खंड्या धान्य स्वस्तात खरेदी करी. मग पावसाळ्यात वर्धेच्या पुराने शहराशी संबंध तोडले म्हणजे त्या धान्याला दुप्पट भाव येई. किराणेवाला पासू आप्पाही तिला सामील होता. शंभराचे बिल तो दादाजीला पाचशे सांगे. दादाजीपेक्षा तो वयाने वडील. त्यामुळे त्याच्यावर बेभरोसा करण्याची दादाजींना हिमत नव्हती. आणि तोही ते ओळखून आपणहून दादाजींना सांगे, " बाबूराव, घरी कधी तोंड दाखवीत नाहीस. थोडसं बिल त्या बाईनं जास्त केलं तर तुझ्या काकाचं काय जातं रे ?" मग खरे बिल वगळून उरलेले पैसे तो चूपचाप घरी मायला आणून देई.

मायच्या जवळून आता देतो म्हणून नेलेले पैसे केवळ आम्हीच बुडवले असे नाही. मुसलमान, महार, बोपची, गवारी सर्वांचाच गोड अनुभव आहे. गावात कोणाचेही लग्न अडले म्हणजे माय त्यांना शिव्या द्यायला सुरुवात करते. कारण तो आता घरी येणार, मायला पैसे मागणार, पाचपन्नासाच्या नोटा ती त्याच्या अंगावर फेकणार व तो ते बुडवणार हे सारे तिला माहीत असते. साऱ्या गावावर तिचा वचक आहे. त्याला हेच कारण असावे. हातात पैसा अन् मुठीत गाव हे तिचे सूत्र आहे. वाया गेलेली पोरे, रेघा ओलांडणाऱ्या सुना अन् अभंड

नवरे या साऱ्यांचा न्याय तिच्याकडे येतो. घराघरात एकमेकांना धाक दाखविण्यासाठी मायचे नाव वापरले जाते. प्रत्येक पक्षाला मायचा भरोसा असतो. ज्याची वाणी चतुर त्याच्या बाजूने मायचा कौल जातो. दुसऱ्या पक्षाला तो मान्य करावा लागतो. आता धोबी, धनगर यांच्या तर जातपंचायती आहेत. पण त्यांचेही सुप्रीम कोर्ट आहे मायचे. येवढ्यातेवढ्यात कॉंग्रेसनेही त्या धोब्या-धनगरांसारखीच एक गावपंचायत आमच्या गावी स्थापली. माय त्याची सरपंच नसल्यामुळे काही अडले नाही. भांडणे येतात अजूनही मायच्याचकडे.

आंबा आता पिकून 'इकरत' चालला आहे. चेहऱ्यावर वळ्या मावत नाहीत. सांधेदुखी आपल्याला आहे हे माय आताशा उघडपणे कबूल करू लागली आहे. बरोबरीच्या अनेक लेकांच्या 'सवागती' व तेरव्या मायने केल्या आहेत. आपल्याहीसाठी कोणते सोवळे वापरावे आणि कुठल्या चंदनाचे इंधन आणावे याच्या सूचना माय कधीमधी देऊ लागली आहे. त्यासाठी खर्च होऊनही लेकरांना पुष्कळ पैसा आपल्या पेटीत मिळेल अशीकधी कधी उघड कबुली पोरांना मिळू लागली आहे. आणि त्याच वेळी आपण नातवाच्या लग्नात नातसुनेला खऱ्या सोन्याने मढवू अशीही आशा ती बाळगून आहे. पण त्या आशेला काही अर्थ नाही हेही तिला पुष्कळदा कळते. जन्मभर दादाजीसाठी रडून रडून निकामी झालेल्या डोळ्यांनी ती त्यांच्या फोटोला गंध लावते किंवा मोठ्या सुनेने आणलेला चहा कण्हत्या गात्रांना दावीत पिते.

असा जीवनाचा शेवटचा छायाप्रकाश तिच्यासमोर उघडझाप करीत आहे; मायमधली तग अजून गेली नाही. ती जाणारही नाही. तिच्यामध्ये आज किती तरी बदल झाला आहे. पण आजही पूर्वीची माय तिच्या सुरकुतलेल्या वाणावर चक्क दिसते. बायाबापड्यांना क्वचितच साधणारी कर्तबगारी तिने करून दाखविली. वडिलांनी आमच्यासाठी जे केले नाही ते तिने केले. आटापिटा करून केले. जन्मभर ती खपली अन् त्याच वेळी ते सारे सहन केल्याचे नाटकही तिने वठवले. आम्ही पोरांनी त्याबद्दल तिचे किती जाणले याचा ती तपास घेते. कधीमधी त्रागाही करते. बरेचदा वाटते की पोरांसाठी पैसा जमवता जमवता ती पोरांना गमावून बसली. आमच्यापैकी कोणीही तिला जवळचे वाटत नाही, पैशांपरता ती कोणालाही आपले नातलग मानत नाही असे आम्हाला ठळकपणाने वाटते.

आम्ही धागे लावू पाहतो. ती झिडकारून टाकते. का ते तिलाही कळत नाही. पोरे आपल्या जवळ येतात ती पैशांसाठीच असा तिचा पक्का समज आहे.

तिला शेती करायची होती. हाडाची काडे करून तिने जमीन जमवली. एकेक एकर विकत घेतला. पण दाराबाहेर पाय न ठेवण्याचा घरंदाजपणा आडवा आला. घरच्या घरी व्यापार करून पैसा मिळवणे तिला साधले. पण घराच्या बाहेर न जाता शेती करणे अशक्य होते. ते अशक्यच राहिले. दादाजीने घरी दिवाणजी ठेवला. सालदार ठेवला. पण ते घरी नसल्याने घराला शेतकऱ्याच्या घराची रया कधीच आली नाही. गोठ्यात दहा म्हशी अन् पंधरा गाई असत. खुंट्याला बैल मात्र कधीच दिसला नाही. वखरणी–पेरणीची वेळ आली की दादाजी कवठाळ या गावावरून दहा पंधरा बैलजोड्या एकदम पाठवून देत. एकदोन दिवसात सारी जमीन वखरून त्या जोड्या निघून जात. पुन्हा खुंटे सुने राहात. मायला ते खटके. साधे काण्या गावाला जायचे झाले तरी कोणाचा छकडा अन् कोणाचे बैल मागावे लागत. मायच्या सासऱ्याच्या राजवटीत धनगराभोयांपासून गवाऱ्यापर्यंतच्या लेकीबाळींना सासरी जाण्यासाठी आमचा छकडा मिळे. ते वैभव पाहिलेल्या मायला आता हे असे दोन डंगऱ्यांसाठी दुसऱ्या पुढे तोंड वेंगाडणे कसेसे वाटे. पण दादाजींच्या संमतीशिवाय सारे व्यर्थ होते. काही शेतात बगिचा करावा, घरी बैल ठेवावे, लोकांनी ते अडीनडीला मागावे हे तिचे स्वप्न स्वप्नच राहिले. कवठाळचे बैल आले म्हणजे परस्परेच शेतामध्ये जाऊन वखरणी करीत. मायने शेवटी निरोप पाठवला की वर्षातून दोन दिवस का होईना, पण ते कवठाळचे बैल घरच्या खुंट्याला बांधावे. मागणी मंजूर झाली. त्यावेळची प्रसन्न माय मला अजून आठवते. बैलांसाठी मेवण करायला ती दहादहादा सूचना देई व त्या गड्यांकडून व्यवस्थित पाळल्या जात असतानाही त्यांना उगीचच नावे ठेवून ती स्वतः डोहणीत सरकी कुटार भिजवी. खाण्याचा अव्वल दाणा बैलांना चारी. आणि त्या पाहुण्या गड्यांच्या जेवणासाठी मुद्दाम अनाबाई व गंगुबाईला स्वयंपाकाला बोलावी. त्या मोठ्या सुगरणी होत्या असे नव्हे. पण अशा प्रसंगाची गावभर जाहिरात करण्यात त्या मायला कामी पडत. माय मग कोरे लुगडे नेसून स्वतः पंगतीत फिरे. पुन्हा दुसऱ्या दिवशी सारा खिन्नपणा परत येई. पोळ्याला, दिवाळीला ढोरांची पूजा करायची असे. पोळ्याच्या आदल्या दिवशी बैलांना मालकिणीने ' उद्या जेवायला येजा ' हे पाच वेळ म्हणायचे असे. माय त्या दिवशी रिकाम्या खुंटांकडे

भिरभिर पाहात राही. पुरणाच्या पोळीचा घास तिच्या तोंडभर फिरत राही. बाजारात पोळा फुटे. गावभर उधळलेल्या बैलांची धुंगरे ती कासाबिशीने ऐके.

माय शेवटी बाई होती आणि माणूस नव्हती हेच खरे. शेती वा बगीचा करण्याची तिची आवड अगदीच वाया गेली नाही. डाळींब, पेरू, पपया तिने आंगणात पिकवल्या, गावभर पुरवल्या. आमची दोन मोठी आंगणे होती. तरी घरामागची तीनचार पडकी घरे तिने विकत घेतली. जमीन सवान करून तिने वर्षोंशी मिरच्या, मकई, काकड्या इत्यादी वाढवल्या. त्यांच्या भाज्या करून वाटी-वाटीभर घरोघरी पाठवल्या. म्हातारपणात पोरेसुना पोटभर खाऊ घालीत नाही म्हणून कित्येक म्हातारे आमच्या घरी तक्रार करायला येत. माय काही कुबेर नव्हती. ती अगदीच वळली नाही तर आमदभाईसारखे लोक मग ‘ कासीराम पाटलाचे सत्त्व या घरात राहिले नाही ’ म्हणून जोराने बोंब मारीत. कासीराम पाटील मायचा सासरा. त्यानेच तर तिला रांधणे शिकवले होते. आठ वर्षांची ती नवी नवरी ! तिला साधे पाणीदेखील तापवता येत नव्हते. पण सासऱ्याने सुनेला मुलीसारखे सांभाळले. मायच्याशिवाय घरातल्या साऱ्या लक्ष्म्या कुंकवाभरल्या देवाघरी गेल्या होत्या. म्हणून येवढा दानी असूनही कोणाचे पात्र कासीराम पाटलाच्या घरी दडले नव्हते. आता सून सुगरण झाली म्हणजे तो साऱ्या गावाला शाराची पाटोळी, शेंगोळे आणि पुरणाची पोळी खाऊ घालणार होता. सून सुगरण व्हायला आली आणि सासरा देवाघरी गेला. हे सारे प्रसंग मायला त्या वाक्यामुळे आठवून जात. माय मग कितीही रागात असली तरी त्या त्रस्त समंधाला भाजीची आहुती देई. आषाढात आंगणात बिया पेरायच्या असत. गावातले कित्येक बुड्ढे त्यावेळी आपल्याला आवडीच्या बिया आणून देत. आपल्या भाजीची सोय करीत. वालाला शेंगा आल्या म्हणजे माय मला म्हणे, “ जाय. रामभरोशाले सांग तुझ्या वेलीले शेंगा आल्या. आज भाजी खायले ये. ”

मायला सूनबाई म्हणणारे लोक कालपरवापर्यंत पुरले. आता सारे तिला ‘माय’ म्हणणारेच उरले आहेत. दादाजी गेले. कासीराम पाटील तर पूर्वीच गेले. त्या दोघांच्या बादरायण संबंधातला जरी कोणी आला तरी भडाभड रडणे, आग्रहाने पाटपाणी होणे, पुन्हा निरोपाचे रडणे हे देखील आता ओसरले. कोणी त्यातले उरलेच नाही. देवाने अशाही परिस्थितीत आपल्याला का ठेवावे याचे मायला नवल वाटते.

माय माझ्या वास्त्याला फारच थोडी आली. शहरात ये म्हणून उपयोग नाही. ती 'धडी' सोडायला तयार नाही. कासीराम पाटील ज्या ओसरीवरून गेले त्याच ओसरीवरून तीही देवाघरी जाणार आहे. मोठ्या मुष्किलीने ती गेल्या वर्षी आली. नातू होणार म्हणून आली. नातूचे कौतुक करीत कशीबशी दोन तीन महिने राहिली. नातवाच्याही कौतुकात जवळीक नव्हतीच. शरीराचा थकवा, पैशांची किंमत व नातू या सर्वांचे गमतीचे मिश्रण त्यात होते. हातपाय सांधेदुखीने सपाटून दुखायला लागले म्हणजे ती त्या नवजात मासाच्या गोळ्याकडे मोठ्या आशेने पाही. तो मोठा झाला म्हणजे आपले हातपाय दाबून देईल व त्याच्या मोबदल्यात आपण त्याला पाच रुपये रोज देऊ असे ती बोले. एकदा तर तिला आपली पेटीच कोणी पळवून नेत आहे असे स्वप्नात दिसले. अशी ओरडून जागी झाली!

कळत नाही--तिचे त्या पेटीतल्या कोणत्या वस्तूवर प्रेम आहे? पैशावर म्हणावे तर ते असेलही; पण तो तर तिने येतानाच सोबत आणला होता. शेवटी तशी स्वप्ने वारंवार पडू नयेत म्हणून आम्ही तिला गावाला पाठवून दिले. तीन महिन्याच्या अवधीत—नव्हे साऱ्या आयुष्यातच जो विचारला नाही तो प्रश्न मी तिला विचारला. तिचे खरे प्रेम कोणावर आहे? पैशावर की पोरांवर?

"बाबू, तुमच्या सर्व्यांवरच माझा जीव आहे. पण आधार मानसाले पैशांचाच असते. मायबापाजवळ पैसा नाही म्हणून तेईले म्हातारपणात मारठोक करणारे लेक जगात कमी आहे काय? तुमी तसे नाही. पन असले दोन पैसे तर वाया थोडेच जाते?"

यावर काय बोलू? नाही म्हणायला ती रामकृष्ण परमहंसाचा जप रोज करते. पण ती भक्ती–तिने तसे स्पष्टच सांगितले–आत्मोद्धारासाठी ती करीत नाही. दादाजी तसे करीत होते ना! त्यांची आठवण म्हणून ती करते.

तिने आपल्याला काय दिले नाही ते मला कधीच कळले नाही. काय दिले तेही कळले नाही. करायचे ते आमच्यासाठी केले. अजूनही ती करीत आहे. पैसा जुळवीत आहे. पण आमच्यासाठी ते सारे करीत असतानाच ती आमच्यापासून दूर गेली हे मात्र खरे आहे. खरे असावे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
REFBK-0014383

सन १९५९ च्या सुमारास प्रसिद्ध झालेल्या "दिंडी गेली पुढे" ह्या कविता-संग्रहाने श्री. मधुकर केचे यांच्यावर प्रकाशझोत फेकला. केंद्रसरकारकडून गौरविला गेलेला हा काव्यसंग्रह रसिकांच्या मनांत श्री. केचे यांच्या वाङ्मयीन कर्तृत्वाविषयींच्या आकांक्षा उंचावून गेला.

काव्याव्यतिरिक्त श्री. केचे यांनी गेल्या ३–४ वर्षांत विपुल ललितलेखन केले. लघुकथा, लघुनिबंध, ललितलेख, व्यक्तिचित्रणं...अत्यंत तरल व संवेदनाक्षम मनावर वेळोवेळी प्रतिबिंबित होणारे जीवनाचे विविध दर्शन ते इतक्या प्रभावीपणे शब्दांकित करतात की वाचक कळत नकळत स्वतःला त्या प्रतिबिंबात हरवून बसतो. जीवनानुभूतीची समृद्ध शिदोरी नीटसपणें वाचकांच्या हातीं सुपूर्द करून लेखक स्वतः बाजूला होऊन वाचकाचे त्या अनुभूतीशी आपोआप झालेले तादात्म्य तिऱ्हाइताच्या कुतूहलाने कौतुकाने न्याहाळीत असतो. इथंच श्री. केचे यांच्या लेखणीचे सामर्थ्य जाणवते. भारून टाकते. लेखकाच्या विचारसरणीचा सहजपणा, समतोलपणा व प्रामाणिकपणा वाचकाला क्षणभर अंतर्मुख बनवून जातो.

उगवतीच्या पिक्या रंगाच्या अंगकांतीचे व्रतस्थ तपस्वी प्रो. भन्साळी, विदर्भीय समाजाच्या व्यसनी व कर्जबाजारी वृत्तीवर कीर्तनाच्या माध्यमांतून कोरडे ओढणारे श्री. गाडगेबाबा, विदर्भाला अक्षरओळख करून देऊन शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीचा कायदा करणारे डॉ. पंजाबराव देशमुख, ब्रह्मदर्शनार्थ वेड्यापिशागत फिरणारे श्री. आडकुजीमहाराज, हातातोंडाशी आलेल्या एकुलत्या एक मुलाच्या मृत्यूचं दुःख धीरोदात्तपणे पचवून जिवंत मरण जगणारे श्री. पी. के. देशमुख, लहान लेखकांना प्रोत्साहन देणाऱ्या डॉ. कै. कुसुमावती देशपांडे...ही सारी मंडळी शब्दलेणी लेवून वाचकाशी हितगुज करतात.

स्वतःच्या संसारविन्मुख पित्याच्या उन्मनस्क पार्श्वभूमीवर मधूनच क्षणभर डोकावणारी लेखकाची व्यवहारकुशल "माय" वाचकाच्या काळजात कळ उठवून जाते.

घरंदाज "व्हराडी" बोलीतील चुरचुरीत संवाद ताज्या दुधावरील खरपूस सायीसारखे रुचकर वाटतात.